# ॥ जे जे भेटे भूत ॥



चंद्रकांत अनंत भोसेकर

चं. अ. भोसेकर

# जे जे भेटे भूत

ज्ञानेश्वर माऊलीच्या या ओवीवर सुचलेलं
एक उत्स्फूर्त व प्रदीर्घ विवेचन

-- चंद्रकांत अनंत भोसेकर

।। स्वर-संस्कार ।।

©
चंद्रकांत अनंत भोसेकर
जे जे भेटे भूत

**लेखक :**
चंद्रकांत अनंत भोसेकर,
यशोदा-सीताराम को. हौ. सोसा. लि.,
पहिला मजला, समाज मंदिर हॉलजवळ,
टिळकनगर, डोंबिवली (पूर्व) ४२१ २०१.
फोन : ४५४३८२, ४५४४५९.

**प्रथमावृत्ती :**
१२ नोव्हेंबर, १९९६
बलिप्रतिपदा, कार्तिक, शके १९१८

**अक्षरजुळणी :**
अंकुर कॉम्प्युटर टाईपसेटर्स,
गणेश स्मृती, आगरकर रोड, डोंबिवली (पूर्व).
फोन : ४५ ४८ ६५.

**मुद्रक :**
प्रिन्ट व्हिजन
३०, ज्योति इंडस्ट्रीयल इस्टेट,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे ४०० ६०२.
दूरध्वनी : ५३६६३८८

**प्रकाशक :**
" स्वर-संस्कार"
यशोदा-सीताराम को. हौ. सोसा. लि.,
पहिला मजला, समाज मंदिर हॉलजवळ,
टिळकनगर, डोंबिवली (पूर्व) ४२१ २०१.

(खाजगी वितरणासाठी मुद्रित व प्रकाशित)

जिच्या सहकार्यामुळे हे लेखनकार्य
घडलं
त्या माझ्या प्रिय पत्नीस
(सौ. सुनेत्रा चंद्रकांत भोसेकर)
सप्रेम अर्पण

-- चंद्रकांत

# ऋणनिर्देश

१. योगी श्री. बा. ना. उर्फ ज्ञाननाथजी रानडे

२. श्री. दिवाकर अनंत घैसास

३. श्री. अशोक विनायक गायकैवारी

४. श्री. प्रशांत वसंत प्रधान

५. श्री. प्रमोद विनायक सोहोनी

६. स्वर-संस्कार - गीता वर्ग

७. स्वर-संस्कार - साप्ताहिक संगीत सभा

८. श्री. अनिल नारायण जुन्नरकर

९. श्री. वामन गणपत कोऱ्हाळकर

सौ. सुलेखा वि. पटवर्धन.

कुर्मी दृष्टीते न्याहळी ।
मत्स्य आठवितो चित्ती ॥
तैसा तुम्ही देव जाणा ।
ह्या तो सद्गुरुच्या खुणा ॥

शिव गोरक्ष

**बा. ना. रानडे**
उर्फ
**ज्ञाननाथजी**
प्लॉट नं. ४५, तुळशीबागवाले
कॉलनी, पर्वती,
पुणे ४११ ००९
फोन नं. ४३६९३९
दिनांक : १४/७/१९९६

## आशीर्वाद

गुरुभक्त श्री. रा. रा. भोसेकर यांचा माझा डोंबिवली येथे बऱ्याच वर्षापूर्वी एका अध्यात्मिक कार्यक्रमात परिचय झाला आणि त्यानंतर बऱ्याच वेळी माझी आणि त्यांची गाठभेट होत असते. श्री. भोसेकर हे एक चांगले सुविद्य व आध्यात्मिक मार्गातील गृहस्थ आहेत. यांनी एक गुरुशिष्य संवाद रुपातील एक लेखमाला लिहिली आहे. त्यांनी मला ही लेखमाला वाचण्यास दिली. त्यांच्या या लेखमालेतून ज्ञानेश्वरीमधील ओवीप्रमाणे

जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत ।
हा भक्तियोगु निश्चित । जाण माझा ॥

याचा प्रत्यय येतो. श्री. भोसेकर हे रिझर्व्ह बँकेतून सेवानिवृत्त झाले असून श्री. योगीराज गुळवणी महाराजांचे अनुग्रहीत आहेत. त्यांनी जो गुरुशिष्य संवाद लिहिला आहे तो नुसताच लिहीला नसून त्यांना त्याची प्रचिती आल्याचे या लेखनातून जाणवते. अत्यंत अभ्यासपूर्वक व गाढ श्रद्धेने त्यांनी हे लिखाण केल्याचे जाणवते. त्यांनी मला विनंती केल्यावरून मी या त्यांच्या लेखनावर अभिप्राय व्यक्त करीत आहे.

आध्यात्मिक मार्गातील प्रत्येक साधकाला ही लेखमाला निश्चितच उपयोगी पडेल असे मला वाटते.

**-- योगी ज्ञाननाथजी रानडे**

# प्रस्तावना

श्री. चंद्रकांत अनंत भोसेकर यांनी संत ज्ञानेश्वरांच्या भावार्थदीपिकेतील एका ओवीच्या आधाराने हे संवादात्मक पुस्तक लिहिले आहे. पुस्तक विस्ताराच्या दृष्टीने लहान आहे. पण आशयाच्या दृष्टीने व्यापक आहे. अथपासून इतिपर्यंत सर्वच प्रश्न मूलभूत असून 'मी ' नांवाच्या जिज्ञासू पृच्छकाला ' महाराज ' नांवाच्या ज्ञानी व्यक्तीने दिलेली उत्तरे म्हणजे आधारभूत भक्तिवेदान्ताचे महान् व्यापक भाष्य आहे. श्री. भोसेकर यांना जवळचे लोक राजाभाऊ म्हणून ओळखतात. त्याचा आधार घेऊन असे म्हणावेसे वाटते की, गीतोपनिषद् हे जसे सर्व उपनिषद्रूपी गायींचे दूध आहे तद्वत् उत्तर मीमांसेच्या उपनिषदांचे नवनीत त्यात भक्तीची शर्करा मिसळून केलेले हे 'राजोपनिषद् ' आहे आणि मराठी भाषेला हे राजविद्या-राजगुह्य योग सांगणारे बृहद् राजोपनिषद् द्रष्टेपणे पहाण्याचे भाग्य लाभले आहे. हा मराठीचिये नगरीं ज्ञानदेवानी मागितलेला (सुकाळू करीं) सुकाळ आहे. वडाचे बी जसे अगदी सूक्ष्म असते पण त्यातून जसा महान् चिरंजीवी वटवृक्ष विस्तारतो तसा हा वटवृक्ष ज्ञानदेवांच्या एका ओवीरूप बीजातून विस्तारला आहे आणि आश्चर्य असे की या वटवृक्षाला अमृतमधुर ' सहकारफले ' म्हणजे भक्तिरसाने ओतप्रोत भरलेली तत्वज्ञानरूप आम्रफले लहडलेली आहेत. असे यात खास आहे तरी काय काय ? या परिचयात्मक प्रस्तावनेच्या पृष्ठांत आशयाचा आभासालेख थोडासा काढावा म्हणजे वाचकांना विषयाचे आकलन होण्यास काही एक सूत्र मिळेल.

ज्या ओवीवर ही सारी भाष्याची इमारत उभी आहे ती ओवी ज्ञानेश्वरीत दहाव्या अध्यायात ११८ वी ओवी आहे. गीतेत भगवंत दहाव्या अध्यायात आठव्या श्लोकांत अर्जुनाला म्हणतातः

अहं सर्वस्य प्रभवो मत्तः सर्वं प्रवर्तते ।
इति मत्वा भजन्ते मां बुधा भावसमन्विताः ।।८।।

या श्लोकाचा सरळ अर्थ आहे- मी सर्वांचा प्रारंभ आहे व मजपासूनच सर्वांची प्रवृत्ती होते हे समजून घेऊन आत्मज्ञानी (बुधाः) लोक, त्याच व्यापक भावाने युक्त होऊन माझी भक्ति करतात. पुढे ते म्हणतात-

मच्चित्ताः मद्गतप्राणाः!

म्हणजे त्यांचे चित्त व प्राणही मजकडेच आकृष्ट झालेले असतात (इत्यादी).

ज्ञानेश्वरांनी आठव्या श्लोकावर स्पष्टीकरणात्मक टीका ओवी ११२ ते ११८ पर्यंत ७ ओव्यात केली आहे व त्यातील ११८ वी ओवी अत्यंत उत्तम, निश्चयात्मक विधान करणारी आहे ती अशी आहे -

" जें जें भेटे भूत ! तें तें मानिजे भगवंत !

हा भक्तियोगु निश्चित ! जाण माझा !!

या एका ओवीरूप ज्ञानसागरात वारंवार अवगाहन करून साधकांच्या भक्तिसाधनेत उपयोगी अशी अनेक उपायरत्ने राजाभाऊंना सापडली आहेत आणि ती पुस्तकरूपी तबकामध्ये आपल्यापुढे मांडली आहेत.

संवादाच्या सुरूवातीलाच, सगुणसाकार इष्ट दैवताला सर्वत्र पहाणे म्हणजे काय, त्यात अडचण कशी येते याचा ऊहापोह केला आहे. नंतर या आधार-ओवीतील ' भगवंत ' या शब्दाची समर्पक व्याख्या व विवरण केले आहे. तसेच दैवताची उपासना करण्यामागे लोकांची भूमिका काय असते त्याची चर्चा केली आहे. भगवंताच्या विश्वनिर्माता, विश्वनियंता, विश्वज्ञानी, विश्वव्यापक व विश्वप्रेमी या सर्व शक्तींचा त्यानंतर पुष्कळ विस्ताराने व सांगोपांग विचार केला आहे. विश्वाची उत्पती, स्थिती व लय यांची मुद्देसूद माहिती त्याच संदर्भात दिली आहे. हा एवढा भाग आपल्याला जगदीश्वराचे व जगताचे परस्पर-सापेक्ष रूप, आणि ऐक्य व भेद यांची चांगली कल्पना देतो. आपल्याला माणसें बरी वाईट कोणीही भेटली तरी तेथे ईश्वरच पहाण्यास शिकले पाहिजे हे ज्ञान जे जे या शब्दांतील द्विरूक्तीमुळे निर्दिष्ट होते, हा खोल अर्थ लक्षात आला की लेखकाच्या सूक्ष्म बुध्दीचे कौतुक वाटते. ' भेटे ' या शब्दाने स्वेच्छानिरपेक्ष घडणा-या घटनांचा फार सुंदर परामर्श घेतला आहे. उपादानकारण, निमित्तकारण, जीवात्म्याचे अल्पत्व, कार्यकारणभाव, संकल्पाचे यथार्थ स्वरूप, सातत्याची भ्रांत कल्पना व ' अहम् ' ची निर्मिती अशा तात्विक विषयांचा सुंदर उलगडा करीत करीत आणि कधी श्लेष, कधी उपमा, कधी दृष्टांत, कधी व्यावहारिक दृष्टांत, तर कधी कधी आधुनिक भौतिक विज्ञान, गणित, खगोलशास्त्र, शारीरकशास्त्र यातील उदाहरणे देत देत, मानवी मेंदूची आंतर-रचना व कार्य यांचा कुठे कुठे सहजबोधक भाषेत मागोवा घेत घेत, या संवादाची गती अधिक गंभीर व खोल होत जाते, आणि तरीही मधून

मधून विनोदी शेरे येतात, त्यामुळे एकीकडे हसू येत आहे तर दुसरीकडे विषयाच्या गाभा-यांत होणा-या ' सत्य ' रूप देवाचे दर्शन घडताना मन व शरीर अत्यंत तल्लीन होते.

विविध प्रतिपाद्य तत्वांना अनुलक्षून लेखकाने अनेक संतवचनांचे, श्रुतींचे, दर्शनग्रंथांतील महावाक्यांचे व मोठमोठ्या लेखकांच्या उद्गारांचे दाखले दिले आहेत. हे सर्व दाखले मनाला उल्हसित करणारे व जिज्ञासा वाढविणारे आहेत.

मनाचा अभ्यास करून ईश्वराचे ध्यान कसे करावे याचे मार्गदर्शन तर फारच नेमकेपणाने आणि स्वानुभवाच्या आधारावर केलेले आहे. मनुष्याला वित्तेषणा, लोकेषणा इत्यादींनी कसे बंधन पडते त्याचे विवेचन करताना लेखकाने साधकाला त्याचे जीवन आरशात दाखविल्यासारखे स्पष्ट दाखविले आहे. आणि सबंध पुस्तकाच्या पानापानातून ज्ञानामृत, कर्मरहस्य, योगविद्या आणि भक्तिपंथ यातील जवळजवळ सर्व संशयांचे निराकरण, जिज्ञासांची पूर्ती, उपदेशाचे पाथेय आणि गुरूशिष्यांच्या स्नेहाचा निर्झर यांची अनुभूतीच वाचक साधकाला आणून दिली आहे.

"सत्यज्ञानमनन्तम् ब्रम्ह" या श्रुती प्रमाणे ही भक्तीची ब्रम्हात्मकता सत्य, ज्ञानमय व 'अनंत रूपें अनंत वेषें ' विलसत आहे.

जो जो असेल भक्त । तो तो होईल भगवंत ।
ऐसे विलक्षण अभिव्यक्त । ग्रंथीं इया ।।
चंद्रकांत कौमुदीत पाझरे । की मलयगिरीचे वारे ।
तैसे आल्हादप्रद सारे ।। तत्वसार ।।
अमृतपानाचे मिषें । राजोपनिषद सौरसें ।
दिधलें भक्तीमार्गप्रकाशें । आत्मचिंतन ।।

अशा पद्यमय शब्दात या अजोड अनुपम दिव्य संवादाचे स्वागत करावेसे मला वाटते.

**दिवाकर अनंत घैसास.**

# अनुक्रमणिका


१) भगवंत या शब्दाचा सर्वसमावेशक अर्थ ११

२) पूर्व नियोजित ईश्वरी संकल्प २५

३) भगवंताची अद्‌भुत निर्मिती : विश्व आणि मानव ३१

४) भगवंताच्या अज्ञानातून निर्माण होणारं मानवी जीवन ४१

५) ओवीचा शब्दशः अर्थ व त्यातून मिळणारी प्रेरणा ४६

६) भगवंताशी एकरूप होण्याची साधना - मंत्र व तंत्र ५९

७) प्रत्यक्ष अनुभूती. ७२

# ॥ जे जे भेटे भूत ॥

या सुसंवादातील " महाराज " हे एक आत्मसाक्षात्कारी म्हणून शिरसामान्य विभूती आहेत. ते गुरू म्हणून असामान्य व्यक्तिमत्वाचे असले तरीही ते माऊलीच्या "अलौकिक नोहावे लौकिकाप्रती " या ओवीप्रमाणे एखाद्या सामान्य प्रापंचिक माणसासारखेच बोलतात. विनोदी कोट्या करतात व यातून आपला मुद्दा ते " मी"च्या गळीं उतरवतात. तसंच यातील "मी" हा एक नामस्मरण करणारा प्रामाणिक साधक आहे. महाराजांच्या आध्यात्मिक योग्यतेची जाणीव नसल्यामुळे तो त्यांच्याशी अगदी जवळीकीने बोलतो पण या सुसंवादाच्या शेवटी त्याच्या सर्व शंका दूर होतात व त्याला माऊलीची व महाराजांची महती पटते.

# प्रकरण १

## भगवंत या शब्दाचा सर्वसमावेशक अर्थ

महाराज : ये, ये, बाळ, आज बऱ्याच दिवसांनी येणं केलंस म्हणायचं.

मी : तुमच्याकडे यायला उशीर झाला हे खरं आहे. पण महाराज गेल्यावेळी तुम्ही नामासंबंधी इतकं होमवर्क दिलं होतं की ते करता करता माझ्या सर्वस्वाचा होम होतो की काय अशी भीती मला वाटू लागली म्हणून मधे बराच वेळ गेला.

महाराज : अरे, तुझ्या सर्वस्वाचा होम झाला असता तर तुला इथे पुन्हा शंका विचारायला यायची पाळीच आली नसती. कारण माणूस आपलं सर्व देऊ शकतो, पण त्याला आपला "स्व" देणं फारच कठीण असतं. बरं ते असू दे, तुझी नामसाधना कशी काय चालू आहे?

मी : महाराज, आमची कसली आली आहे साधना ? सर्व व्यवहार सांभाळून आपण सांगितल्याप्रमाणे जमेल तसं देवाचं नाव घेत असतो. आपल्या कृपेनं सर्व व्यवस्थित चाललं आहे. पण महाराज मी आज आपल्याकडे थोड्या वेगळ्या कारणासाठी आलो आहे.

महाराज : बोल, आज काय शंका काढली आहे ?

मी : महाराज, गोंदवलेकर महाराज म्हणत असत की माझ्या गुरूंनी मला सर्वत्र राम पहायला शिकवलं. याचा अर्थ कृष्णभक्तांना किंवा विठ्ठलभक्तांना सुध्दा सर्व ठिकाणी त्यांच्या इच्छेविरूध्द रामच पहावा लागेल की काय ?

महाराज : अरे, गोंदवलेकर महाराज, रामाचं ध्यान करत होते म्हणून त्यांना सर्वत्र राम दिसत होता. याचा अर्थ ज्याचं जे ध्यानाचं दैवत असेल तेच त्याला सर्वत्र दिसणार. उदा. समर्थ रामदास पंढरपूरला गेले तेव्हा त्यांना विठ्ठलाच्या मूर्तीच्या जागी राम दिसू लागला होता, म्हणून ते म्हणून गेले की "येथे कारे उभा श्रीरामा । मनमोहन मेघश्यामा।।"

मी : याचा अर्थ मी रामनाम घेतो तेव्हा मला सुध्दा सर्वत्र धनुर्धारी राम दिसायला पाहिजे काय ?

महाराज : तु रामाचं ध्यान करत असल्यास बऱ्याच कालांतरानं तुलाही रामाची सगुण मूर्ती सर्वत्र दिसू लागेल.

मी : पण महाराज, त्यामुळे घोटाळाच घोटाळा होईल. मी संध्याकाळी ऑफीसमधून दमून घरी आल्यावर मला जर बायकोच्या जागी प्रभू रामचंद्र दिसू लागले, तर मी तिला चहा कर म्हणून कसं सांगणार ? किंवा ऑफीसमधल्या हाताखालच्या माणसांत जर मला राम दिसू लागला तर त्याच्या कामात हल्ली काही राम उरला नाही असं मी त्याला फायरिंग कसं देणार ? तेव्हा महाराज नकोच ती भानगड.

महाराज : (हसून) अरे, तू रामाच्या सगुण मूर्तीचं ध्यान रोज करतोस का ?

मी : नाही महाराज, मी आपला रामनाम घेतो.

महाराज : मग तू काही चिंता करू नकोस. कारण तुझ्या बाबतीत ही भानगड उद्भवणारच नाही.

मी : मग माझ्या बाबतीत काय होईल ?

महाराज : तू म्हणतोस तसं काहीच होणार नाही.

मी : असं कसं महाराज, मी रामनाम घेतो ते फुकटच जाणार की काय ?

महाराज : (हसून) अरे सर्वत्र राम दिसू लागला तर तुझ्या संसारात गोंधळच गोंधळच निर्माण होईल म्हणतोस आणि काहीच दिसणार नाही म्हटलं तर घेतलेलं रामनाम फुकट जाणार की काय अशी तुला भीती वाटते. मग कसं करायचं तूच सांग.

मी : तसं नाही महाराज, माझ्या संसारात घोटाळा न होता मला ईश्वरदर्शन झालं तर हवय, तेव्हा ते लवकरात लवकर कसं होईल ते सांगा.

महाराज : तसंही होईल. समर्थांनी म्हटलंच आहे की, " राम तो कालचा । सुत दशरथाचा । अनंत युगांचा । आत्माराम ". तेव्हा तुला या आत्मारामाशी एकरूप होता येईल. आता हे लवकरात लवकर व्हायला हवं असं तुला वाटत असेल तर रामनामाच्या जोडीला तुला आणखी एक साधना करायला पाहिजे.

मी : (उत्सुकतेनं) ती कोणती साधना महाराज ?

महाराज : आणखीन कोणती साधना असणार ? आत्मारामाला सर्वत्र पहाण्याची साधना. ती ज्ञानेश्वर माऊलीनं ज्ञानेश्वरीत सांगितली आहे. माऊली म्हणते ---

"जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत । "
हा भक्तियोगु निश्चित । जाण माझा ।। १०.११८ ।।

मी : पण महाराज यात भगवंत असं म्हटलं आहे. आत्माराम असं कुठे म्हटलं आहे?

महाराज : अरे, आपल्यासारख्या सामान्य माणसाच्या दृष्टीने भगवंत काय, ईश्वर काय, स्वस्वरूप काय, आत्माराम काय, सगळं सारखच असतं. जसं तुझ्या संसारात बाबा, काका, मामा वगैरे सर्व काही तूच असतोस. तशी आपण कोणाचीही भक्ती केली तरी ती शेवटी एकाच ईश्वराला पोहोचते.

आकाशात् पतितं तोयं, यथा गच्छति सागरम् ।
सर्व देव नमस्कार : केशवं प्रतिगच्छति ।।

मी : पण महाराज या ओवीत असं विशेष काय सांगितलं आहे?

महाराज : अरे माझ्या दृष्टीने तर ही ओवी अत्यंत महत्वाची आहे. नामदेव महाराजांनी सांगितले आहे की,

नामा म्हणे श्रेष्ठ । ग्रंथ ज्ञानदेवी ।
एक तरी ओवी अनुभवावी ।।

मला वाटतं " जे जे भेटे भूत " ही ओवी तर अगदी अनुभव घ्यावासा वाटावा अशी आहे आणि त्यातलं वैशिष्ट्य असं आहे की माऊलीनं यात भक्तियोगाची निश्चित अशी व्याख्या केली आहे. भक्तीमध्ये काय करायला पाहिजे ते अगदी खात्रीपूर्वक या ओवीत सांगितलं आहे. उगाच जर-तर, असेल बुवा, नसेल सुध्दा, कदाचित् अशा अनिश्चित भाषेत न सांगता किंवा अमक्या गोष्टीची शक्यता काही टक्के नाकारता येत नाही, अशा ढिसाळ भाषेत न सांगता भक्तियोगाची अगदी वस्तुस्थिती निदर्शक अशी व्याख्या केली आहे. जसं, एखाद्या कॅप्सूलमध्ये रोगनाशक औषध ठासून भरलेलं असतं, तसं या ओवीत प्रत्येक शब्दातून भवाला म्हणजे संसाराला कोठेही धक्का न लावता भवरोगनाशक औषध गच्च भरलेलं आहे. उदा. जर पिकाला कीड लागली तर पिकाला धक्का न लागता फक्त कीड मरेल अशा औषधाची गरज असते. नाही तर कीडही मेली आणि ते अन्न खाणाराही मेला अशी अवस्था व्हायची.

या ओवीचं दुसरं वैशिष्ट्य म्हणजे भक्तियोगाचं साधन आणि साध्य दोन्ही एकच आहे, हे ही या ओवीत दर्शविलं आहे. तिसरी गोष्ट म्हणजे या ओवीत सांगितलेल्या भक्तीच्या साधनेला इतर कोणत्याही बाह्य साधनाची गरज लागत नाही. त्यामुळे इथे बाह्य अवडंबराची वगैरे आवशयकता नसते. चौथी गोष्ट म्हणजे हे साधन

करताना कसलीही दमणूक त्रास वैगरे होत नाही. त्यामुळे हे साधन सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत सहजपणे करता येतं.

मी : बाप रे, या वैशिष्ट्यांची अशी लांबलचक यादी असेल अशी माझी कल्पना नव्हती. बरं ते असो, या ओवीत असं भक्तीचं साधन तरी काय सांगितलं आहे ?

महाराज : यासाठी त्यातील प्रत्येक शब्दाचा सविस्तर विचार केल्यास आपल्याला त्यातील रहस्य कळून येईल. प्रथम त्यासाठी या ओवीतील सगळ्यात महत्वाचा शब्द कोणता ते ठरवू या.

मी : महाराज, माझ्या मतानं भगवंत हा शब्दच सगळ्यात महत्वाचा आहे.

महाराज : अगदी बरोबर बोललास. या शब्दाचा अर्थ आपल्याला अगोदर निश्चित केला पाहिजे. भगवंत म्हणजे देव किंवा ईश्वर,या शब्दाचे अनेक अर्थ लोकांनी केले आहेत. अगदी शेताच्या बांधावरचे छोटे छोटे देव, शेतातील क्षेत्र देवता, ग्राम देवता, वास्तू-देवता, गृह-देवता, कुलदैवत अशा अनेक देव-देवता आहेत. समर्थांनी तर अशा देव-देवतांची एक लांबलचक यादीच दासबोधात दिली आहे. खंडोबा, म्हसोबा, सटवाई, जोखाई, मरी-आई, अंबाबाई, मंगळाई, एक-विरा अशी अनेक नावं आहेत. प्रत्येक देव-देवतेचे स्वतंत्र भक्तगण असतात. यातले बहुतेक देव त्या त्या भक्तांच्या नवसाला पावणारे असतात. या देवांना नवस करून त्यांच्या कडून आपली छोटी छोटी कामं करून घेण्यात यांचे भक्त धन्यता मानत असतात.

तसंच आणखीही काहीं देव आहेत, की ज्यांची उपासना केली असता उपासकांना काही सिध्दी प्राप्त होतात. या सिध्दींच्या उपयोगाने हे भक्त महाराज किंवा स्वामी होतात व त्यांच्या भक्तांची संसार-दुःखं दूर करीत असतात. सारांश असा की भक्ती करून देवाला प्रसन्न करून घेतलं की आपलं व इतरांच कल्याण करता येईल, अशी सर्वसाधारण माणसाची कल्पना असते.

यानंतर देवाचे अवतार व इतर देव येतात. यात राम, कृष्ण, परशुराम, विष्णु, शंकर, गणपती, कार्तिकेय(मुरूगा) तसंच भवानी, पार्वती, काली, दुर्गा, वगैरे देव-देवतांचा समावेश होतो. यांची सगुण उपासना यांचे अनेक भक्त करीत असतात. यांची उपासना केल्यावर आपण सन्मार्गाला लागू, आपलं कल्याण होईल, तसंच संकटकाळी हा देव आपल्याला मदत करील, अशी या भक्तांची श्रध्दा असते. माणूस हा उत्सवप्रिय असल्यामुळे अशा देवांचे उत्सव करायला अशा भक्तांना फार आवडतं.

रामनवमी, कृष्णाष्टमी, गणेश चतुर्थी, शिवरात्र, दत्तजयंती, आषाढी कार्तिकी, एकादशा, नवरात्र वगैरे प्रसंगी हजारो भक्त एकत्र येऊन त्या देवांचे फार मोठे सोहळे, उत्सव वगैरे साजरे करतात. आता भगवंत या शब्दाचा या ओवीत अभिप्रेत असलेला अर्थ या सर्वांचा समावेशक तर आहेच आहे शिवाय याच्याही पलिकडचा सकल समावेशक असा अर्थ या शब्दात भरलेला आहे.

मी : पण महाराज, मला तर एवढेच अर्थ माहीत आहेत. यापेक्षा आणखी वेगळा काही अर्थ असू शकतो का ?

महाराज : तोच मी तुला सांगणार आहे. या शब्दावर आपल्या ऋषीमुनींनी भरपूर चिंतन केलं आहे. ईश्वर या शब्दाचा सर्वसमावेशक अर्थ विश्वनिर्माता, विश्वव्यापक, विश्वज्ञानी, विश्वनियंता व सर्वशक्तिमान् असा आहे आणि हाच अर्थ माऊलीला अभिप्रेत आहे. आता यातील एकेका शब्दाचा आपण सविस्तरपणे विचार करू या

मी : आपण विश्वनिर्माता या शब्दापासून सुरूवात करू या.

महाराज : विश्वनिर्माता म्हणजे विश्व ज्यांनं निर्माण केलं तो ईश्वर. आपण रोजच्या जीवनात पाहिलं तर प्रत्येक गोष्टीला निर्माता असतोच, असं दिसून येईल. अगदी टी.व्ही. वरच्या प्रायोजित मालिकेला सुध्दा निर्माता हा असतोच. आपल्याला लागणाऱ्या जरूरीच्या व उपभोगाच्या सर्व वस्तू ईश्वराने व माणसांनी निर्माण केलेल्या असतात. अगदी माणसासारखं बुध्दीचं काम करणारा व विजेच्या वेगानं आकडेमोड करणारा संगणकसुध्दा माणसानेच निर्माण केलेला असतो. या वस्तूंचे दोन विभाग होतात, एक म्हणजे माणसानं निर्माण केलेल्या वस्तू आणि दुसऱ्या निसर्गानं निर्माण केलेल्या वस्तू. पहिल्या प्रकारच्या वस्तूंचा निर्माता मानव असतो. पण या मानवाचा निर्माता कोण? तर ईश्वर, तसंच नैसर्गिक वस्तू कोणी निर्माण केल्या ? ईश्वराने. या दोन्ही प्रश्नांची उत्तरं शास्त्रज्ञ शेकडो वर्षे शोधत आहेत व तेही त्यांचा निर्माता म्हणून एका अज्ञात शक्तीचं अस्तित्व मान्य करण्याच्या अवस्थेपर्यंत आले आहेत. म्हणून सर्वच सृष्टी ईश्वराने निर्माण केली असं म्हणावं लागतं आणि कोठल्याही वस्तूच्या पूर्वी तिचा निर्माता असतोच या न्यायाने या सृष्टीच्या पूर्वी तिचा निर्माता ईश्वर हा असलाच पाहिज़े. फक्त एकच फरक आहे की मानवी निर्मति हे वस्तूच्या निर्मितीनंतर किती दिवस राहतील हे सांगता येत नाही, पण ईश्वर मात्र अनादि व अनंत असल्यामुळे या विश्वाचा नाश झाल्यावरही तो असतोच व पुन्हा केव्हाही त्याच्या संकल्पाप्रमाणे तो हे विश्व

निर्माण करू शकतो.

मी : म्हणजे या सबंध विश्वालाहीं जन्म व मृत्यू असतो की काय?

महाराज : होय. कारण सृष्टीतील प्रत्येक सजीव वस्तू (प्राणी) जन्मते, मोठी होते, काही काळ जगते व शेवटी मृत्यूच्या आधीन होते. जायते, वर्धते, विपरिणमते, शीर्यते, नश्यते म्हणजे त्यातला जीव निघून जातो व राहिलेलं निर्जीव शरीर हे इतर सजीव प्राण्यांचं भक्ष्य बनतं. सजीव प्राणी हे निर्जीव वस्तूंपासून बनले आहेत. एका निर्जीव वस्तूचं दुसऱ्या वस्तूत रूपांतर होत राहतं. जसं पाण्याचं बर्फ आणि वाफ होते.तसंच हायड्रोजन व ऑक्सिजन एकत्र येऊन त्यांच्यापासून पाणी तयार होतं. म्हणून आपण त्यांना जन्म व मृत्यू हे शब्द वापरत नाही. त्याऐवजी बदल किंवा रूपांतर हे शब्द उपयोगात आणतो. म्हणून या विश्वालाही जन्म व मृत्यू किंवा व्यक्तातून अव्यक्तात व त्यातून पुन्हा व्यक्तात असा बदल हा असलाच पाहिजे आणि हे सर्व ज्याच्या प्रेरणेनं घडतं तो ईश्वर.

मी : पण महाराज, या विश्वाचा जन्म आपोआप झाला नसेल काय ?

महाराज : (हसून) अरे, या विश्वात कोठलीही गोष्ट आपोआप घडत नाही. या जगातील प्रत्येक गोष्ट ही कार्यकारण-भावाने बांधली गेली आहे. जोपर्यंत एखाद्या गोष्टीची कार्य-कारण परंपरा समजत नाही तोपर्यंत ती आपोआप घडते असं आपल्याला वाटतं आणि या जिज्ञासेतूनच विज्ञानाचा उगम झाला आहे. म्हणून प्रत्येक गोष्टीला कारण हे असतंच. पण कारण शोधण्याची जिज्ञासा असली की ते आज ना उद्या सापडतंच. तसंच या सृष्टीच्या जन्माचं कारण म्हणजे ईश्वरी संकल्प किंवा प्रेरणा.

मी : महाराज, इथपर्यंत समजलं पण सृष्टीच्या या निर्मात्याचे गुणधर्म सृष्टीच्या जन्मापूर्वी काय असू शकतील ?

महाराज : आपल्या बुध्दीच्या मदतीने विचार केला तर तो अनंत,अव्यक्त, सर्वशक्तिमान असला पाहिजे.

मी : कशावरून ?

महाराज : कारण या विश्वातील सर्व वस्तू सांत आहेत. सांत म्हणजे मर्यादित आकार असलेली वस्तू म्हणजेच या वस्तूच्या पलीकडे आणखीन काहीतरी वस्तू किंवा पोकळी असली पाहिजे. आता हा निर्माता सांत असेल तर त्याच्याही पलीकडे काहीतरी असलं पाहिजे. मग पलिकडच्या "काहीतरी"चा निर्माता कोण असला पाहिजे?

तो जर दुसरा कोणी असेल तर या दोन्ही निर्मात्यांचा मूळ निर्माता एकच असला पाहिजे आणि त्या मूळ निर्मात्यालाच आपण ईश्वर म्हणतो. या पध्दतीने विचार केल्यास ईश्वर अनंत आहे, असंही आपल्या लक्षात येईल. तसंच तो अव्यक्तही आहे. कारण आपल्या पंचेद्रियांना गोचर होणारी कोणतीही वस्तू सांत किंवा मर्यादित असते. उदा. आपल्या डोळ्यांना दिसणारे तारे मोठ्यात मोठे असले तरी तेही सांतच असतात, असं खगोलशास्त्रज्ञ सांगतात. तेव्हा सृष्टी हे ईश्वराचं व्यक्त स्वरूप आहे. म्हणून ही सृष्टी ज्याच्यात विलीन होते तो ईश्रर अव्यक्त असला पाहिचे आणि तो सृष्टीच्या रूपाने व्यक्त होतो एरवी तो अव्यक्त स्वरूपात असतो.

मी : आणि त्याला सर्वशक्तिमान का म्हणयचा ?

महाराज : कारण केवळ संकल्पाने म्हणजे इच्छा मात्रेकरून एवढी प्रचंड सृष्टी त्याने निर्माण केली म्हणून तो सर्वशक्तिमान असला पाहिजे. म्हणजेच त्याची शक्तीही अमर्याद असली पाहिजे. इथे एक गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे.

मी : ती कोणती, महाराज ?

महाराज : आपण विज्ञानात एनर्जी म्हणजेच निर्जीव ऊर्जा (जिच्यावर माणसाची हुकमत चालते) हा शब्द जशा अर्थाने वापरतो, तशा अर्थाने इथे वापरलेला नाही तर चैतन्याने रसरसलेली व या विश्वात स्थिरता अथवा गतिमानता निर्माण करणारी शक्ती असा या शब्दाचा अर्थ आहे. माऊलीने अमृतानुभवात शिव आणि शक्ती असे दोन शब्द वापरले आहेत. त्यातला शक्ती या शब्दाचा अर्थ सर्वशक्तिमान या शब्दामध्ये अभिप्रेत आहे.

मी : आणि शिव म्हणजे काय ?

महाराज : सृष्टीपूर्वीच्या अनंत, अव्यक्त आणि सर्वशक्तिमान अशा ईश्वरासाठी माऊलीने शिव हा शब्द वापरला आहे.

मी : पण महाराज, सृष्टीच्या पूर्वी तर काहींच नव्हतं फक्त ईश्वरच होता. मग या ईश्वराने ही सृष्टी कशापासून निर्माण केली असावी ?

महाराज : वा वत्सा, फारच चांगला प्रश्न विचारलास, तुजप्रत कल्याण असो!

मी : (विनोदाने) महाराज, हल्ली कधीकधी मुलाखतीत कोणीही कितीही फालतू प्रश्न विचारला तरी उत्तरदाता प्रश्नकर्त्याला खूष करण्यासाठी "वा प्रश्न फारच चांगला विचारला आहे.", असं म्हणून उत्तराला सुरुवात करतो. मग उत्तर कसंही असलं

तरी प्रश्नकर्त्याला "अहो रूपं, अहो ध्वनी" या न्यायाने त्याच्या विरूध्द आवाज करता येत नाही. तसं तुम्ही माझ्या प्रश्नाविषयी म्हणता आहात कां ?

महाराज : नाही, तुझा प्रश्न खरोखरच मुळाशी नेवून सोडणारा आहे. आणि त्याचं उत्तरही आपण अगदी मुळापाशी जाऊन शोधू या. तेव्हा प्रथम या बाबतीत तुला काय वाटतं ते सांग.

मी : मला वाटतं, माणूस जेव्हा एखादी निर्मिती करतो तेव्हा सभोवतालच्या जगातून काही वस्तू घेवून त्यावर त्यांच्या गुणधर्मानुसार काही प्रक्रिया करून त्यांची जोडणी करून त्यातून नवीन वस्तू तयार करतो. उदां. पंखा, टी.व्ही. वगैरे. यांचा अर्थ कोठल्याही निर्मितीला बाह्य वस्तूंची व निर्मात्याची गरज ही लागतेच. आता सृष्टी निर्माण होण्यापूर्वी जर काहीच नव्हतं तर ईश्वरानं ही सृष्टी कशापासून निर्माण केली असावी ?

महाराज : तू जे सांगितलंस त्यासंबंधी आपल्या शास्त्रात निमित्त कारण आणि उपादान कारण अशी दोन नावं आहेत. "कारण" असलेल्या ज्या वस्तूचा "कार्यात" प्रवेश असतो त्याला उपादान कारण असं म्हणतात व ज्याच्यामुळे तो होतो त्याला निमित्त कारण असं म्हणतात. उदा. आपण आपल्या सोन्याचे दागिने सोनाराकडून बनवून घेतो, म्हणजेच तो आपले दागिने वितळवून त्या सोन्यापासून नवीन दागिने बनवतो व आपल्यालाही बनवतो. या ठिकाणी सोनं हे उपादान कारण आहे आणि सोनार हे निमित्त कारण आहे. कारण एका सोनाराचा भाव आपल्याला पटला नाही तर आपण ते सोनं दुसऱ्या सोनाराकडे घेवून जातो. याला कारण आपल्याला सोनार कोठलाही चालतो, पण दागिना मात्र आपल्याच सोन्याचा हवा असतो. गीतेमध्ये सुध्दा भगवान् श्रीकृष्ण अर्जुनाला "निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् " असं सांगतात. याचा अर्थ "तू फक्त कौरवांच्या नाशाला निमित्त हो. कारण त्यांचा वध तुझ्या हातून होणार आहे, हे नियतीनं अगोदरच ठरवलं आहे. तेव्हा तू या नाशाला फक्त निमित्तकारण होणार आहेस" तेव्हा तुझ्या प्रश्नाचं उत्तर काय असावं असं तुला वाटतं ?

मी : महाराज, ईश्वराने स्वतःपासूनच या विश्वाची निर्मिती केली असावी असं माझ्या अल्पमतीला वाटतं.

महाराज : शाबास, अगदी १०० टक्के उत्तर बरोबर आहे. ईश्वराने म्हणजे त्या अनंत, अव्यक्त, सर्वशक्तिमान अशा त्या तत्वाने आपल्या स्वतःपासूनच व स्वतःमधूनच

या विश्वाची निर्मिती केली असावी. अगदी साध्या व सोप्या भाषेत सांगायचं म्हणजे त्या अव्यक्त तत्वानं आपल्या शक्तीच्या मदतीनं विश्वातील सर्व वस्तूंची व्यक्त रूपं धारण केली असावीत व त्यांचे गुणधर्महीं त्यानंच निश्चित केले असावेत. अगदी इलेक्ट्रॉन् पासून या ब्रम्हांडापर्यंत सर्व काही तोच झाला आहे. म्हणून "कणकणमे भगवान" अशी आपल्याकडे म्हणच आहे.

मी : (गंमतीने) म्हणजे महाराज, उद्या मला जरासा ताप आला तर "मेरे कणकणमे रहनेवाले भगवान को जरासी कणकण आयी है" असं म्हणायला हरकत नाही. बरं, ते असो. महाराज, इथे मला एक शंका येते की भगवंताला स्वतःपासूनच जगाची उत्पत्ती कशी काय करता आली ? याबद्दल तुम्हाला काही माहिती आहे कां ? किंवा तुमच्याकडे काही पुरावा आहे कां ?

महाराज : अरे, रग्गड पुरावा आहे. तुला तो ॲटम् बॉंब माहिती आहे ना ?

मी : (चेष्टेने) जो आपण दिवाळीच्या फटाक्यात आणतो व ज्यानं आपल्या कानठळ्या बसतात तो ॲटम् बॉंब कां ?

महाराज : तो नाही रे. मी त्या ॲटम् बॉंबविषयी बोलतोय की ज्यानं १९४५ साली जपानमधील हिरोशिमा व नागासाकी ही दोन प्रचंड लोकसंख्या असलेली शहरं भस्मसात् केली.

मी : तो होय ! माहित आहे ना. पण त्याचा इथे काय संबंध ?

महाराज : हा ॲटम् बॉंब कसा तयार केला जातो हे तुला माहित आहे का ?

मी : नाही बुवा. पण तो प्रचंड विध्वंसक शक्तीने भरलेला असतो, इतकंच मला माहित आहे.

महाराज : या बॉंबची निर्मिती कशी होते ते तुला सांगतो. किरणोत्सर्गी युरेनिअमवर न्युट्रॉन्सचा मारा केला असता त्याच्या अणू-केंद्रकाचं विभाजन होतं व त्यात त्याचं बेरिअम व क्रिप्टॉन् या दोन मूलद्रव्यात रुपांतर होतं. आता या दोन्ही मूलद्रव्याच्या अणूंच्या वस्तूमानाची बेरीज युरेनिअमच्या अणूच्या वस्तूमानापेक्षा कमी भरते. म्हणजे या कमी झालेल्या वस्तूमानाचा नाश होतो व या वस्तूमानाचं रूपांतर अति प्रचंड ऊर्जेत होतं. याचं सूत्र जगद्विख्यात शास्त्रज्ञ आईन्स्टाईन्नं सांगितलं आहे ते असं आहे.

$ऊ = व \times ग^2$

इथे ऊ = ऊर्जा, व = नाश पावलेलं वस्तुमान, ग = प्रकाशाची गती = $३ \times १०^{५}$ कि.मी./सेकंद

मी : पण महाराज, मी तर असं ऐकलं आहे की अणूचं वजन अगदी नगण्य असतं म्हणून. मग या नाश पावलेल्या वस्तुमानातून अशी कितीशी ऊर्जा बाहेर पडणार आहे ?

महाराज : अरे, कमी होणारं वस्तुमान जरी नगण्य असलं तरी त्याला प्रकाशाच्या गतीच्या वर्गानं गुणलं जात असल्यामुळे प्रचंड ऊर्जा निर्माण होते. या ऊर्जेचा विनाशासाठी उपयोग केल्यामुळे जपानमधली लाखो निरपराध माणसं नाहक मारली गेली.

मी : (हळहळत) अरेरे, या ऊर्जेचा निर्मितीसाठी उपयोग केला गेला असता तर किती बरं झालं असतं नाही ?

महाराज : अरे भगवंतानं नेमकं तेच केलंय भगवंत हा सर्वशक्तिमान असल्यामुळे त्यानं आपल्या शक्तीचा संकोच करून म्हणजेच ती घनीभूत करून त्यातून वस्तूंचे प्रोटॉन, मेसॉन, न्युट्रॉन, इलेक्ट्रॉन वगैरे मूलकण निर्माण केले व यापासून तयार झालेल्या वस्तूंच्या अणूंना वेगवेगळे गुणधर्म बहाल केले. एवढी माहिती तुझ्यासाठी पुरे आहे ना ?

मी : (आश्चर्याने) महाराज, हे सर्व तुम्हाला कसं काय माहित झालं ?

महाराज : अरे, या ईश्वराचं कौतुक समजावून घेण्यासाठी मी या शास्त्रांचा अल्पस्वल्प अभ्यास केला आहे. मला तर असं वाटतं की ईश्वराच्या प्रत्येक भक्तानं आपली ईश्वरावर असलेली श्रध्दा दृढ होण्यासाठी अणू, शरीर, रसायन व खगोल इत्यादि शास्त्रांचा अभ्यास केला पाहिजे. असो, तर मी काय सांगत होतो की शास्त्रज्ञाना लागलेल्या शोधानुसार ही मूलकणांची यादी मारूतीच्या शेपटासारखी वाढतच चालली आहे. १९६५ पर्यंत सापडलेल्या मूलकणांची संख्या ४१ इतकी होती. यानंतर क्वार्क या सहा प्रकारच्या व तितकेच प्रति-क्वार्क म्हणून एकूण १२ मूलकणांचा शोध लागला. यांच्या विविध प्रकारच्या एकत्र येण्यानं वरील मूलकण तयार होतात. शिवाय यांच्या जोडीला सहा प्रकारचे लेप्टॉन्स् व सहा प्रकारचे प्रति-लेप्टॉन्स् असे एकूण चोवीस प्रकारचे मूलकण या विविधतेनं नटलेल्या विश्वाचे मूलभूत घटक आहेत असं आज तरी शास्त्रज्ञ मानतात.

मी : म्हणजे जसे दत्ताने २४ गुरू केले तसे या विश्वाचे मूलाधार असे २४ मूलकण

आहेत असं म्हणतात. पण, महाराज, हे सर्व शास्त्रीय ज्ञान माझ्या अक्षरशः डोक्यावरून जातंय. तेव्हा या संबंधात एखादं घरगुती उदाहरण सांगा ना ?

महाराज : अरे, उदाहरणांना काय तोटा ? हे पहा. रविवारी सकाळी तुझा काय कार्यक्रम असतो ?

मी : रविवारी सकाळी मला खूप उशीरा उठावंसं वाटतं. पण आमची "ही" कसली वस्ताद ! ती मला पहाटेच उठवून घराची साफसफाई करायला लावते.

महाराज : साफसफाई ? म्हणजे तुला काय काय करावं लागतं ?

मी : हेच हो नेहमीचंच. कॉटच्या खालच्या वस्तू बाहेर काढून ती जागा झाडून घेणे, पंखे पुसणे, ट्युब लाईट साफ करणे, तसंच छतावरची कोळीष्टकं काढून टाकणे वगैरे वगैरे.

महाराज : याचा अर्थ तू कोळीष्टकं अगदी जवळून पाहिली असशील ?

मी : होय महाराज, काही काही कोळीष्टकं तर इतकी सुंदर दिसतात की ती मोडू नयेत असं वाटतं. पण काय करणार ? आमची ही सुपरवायझरसारखी मागे झाडू घेवून उभीच असते ना !

महाराज : (चेष्टेने) "Those who think themselves to be superwise are generally otherwise" असं एका तत्ववेत्यानं म्हटले आहे. असो. आता कोळी हे धाग्याचं सुंदर घर कसं करतो माहित आहे ना ? तो आपल्याच पोटातून एक चिकट स्राव बाहेर काढतो आणि त्या स्रावापासून तो एक तंतू-धागा तयार करतो आणि त्यापासून आकर्षक असं जाळं तयार करतो व एखादी माशी किंवा किडा त्यात अडकला की लांब टपून बसलेला कोळी "माझ्या जाळ्यात गावली माशी " असं म्हणत तिच्या जवळ येतो व तिला आपल्या पोटात रिचवतो आणि ज्या पोटातल्या स्रावापासून हे जाळं विणलं त्या पोटावरून हात फिरवत फिरवत छानशी ढेकर देतो. ईश्वराने स्वतःपासून सृष्टी निर्माण केली व ती त्यामध्येच विलीन पावते हे सांगण्यासाठी कोळ्याचं उदाहरण आपल्या शास्त्रात सांगितलं आहे.

मी : याचाच अर्थ असा की मला दिसणारी किंवा भासणारी प्रत्येक वस्तू हे भगवंताचंच रूप आहे.

महाराज : म्हणजेच अनंत असा भगवंत प्रत्येक वस्तूच्या रूपाने साकार झाला आहे आणि अव्यक्त असा भगवंत प्रत्येक वस्तूच्या रूपांत व्यक्त झाला आहे आणि

वस्तूतील मर्यादित शक्तीच्या रूपाने तो सर्वशक्तिमान भगवंत अल्पशक्तिमान झाला आहे. तसंच वस्तूंचे आपल्या इंद्रियांच्या माध्यमातून आपल्याला समजणारे गुणधर्म हे त्या सगुण साकार झालेल्या भगवंताचेच गुणधर्म आहेत. त्या वस्तूंचे ते स्वतंत्र गुणधर्म नव्हेत. आता चराचरात भगवंत भरला आहे, याचा अर्थ आपण एखाद्या पोत्यात गहू ठासून भरतो तसा भगवंत वस्तूत भरलेला नाही. तर त्याने या वस्तूंचे गुणधर्म धारण केलेले आहेत. असा सर्वव्यापक या शब्दाचा अर्थ आहे.

मी : महाराज, आता पुढचा शब्द काय आहे ?

महाराज : विश्वनिर्माता, सर्वव्यापक यानंतर सर्वज्ञानी. या शब्दाविषयी फार सांगायला नको. कोठल्याही निर्मात्याला आपल्या निर्मितीचं पूर्ण ज्ञान असतंच. तसंच त्यात काही बिघाड झाला तर तो दुरूस्त करण्याचंही ज्ञान त्याला असतंच. म्हणून या सृष्टीतील सर्व घडामोडींचं ज्ञान भगवंताला असलंच पाहिजे. याकरिता आपल्या आयुष्यात आपल्या मतानं काही बिघाड होतो तेव्हा आपण या सर्वज्ञानी ईश्वराचा धावा करतो. बाबारे, असशील तिथून धावत ये, माझी लाज राख, असं सागंतो व नवसफेडींच्या रूपानं आपण त्याची व्हिजिट फी देऊ असंही त्याला आश्वासन देतो (नंतर आपण ते आश्वासन सोईस्करपणे विसरून जातो ही गोष्ट वेगळी.)

मी : महाराज, याचा अर्थ माझ्या मनातला प्रत्येक विचारन् विचार त्याला कळत असणार ?

महाराज : अगदी बरोबर. आपल्या हृदयस्थ ईश्वराला आपलं सर्वच ज्ञान असतं, इतकंच नव्हे, त्याच्या इच्छेनेच हे विचार आपल्या मनात येत असतात. पण आपण त्याविषयी नंतर बोलू. आता त्याच्या नंतरचा शब्द विश्वनियंता. या सृष्टीत सर्वत्र नियमबध्दता दिसून येते. याचं कारण ईश्वरानेच हे नियम घालून दिले आहेत. अगदी सूर्य चंद्र सुध्दा त्याने घालून दिलेल्या चाकोरीतून भ्रमण करीत असतात. जसं ईश्वराने वस्तूंच्या रूपांने गुणधर्म धारण केलेले आहेत, तसंच दोन वस्तू विशिष्ठ परिस्थितीत एकत्र आल्यानंतर विशिष्ट बाह्य किंवा आंतर्दबावामुळे त्यांच्यातून जी तिसरी वस्तू निर्माण होते तिचे गुणधर्मही त्यानेच निश्चित केले आहेत व त्याची इच्छा असल्यास ते बदलू शकतात. म्हणूनच ज्वलनाला मदत करणारा ऑक्सिजन व ज्वालाग्राही हायड्रोजन यांच्यापासून जे पाणी निर्माण होतं त्यांने आग विझवता येते किंवा रॉकेलने पेटलेला काकडा रॉकेलच्याच बाटलीत बुडवला तर विझून जातो. ही त्या भगवंताचीच किमया.

विज्ञानाचा अभ्यास करताना ही गोष्ट प्रामुख्याने जाणवते. अगदी १०$^{-८}$ से.मि. या त्रिज्जेत दर सेकंदाला १०$^{+८}$ से.मि. या गतीने अणूकेंद्राभोवती फिरणारा १०$^{-१३}$ से.मि. या आकाराचा सूक्ष्म इलेक्ट्रॉन इथपासून ते ज्यांचा आकार अनेक घनप्रकाश वर्षे इतका प्रचंड आहे व जिथे दोन ताऱ्यातील अंतरसुध्दा कित्येक प्रकाशवर्ष आहे असे राक्षसी तारेसुध्दा त्या भगवंताच्या नियमांनी बध्द असतात. हे सर्व नियम शोधून काढून विज्ञानाच्या मदतीने त्यांचा उपयोग आपल्या सुखसोयीसाठी करणं हे आपलं काम असतं. फक्त विज्ञान शास्त्रात ईश्वराऐवजी निसर्ग हा शब्द वापरतात.

मी : (आश्चर्याने) पण महाराज ज्या ईश्वराचा आपण पिढ्यान् पिढ्या युगानुयुगे शोध करीत आलो आहोत तो ईश्वर इतका सहजसुलभ व इतका जवळ असतो हे आम्हाला इतके दिवस का समजलं नाही?

महाराज : त्याचं कारण असं की भगवंत हा या सृष्टीच्या बाहेर कोठेतरी लांब आकाशात असतो आणि तिथून तो सृष्टीचं नियमन करतो, अशी आपली पूर्वापार समजूत करून दिली गेली आहे. शिवाय या सृष्टीत भगवंतानेच अशी किमया करून ठेवली आहे की आपला सर्व व्यवहार भगवंताच्या स्मरणाशिवाय सुरळीतपणानं चालू शकतो. भगवंताशिवाय कोणाचंही काही अडत नाही. आता तुझंच पहा ना, इतके दिवस तुझं भगवंताशिवाय काही अडत होतं का? नाही ना ! तसंच सगळ्यांच होतं. फक्त संत, सत्पुरुष आणि भक्त याला अपवाद आहेत. या मंडळींनी सृष्टीतल्या सृष्टीनियंत्या आणि सृष्टीमय देवाला बरोबर ओळखला आहे. "वृक्षाचेही पान हाले त्याची सत्ता । राहिली अहंता । मग कोठे ।।" आणि "कोणे केली बाळा । दुग्धाची उत्पत्ती । वाढवी श्रीपती । सवे दोन्ही ।।" असं तुकाराम महाराज म्हणतात. कासयाने पूजा । करू केशीराजा । हाचि संदेह आता । फेडी माझा । उदके न्हाणू तरी तुझे ते स्वरूप ।। असंही ते म्हणतात. तर संत सावता माळ्याच्या जीवनातील अनुभूतीसंबंधी दासगणू महाराज म्हणतात . . .

विठ्ठल वापी, विठ्ठल मोट, विठ्ठल नांद्या बैल ग ।
विठ्ठल बेणे, विठ्ठल उगवे, विठ्ठल सारे शेत ग ।।
तूही विठ्ठल, मीही विठ्ठल, विठ्ठल अवघे विश्व ग ।
घडीघडी विठ्ठल विठूस भेटे मग का व्हावे अधीर ग ।।

म्हणून सर्वत्र विठ्ठल आहे, विश्वात विश्वंभर आहे हे समजल्यामुळे त्यांची वेगळ्या

विठ्ठलदर्शनाची अधीरता पार पळून गेली. त्याऐवजी ईश्वराच्या सर्व व्यापकतेतून येणारी निश्चिंतता आली. कारण हे ज्ञान एकदा झालं की मग ईश्वराला विसरायचं म्हंटलं तरी अशक्य होतं. माऊलीही असंच म्हणते

"म्हणौनि विश्वपण जावे । मग ते माते घेयावे ।
तैसे नव्हे आघवे । सकटची मी ।।"

अर्थ : मला शोधण्यासाठी विश्वाला बाजूला सारण्याची गरज नाही. कारण विश्व हे माझंच रुप आहे. विश्व हा शब्द विश् या धातूपासून झाला आहे. विश् म्हणजे प्रवेश करणे. म्हणून ज्याच्यात प्रवेश केला ते विश्व आणि ज्यानं प्रवेश केला तो विष्णू. म्हणून विष्णू हा या विश्वाचा पालनकर्ता आहे असं आपल्या शास्त्रांत मानलं आहे. जसं एखाद्या मोटार कंपनीच्या मालकाने आपल्या कारखान्यात तयार झालेल्या मोटारीत प्रवेश करून ती चालवावी तसं भगवान् विष्णू हे विश्व चालवत असतात.

* * *

# प्रकरण २

## पूर्व नियोजित ईश्वरी संकल्प

मी : तेव्हा सारांश असा की भगवंत या शब्दात विश्वनिर्माता, विश्वव्यापक, विश्वज्ञानी, विश्वनियंता व सर्वशक्तिमान इतके अर्थ अभिप्रेत आहेत. याशिवाय आणखीन काही राहिलं आहे काय? की यात सगळं काही आलं ?

महाराज : आणखी यात एक गोष्ट महत्वाची शिल्लक राहिली आहे. गोंदवलेकर महाराज म्हणायचे की राम कर्ता आहे हे समजलं पाहिजे. ते लिहितात की . . .

" यत्न कसून करिन मी, यश दे रामा, न दे, तुझी सत्ता ।
हाचि सुबोध गुरुंचा मानावा राम सर्वथा कर्ता ।।"

तेव्हा विश्वनिर्माण झाल्यापासून ते लयास जाईपर्यंत त्यांत असंख्य घडामोडी होत असतात. त्यापैकी काही ठिकाणी स्थिरता व इतर ठिकाणी गतिमानता दिसते. या सर्व घडामोडी, घटना व प्रसंग ईश्वरी संकल्पाप्रमाणे घडत असतात. म्हणून आपल्याकडे "ईश्वरेच्छा बलीयसी" असं म्हणतात. सर्वच गोष्टीतून त्याची शक्ती प्रगट होत असते म्हणून या घटनांना ही शक्ती कारण किंवा जबाबदार असते. यात सगळ्यात आश्चर्यकारक आणि अविश्वसनीय वाटणारी गोष्ट म्हणजे या सर्व घटना भगवंताने सृष्टी निर्माण करण्याच्या अगोदर ठरवलेल्या असतात म्हणजे त्या पूर्व नियोजित असतात. यालाच पूर्व नियोजित ईश्वरी संकल्प असं म्हणतात.

मी (विस्मयाने) : काय, सांगता काय महाराज? मी माझ्या बुद्धीने एखादी गोष्ट करायची असं ठरवतो तेव्हा तीही पूर्वनियोजित असते काय? तसं असेल तर माझ्या व्यक्तिस्वातंत्र्याला काहीच अर्थ नाही असं म्हणावं लागेल.

महाराज : अरे, स्वतः तू सुद्धा जिथे ईश्वराच्या शक्तीचा अंश आहेस आणि तुझं शरीर हेही ईश्वराचं रुप आहे तिथे तुझ्या "मी" पणाला किंवा अहंकाराला स्वतंत्र स्थान आहेच कुठे? कारण आपण सर्वच ईश्वराची विविध रुपं असून आपल्या माध्यमातून त्याने विविध गुणधर्म धारण केले आहेत व आपल्या जीवनाच्या माध्यमातून त्याचा पूर्वनियोजित ईश्वरी संकल्प प्रकट होत असतो. व ईश्वरीसंकल्प प्रकट होत राहण्यापलीकडे आपल्या जीवनात इतर काही घडतच नाही. आता हा ईश्वरी संकल्प सामान्य जीवाला अगोदर कळू नये असाच जीवाच्या बाबतीत ईश्वराचा नियम असल्यामुळे आपल्याला VImp

तो अगोदर कळत नाही. म्हणून आपल्या बुद्धीच्या मदतीने आपल्या हातून ज्या क्रिया घडतात त्या आपण करतो व त्या करण्याचं किंवा न करण्याचं स्वातंत्र्य आम्हाला आहे असं आपल्याला उगाचच वाटत रहातं. आपण घेतलेल्या निर्णयानुसार आपण जे कर्म करतो व ज्याला आपण माझा प्रयत्न असं म्हणत असतो तेच मुळी पूर्वनियोजित ईश्वरी संकल्पानुसार घडलेलं असतं. पण भ्रामक अशा "मी" पणामुळे आपल्याला मी ते केलं असं वाटत असतं. पण खरं म्हंटलं तर ईश्वर किंवा रामच कर्ता असतो व त्याच्या संकल्पाप्रमाणे आपल्या जीवनात व विश्वात घटना घडत असतात.

मी : महाराज, हा डोस फारच स्ट्रॉंग आहे हो. ही गोळी गिळायला फारच कठीण आहे. आपण म्हणता तेव्हा ते तसं असेलही. पण महाराज, यासंबंधी आपल्याकडे काही पुरावा आहे का ?

महाराज : मानला तर पुरावा सुद्धा आहे. तुझ्या आयुष्यात तुला अशी कोणी व्यक्ती भेटली होती का? की जी भविष्यात काय घडेल ते सांगू शकत होती ?

मी : नाही बुवा, मला तरी असं कोणी भेटलं नाही. नाही म्हणायला काही कुडमुडे ज्योतिषी भेटले होते. पण त्यांनी सांगितलेली बहुतेक भविष्य खरी झालीच नाहीत. पण महाराज तुम्हाला असं कोणी भेटलं होतं का?

महाराज : हो, ईश्वरकृपेने मी अशा काही माणसांना पाहिलं आहे की जे भविष्यात काय घडेल ते आपल्या अभ्यासामुळे सांगू शकत होते आणि ते तंतोतंत खरं ठरत असे. आता तूच मला सांग, भविष्यातल्या घटना पूर्वनियोजित असल्याशिवाय याना त्या समजल्या कशा ? आपल्या सर्वांच्याच बुद्धीत असं एक केंद्र आहे की जे जागृत झालं असता आपल्याला पुढे काय घडणार ते अचूक कळू शकतं. पण ते केंद्र जागृत करण्यासाठी खूप योगाभ्यास करावा लागतो. आता या जागृत झालेल्या केंद्राला भविष्यातील ज्या घटना समजतात त्या काय त्याक्षणीच नियोजित केलेल्या असतात का? नाही. तर त्या सृष्टीच्या जन्माच्या अगोदरच नियोजित केलेल्या असतात.

या संबंधात एक उदाहरण पाहू या. समजा, मुंब्राच्या डोंगरावर एखादा माणूस बसला आहे आणि त्याचे दोन मित्र मुंब्राच्या रस्त्यावरून एकमेकाकडे येत आहेत. रस्ता वळणदार असल्यामुळे ते एकमेकांना दिसत नाहीत म्हणून थोड्याच वेळात आपली भेट होणार आहे हे त्यांना माहित नाही. पण वरच्या बाजूला डोंगरावर बसलेल्या त्यांच्या मित्राला मात्र हे थोड्याच वेळात एकमेकांना भेटणार आहेत हे समजतं. तसंच

दुसरं उदाहरण भृगु संहितेचं आहे. भृगु ऋषींनी जी संहिता लिहिली आहे त्यात प्रत्येक माणसांच भूत-भविष्य लिहून ठेवलेलं आहे असं म्हणतात. माझ्या एका मित्रानं तिचा अनुभव घेतला आहे. त्या संहितेत सांगितलेला त्याचा भूतकाळ अगदी तंतोतंत जुळला होता असं तो मला सांगत होता. आता भृगु ऋषींना झालेलं हे ज्ञान पूर्वनियोजित ईश्वरी संकल्पाप्रमाणेच झालं व त्यांनी झालं तसं लिहून ठेवलं. तसंच कृष्णानेही युध्दात अर्जुनाला भविष्यातला कौरवांचा नाश अगोदरच दाखवला होता. सारांश असा की तुला पटो अगर न पटो पण नुसतं आपल्या आयुष्यातच नव्हे तर या अखिल विश्वातसुद्धा प्रत्येक क्षणी जे घडत असतं ते सर्व पूर्वनियोजित ईश्वरी संकल्पानुसारच घडत असतं. यात मला तरी संशय वाटत नाही.

मी : (कुतुहलाने ) म्हणजे आत्ता या क्षणी आपण दोघे बोलत बसलो आहोत तेसुद्धा अगोदरच ईश्वरी संकल्पानुसार ठरलेलं आहे?

महाराज : यात मला शंकाच वाटत नाही. म्हणून वर्तमान काळातील चालू क्षण ईश्वरी संकल्पाचं प्रकटीकरण होण्याचा क्षण असतो असं म्हणता येईल. भविष्यकाळ म्हणजे आपल्याला अज्ञात असलेला ईश्वरी संकल्प व भूतकाळ म्हणजे ज्ञात असलेल्या ईश्वरी संकल्पाचा स्मृतीतील ठेवा. आपलं जीवन हे सारं मुळी एखाद्या कॅसेटसारखं असतं. कॅसेटची एक बाजू भरलेली असते व दुसरी मोकळी असते. कॅसेट फिरू लागली की भरलेलं चाक मोकळं होऊ लागत व मोकळं चाक टेपने भरु लागतं आणि टेपच्या ज्या बिंदूचा यंत्राशी स्पर्श (Contact) होईल तितका भाग दिसतो किंवा ऐकू येत रहातो. भविष्यकाळ हा वर्तमानाच्या द्वारा भूतकाळात विलीन होत असतो. म्हणजेच आपला सर्व भूतकाळ हा आपल्याला ज्ञात असा ईश्वरी संकल्प असतो. आणि याच्या आधाराने आपली बुद्धी वर्तमानकाळात कृती करत रहाते. हीही कृती पूर्व नियोजित ईश्वरी संकल्पानुसारच घडत रहाते. आणि आपण मात्र मी ठरवलं तसं झालं म्हणून सुखी होतो व नाही घडलं म्हणून दुःखी होतो. ईश्वरी संकल्पाप्रमाणेच सर्व घटना घडत असतात, या वस्तुस्थितीच्या अज्ञानामुळे हे सुख-दुःख निर्माण होत रहातं. एक विनोद सांगतो - एकदा काही दरोडेखोरांनी बँकेवर दरोडा घातला व ते रात्री घरी येऊन वाटणी करण्यासाठी नोटा मोजत बसले. नोटा मोजण्याची सवय नसल्यामुळे त्यांना ते काम जमेना, त्यातला एक चोर तुझ्यासारखा हुशार होता, तो म्हणाला, "गड्यांनो, आत्ता या नोटा मोजायच्या फंदात कशाला पडता ? आपण किती पैसे चोरले हे उद्या

सकाळी पेपरांत येईलच की, मग त्याप्रमाणे पैसे वाटून घेऊ, तसं ईश्वरी संकल्पाप्रमाणे सर्व घटना घडतच असतात. आपण मात्र नाहक त्यांच कर्तृत्व आपल्याकडे घेऊन सुख-दुःखाच्या डबक्यात गटांगळ्या खात बसतो.

मी : महाराज, मलाही अशीच एक मजेशीर गोष्ट आठवते. एकदा एक गावाकडचा माणूस प्रथमच शहरात आला व गाडीत बसला. आपली वळकटी त्याने इतरांचं बघून वर सामानाच्या फळीवर ठेवली. थोड्या वेळानं त्याला काय वाटलं कुणास ठावूक त्यानं आपली वळकटी खाली काढली व ती डोक्यावर घेऊन बसला. असं का केलं म्हणून इतरांनी विचारल्यावर तो म्हणाला उगाच माझ्या सामानाचं गाडीला ओझं नको. म्हणून माझी वळकटी मी माझ्या डोक्यावर घेऊन बसलो आहे. आता वळकटी डोक्यावर घेतली म्हणून गाडीचं ओझं कमी होणार आहे का?

महाराज : आपणही या शेतकऱ्यासारखे ईश्वरी संकल्पामुळे घडणाऱ्या घटनांचं ओझं आपल्या कर्तृत्वाच्या वळकटीच्या रुपाने उगाचच स्वतःच्या डोक्यावर घेऊन बसलेले असतो. म्हणून वरील ज्ञान झाल्यावर आपलं डोकं, आपण केस कापून आल्यावर होतं तसं एकदम हलकं होऊन जातं. मात्र त्यासाठी हे अगदी आतून पटायला हवं. हे ज्ञान नसलं की आपल्या मनात सतत विकार उत्पन्न होत रहातात.

मी : ते कोणते आणि कसे उत्पन्न होतात ?

महाराज : भूतकाळातील आपल्या मनाविरुद्ध घडलेल्या घटनांबद्दल दुःख आणि या दुःखाला जबाबदार असणाऱ्याबद्दल राग, भविष्यकाळात मिळवायच्या वस्तूबद्दल लोभ, व मोह व त्या वस्तू ज्यांच्याकडे असतात त्यांच्याबद्दल मत्सर, तर आपल्याकडे असलेल्या वस्तूबद्दल गर्व व भविष्यकाळातील घटना आपल्या मनाप्रमाणे कशा घडतील याबद्दल चिंता व त्यातून निर्माण होणारा ताण (टेन्शन) हे सर्व विकार माणसाला सतत छळत असतात.

मी : महाराज, या ईश्वरी संकल्पाबाबत माऊलींचं काय म्हणणं आहे?

महाराज : अरे, माऊलीनं अगदी स्पष्ट शब्दात सांगितलं आहे की ईश्वरी संकल्पाप्रमाणे आपल्या जीवनात घडणाऱ्या घटना या आपण घडवल्या असं आपण कधीही मानू नये.

प्रकृति करी कर्मे । ती म्या केली म्हणे भ्रमे ।।

इथे प्रकृति या शब्दाचा अर्थ ईश्वरी संकल्प असा घ्यायचा. माऊली पुढे म्हणते

परी मने वाचा देहे । जैसा जो व्यापारू होये ।

तो मी करीतु आहे । ऐसे न म्हणे ।। १२.११७।।

आपण जन्माला आल्यापासून मरेपर्यंत प्रत्येक क्षणी आपल्या जीवनात काय घडणार आहे हे सर्व अगोदरच ठरलेलं आहे व ते त्या त्या क्षणी तसंतसं प्रकट होत असतं हे न समजल्यामुळे आपण मात्र उगाचच मीच सर्व केलं असं मानून सुख-दुःखांच्या व इतर विकारांच्या आधीन होतो. म्हणून माऊलीन आपणा सर्वांना सावध केलं आहे की प्रत्येक क्षणी आपल्याला जे ज्ञान होतं, त्यावर आपण मनात जो विचार करतो, वाणीनं जे बोलतो आणि बुद्धीच्या मदतीने शरीराच्या माध्यमातून जे कर्म करतो ते सर्व पूर्वनियोजित ईश्वरी संकल्पाप्रमाणे आपल्या हातून घडत असल्यामुळे मी विचार करतो, मी बोलतो, मी कर्म करतो असं आपण कधीही मानू नये.

मी : पण महाराज, या जगात आज ५०० कोटी माणसं आहेत तसंच इतरही लाखो प्रकारचे प्राणी आहेत व या सर्वांची संख्या अब्जांमध्ये मोजावी लागेल. शिवाय विश्वात $१०^{७२}$ इतके परमाणू आहेत असाही शास्त्रज्ञांनी अंदाज व्यक्त केला आहे. तर इतक्या सगळ्यांच्या बाबतीत विश्वाच्या उत्पत्तीपासून तो प्रलयापर्यंत त्यात काय घडत रहावं हे भगवंताला अगोदर ठरवणं कसं शक्य आहे?

महाराज : अरे, सर्वशक्तिमान भगवंताला त्यात काय कठीण आहे? एका साध्या संगणकयंत्राच्या तबकडीमध्ये (डिस्क) इतकी प्रचंड माहिती साठवलेली असते की एरवी ती साठवायला हजारो फाईलींची गरज लागली असती. व असे लक्षावधी संगणक माणसाने तयार केले असतील याचं तुला आश्चर्य वाटत नाही, उलट तुला कौतुकच वाटतं मग सर्वशक्तिमान अशा ईश्वराला, ज्याने हे संगणक तयार करणाऱ्या माणसांना निर्माण केलं त्याला, यात अशक्य काय आहे? या विश्वाच्या निर्मितीपासून नाशापर्यंत त्यात काय काय घडणार याचं पूर्वनियोजन ईश्वराला करणं सहज शक्य आहे यात मला शंका वाटत नाहीच. उलटपक्षी माझी तशी पूर्ण खात्री आहे.

मी : महाराज, हल्ली या कॉम्प्यूटरचं फारच प्रस्थ माजलं आहे. आजकाल जो उठतो तो या कॉँप्यूटरचा म्हणजे संगणकाचा कोर्स करत असतो. तो कधीच चूक करीत नाही असं म्हणतात.

महाराज : असंच काही नाही. तो आकडे मोडीत चूक करत नाही पण त्याला व्यावहारिक ज्ञान नसतं. यावर एक विनोद आहे. एकाकडे दोन घड्याळं होती. त्यातलं एक बंदच पडलं होतं व दुसरं रोज एक मिनिट पुढे जात असे. यातलं कोणतं

घड्याळ चांगलं असं विचारल्यावर संगणकानं खूप आकडेमोड करून सांगितलं की मोडीत काढलेलं बंद घड्याळच पुढे जाणाऱ्या घड्याळ्यापेक्षा चांगलं. असं का ? असं विचारल्यावर तो म्हणाला की पुढे जाणारं घड्याळ ७२० दिवसात एकदा बरोबर वेळ दाखविल. पण बंद असलेलं घड्याळ मात्र दिवसातून दोनदा तरी अचूक वेळ दाखविल. आता तूच सांग संगणकाच्या असल्या ज्ञानावर विसंबून राहून कोणीतरी बंद घड्याळ विकत घेईल का ?

मी : हा विनोद सोडला तर त्याचा हल्ली खूपच उपयोग होतो म्हणे. पण महाराज हा संगणक असतो कसा व काम कसं करतो ?

महाराज : (गमतीने) वा ! गीतेत अर्जुनानं कृष्णाला दुसऱ्या अध्यायात प्रश्न विचारला आहे की स्थितप्रज्ञ हा असतो कसा ? दिसतो कसा? तो झोपतो कसा? तो काय खातो? काय पितो? काय बोलतो? तो समाधी केव्हा लावतो? वगैरे. तसेच प्रश्न तू संगणकाविषयी विचारतो आहेस. असो. जसं दुर्बिण म्हणजे डोळ्याची शक्ती वाढवणारं यंत्र व दूरध्वनी म्हणजे कानाचा ऐकण्याचा पल्ला वाढवणारं यंत्र तसं संगणक म्हणजे विजेच्या वेगाने आकडेमोड करून बुध्दीची क्षमता वाढवणारं यंत्र.

मी : हा संगणक नक्की काय करतो ?

महाराज : अरे, हा संगणक बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार इत्यादि क्रिया प्रचंड वेगाने करून अचूक उत्तर काढतो.

मी : एवढ्या वेगाने या क्रिया तो कशा काय करू शकतो?

महाराज : संगणकातील विभाग अक्षरशः विजेच्या वेगाने कार्य करतात म्हणून संगणक हा एका सेकंदात लाखो बेरजा व वजाबाक्या वगैरे करू शकतो.

मी : पण हल्ली संगणकाला एवढं महत्व का आलं आहे ?

महाराज : कारण प्रचंड वेग, माहिती साठवण्याची आश्चर्यकारक क्षमता, विश्वसनीय अचूकता व सर्वच क्षेत्रातील उपयुक्तता ही त्याची महत्वपूर्ण वैशिष्ट्ये आहेत. यामुळे हल्ली घरोघरी संगणक दिसू लागले आहेत. तेव्हा असा हा संगणक निर्जीव असूनही त्याला निर्माण करणाऱ्या माणसाच्या बुध्दीच्या प्रभावामुळे माणसापेक्षा जास्त वेगाने काम करतो, तर माणसाला निर्माण करणाऱ्या ईश्वराला काय अशक्य आहे ? तुकाराम महाराज म्हणतात "अशक्य ते काय ! तुम्हा नारायणा ! निर्जीव चेतना आणावया !!"

✸✸✸

# प्रकरण ३ रे

## भगवंताची अद्भुत निर्मिती - विश्व आणि मानव

मी : महाराज हे देवाने निर्माण केलेलं विश्व फारच प्रचंड आहे असं म्हणतात.

महाराज : अरे, ते तुझ्या कल्पनेपेक्षाही प्रचंड आहे. याबाबतीत शास्त्रज्ञांनी गोळा केलेली माहितीच तुला सांगतो.

आपल्या सस्य शामला पृथ्वीचा परिघ ४०,००० किलोमिटर आहे. तर आपला लिंबोणीच्या झाडामागे लपलेला चांदोबा तिच्यापासून ४ लाख कि.मि. लांब आहे. शिवाय आपल्यासाठी नियमाने सकाळी उगवून संध्याकाळी मावळणारा व मध्यान्हीच्या भुकेसाठी आपल्याला दिवसभर कामधंद्यासाठी पिटाळणारा सूर्यनारायण तिच्यापासून १५ कोटी कि.मि. दूर आहे. या पुढील अंतरासाठी कि.मी. चं एकक किंवा माप अपुरं पडतं. म्हणून प्रकाश वर्षाच माप वापरावं लागतं. एक प्रकाश वर्ष अंतर म्हणजे प्रकाशाने एका वर्षात कापलेलं अंतर. प्रकाशाचा वेग सेकंदाला सुमारे तीन लाख कि.मी. आहे. म्हणून प्रकाश एका वर्षात सुमारे १० महापद्म म्हणजे $१०^{१३}$ कि.मी. अंतर कापतो. आपल्या सूर्यमालेत इतक्या लांबूनही आपल्या दैनंदिन जीवनात ढवळाढवळ करणारे पृथ्वीसह नऊ ग्रह आहेत. (जामातो दशम ग्रह :- हा आपला जावई शोध ) आपलं अस्तित्वच ज्याच्यावर अवलंबून आहे असा सूर्य हा आपल्या आकाश गंगेतील एक लहानसा तारा आहे. सूर्याच्या सगळ्यात जवळचा "प्रॉक्झिम सेंटॉरस" या नावाचा तारा त्याच्यापासून ४.३ प्रकाशवर्ष अंतरावर आहे. असे सुमारे १०० अब्ज तारे असलेली आपली आकाशगंगा मध्ये फुगलेल्या पुरीसारखी आहे. आणि अत्यंत आश्चर्याची गोष्ट म्हणजे अशा १०० अब्ज आकाशगंगा आपल्या विश्वात आहेत. आपल्या सर्वोत्तम दुर्बिणीतून खगोलशास्त्रज्ञ सुमारे १० अब्ज प्रकाश वर्षे इतक्या अंतरापर्यंत विश्वाचं दर्शन घेऊ शकतात. आता तूच सांग वरील सर्व अंतरांच्या तुलनेत आपल्या साडेतीन हाताच्या शरीरात वास्तव्य करून असणाऱ्या बिंदुमात्र अशा अहंकाराला सर्वशक्तिमान अशा ईश्वराच्या पुढे काही किंमत किंवा महत्व तरी आहे का ?

प्रयत्नाची गरज काय?
वस्तुस्थिती = वस्तुस्थिती म्हणजे स्वतःची स्थिती व परिस्थिती या दोन गोष्टींचा संगम

मी : (अत्यंत आश्चर्याने) इतक्या अतिप्रचंड विश्वाचा त्याच्या निर्मितीपासून प्रलयाप्रर्यंतचा कारभार त्याच्या जन्माअगोदर निश्चित करून त्याप्रमाणे तो चालविणारा ईश्वर हा खरोखरच सर्वशक्तिमान असला पाहिजे याबद्दल माझी पूर्ण खात्री झाली आहे महाराज.

महाराज : याचाच अर्थ तुझ्या दृष्टीने ही आता कल्पना नसून वस्तुस्थिती म्हणून तू आता स्वीकारली आहेस. वस्तुस्थिती म्हणजे स्वतःची स्थिती व परिस्थिती या दोन गोष्टींचा संगम. म्हणजेच ही गोष्ट तुला आतून पटली आहे कारण आतून पटलेल्या गोष्टीबद्दल आपल्याला कधीच शंका येत नाही.

मी : महाराज, मला आता या गोष्टीबद्दल काहीच शंका राहिली नाही. पण इतर लोक नेहमी एक शंका विचारत असतात तिचं निराकरण कसं करायचं ?

महाराज : अरे, पण शंका कसली आहे ते कळल्याशिवाय तिचं निराकरण कसं करणार ? तेव्हा अगोदर शंका काय आहे ते तर कळू दे.

मी : काही लोक असं म्हणतात की जर सर्वच गोष्टी ईश्वराच्या इच्छेमुळे घडतात असं मानलं तर मला कसलाही प्रयत्न करायची गरजच काय ? " असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी " यामुळे मग आपण सर्वजण निष्क्रीय होणार नाही काय ?

महाराज : ही शंका सामान्य माणसाला प्रारब्धाच्या सिध्दांतावर नेहमीच येत रहाते. या शंकेचं मूळ कशात आहे ते अगोदर पाहू या. ईश्वरी संकल्पासंबंधी वस्तुस्थिती काय आहे, ते आपण समजावून घेत नाही म्हणून ही शंका येत रहाते. वस्तुस्थिती काय आहे ? तर सर्वच घटना पूर्व नियोजित ईश्वरी संकल्पा प्रमाणे घडत असतात. त्याचबरोबर हा ईश्वरी संकल्प आपल्याला फक्त वर्तमानकाळात समजतो व तो पुढच्या क्षणी स्मृतीत जाऊन भूतकाळात जमा होतो. तसंच ईश्वरानं ज्याचं रूप धारण केलं आहे अशा जीवाचा त्यानेच धारण केलेला एक गुणधर्म असा आहे की सामान्य जीवाला भविष्यातला ईश्वरी संकल्प समजत नाही. तेव्हा आपल्याला भविष्यकाळात एखादी गोष्ट मिळावी किंवा टाळावी असं वाटलं म्हणजेच तशी इच्छा निर्माण झाली की जीव त्यासाठी प्रयत्न करू लागतो. त्याचबरोबर हा प्रयत्न "मी" करीत आहे अशी त्याची धारणा असते म्हणून आपण केलेल्या प्रयत्नांना अनुकूल फळ मिळावं असं त्याला मनोमन वाटत असतं. आता या प्रयत्नांना अनकूल किंवा प्रतिकूल असं फळ मिळतं ते जीवाच्या प्रयत्नाचं फळ म्हणून मिळत नाही तर ईश्वरी संकल्पानुसार जे अगोदरच ठरलेलं असतं तसं फळ त्याला मिळतं. जीवाला मात्र अज्ञानाने असं वाटतं

प्रश्न - ईश्वर सर्वांच्या इच्छा कां पुऱ्या करत नाही

की मी प्रयत्न केले त्याचं अनुकूल किंवा प्रतिकूल असं फळ मला मिळालं. म्हणून जीव अज्ञानाने इच्छा, प्रयत्न आणि फळ यांची साखळी करून त्या एकत्र आणतो आणि त्यातून कार्य-कारण भावाचा एखादा नियम तयार करतो. पण ईश्वरी संकल्पात मात्र या तिन्ही स्वतंत्र असतात. म्हणजेच जीवाच्या मनात इच्छा निर्माण होणं हा स्वतंत्र संकल्प असतो तर इच्छापूर्तीसाठी त्याने केलेला प्रयत्न हा दुसरा स्वतंत्र संकल्प असतो व त्याचं फळ हा तिसरा संकल्प असतो. त्यामुळे असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी या म्हणीत सुध्दा मी खाटल्यावर बसायचं की नाही हे ईश्वरी संकल्पानुसार ठरत असतं आणि मी खाटल्यावर बसल्यानंतर हरीनं मला तिथेच अन्न-वस्त्र पुरवायचं की नाही हे ही ईश्वरीसंकल्पानुसारच अगोदर ठरलेलं असतं.

मी : महाराज, आणखीन एक वेडगळ प्रश्न. असं जर आहे तर तो सर्वांच्याच इच्छा पुऱ्या का करत नाही ?

महाराज : कारण त्यानेच जीवाचं रूप घेताना असा एक गुणधर्म धारण केला आहे की अज्ञानी जीवाच्या इच्छांना अंतच नसावा. म्हणून पूर्व नियोजित ईश्वरी संकल्पानुसार त्यातल्या कांही पुऱ्या होतात तर काही होत नाहीत. दुसरं असं की याबाबतीत त्याची भूमिका पटकथा लेखकासारखी किंवा एखाद्या नाटककारासारखी किंवा एकपात्री प्रयोग करणाऱ्या सारखी असते नाटक किंवा सिनेमा तीन तास चालेल इतकी मोठी कथा लेखकाला लिहायची असल्यामुळे त्याप्रमाणे तो नायक-नायिका यांची एकसारखी चुकामूक आणि शेवटी मीलन घडवून आणतो. तर मधल्या काळांत खलनायकाला मध्ये आणून नायक-नायिकेच्या आयुष्यात अपार दुःख निर्माण करतो. राजकन्येला धुणी-भांडी करायला लावून तिला लांबून नदीवरून पाणी आणायला लावतो व परीटघडीचे किंमती कपडे घातलेल्या नायकाला एसाद्या डुकराप्रमाणे चिखलात लोळायला लावतो. तसंच भगवंताला परार्धावधी प्रकाशवर्ष इतक्या प्रचंड धनफळाच्या व ज्यात अब्जावधी सजीव प्राणी आहेत, अशा या सृष्टीची लीला हजारो युगं चालवायची असल्यामुळे त्यानं ही सृष्टी नानाविध गोष्टीनी युक्त अशी निर्माण केली आहे. त्यामुळे मानवी विश्वात सुख-दुःख, आनंद-वेदना, चांगलं-वाईट, चूक-बरोबर, योग्य-अयोग्य या सर्व जोड्या हातात हात घालून काम करत असतात. बरं, सृष्टीमधील सर्व रूपं त्यानेच धारण केलेली असल्यामुळे त्याला स्वतःला याचं सोयरसुतक असं काहीच नसतं. फक्त आपण सृष्टीच्या जन्मापूर्वी अव्यक्त, अनंत व सर्वशक्तिमान असा ईश्वर होतो व या

प्रश्न - जीव म्हणजे काय व त्याचे गुणधर्म

सृष्टीत आता आपण त्याच ईश्वराचे अंश आहोत हे विसरल्यामुळे जीव स्वतःला स्वतंत्र अस्तित्व देतो व त्यातून त्याचे जे गुणधर्म निर्माण होतात त्यामुळे त्या जीवाला अज्ञान, अहंकार, ममत्व, सुख-दुःख, आसक्ती, तिटकारा, अनेक ईषणा, विकार व या सगळ्यांचे संस्कार या चक्रात अडकावं लागतं.

मी : महाराज, मागे आपण सांगितलंच होतं पण पुन्हा एकदा जीवाचे गुणधर्म सविस्तरपणे सांगाल का ?

महाराज : जीव हा शब्द आपण व्यवहारात अनेक अर्थांनी वापरतो १) माझा जीव खाऊ नकोस. २) आम्ही जिवाला जीव सुध्दा देऊ इतकी आमची जीवश्च कंठश्च मैत्री आहे. ३) जीव गेल्याचं निमित्त होऊन त्याने प्राण सोडला. ४) जिवलगा, राहिले रे दूर घर माझे. ५)चिरंजीव ते सर्वही मानिताती. ६) जीवाची मुंबई केली. ७)जीव भांड्यात पडला. (मातीच्या, तांब्याच्या, पितळेच्या, ॲल्युमिनिअमच्या, स्टेनलेसस्टीलच्या(गंजरहीत पोलाद) की निर्लेपमध्ये पडला?) ८)जिवात जीव आला. ९) जीवघेणी थंडी. १०)जीवेत् शरदः शतमः.

मी : पण असा हा जीव आहे तरी कसा ?

महाराज : जीव या शब्दात व्हायरस पासून माणसापर्यंत सर्व सजीव योनी येतात. आपण चौऱ्यांशी लक्ष योनी असं म्हणतो. शास्त्रज्ञांनाही त्यांचे लक्षावधी प्रकार सापडले आहेत.

जीवाच्या अनेक व्याख्या आहेत. जो जिवंत राहातो तो जीव. जो हालचाल करू शकतो तो जीव. ज्याला इच्छा वासना, प्रेरणा असतात तो जीव वगैरे वगैरे. पण जीवाची शास्त्रीय व्याख्या अशी आहे "जी पेशी स्वतःच्या इच्छेने स्वतःच्या शरीराबाहेरील, तिला उपयोगी पडणाऱ्या वस्तू घेऊन त्यावर भौतिक, रासायनिक, जैविक वगैरे प्रक्रिया करून, त्यातून स्वतः जिवंत राहण्याचा प्रयत्न करते व या प्रक्रियेतून निघालेल्या तिला नको असलेल्या वस्तू शरीराबाहेर टाकते, तिला जिवंत पेशी किंवा जीव असं म्हणतात."

मी : महाराज, या जीवाचे बरेच प्रकार असतील नं?

महाराज : आतापर्यंत सापडलेल्या सगळ्यात लहान जीवाला व्हायरस असं म्हणतात. आणि आपण सर्व बाजुंनी प्रगत आहोत असं समजणाऱ्या जीवाला माणूस हे नाव दिलं आहे. व्हायरसची मूर्ती ही अत्यंत सूक्ष्म असते. ती फक्त मायक्रोस्कोप (सूक्ष्मदर्शक) किंवा इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप (विद्युत्सुक्ष्मदर्शक) यांच्या मदतीनेच दिसू शकते.

पण अतिबुध्दिमान माणसालाही सहज मारून टाकण्याइतकी सुपर किंवा महाबुध्दी या व्हायरसमध्ये असते. या व्हायरसमध्ये आपलं सारं जीवन नीरस करण्याची शक्ती असते. तू म्हणशील की हे कसं होतं तर त्यासाठी हा व्हायरस फंदफितूरीचा उपाय अमलात आणतो. या बाबतीत तो कबजी कलुषाचा किंवा सुर्याजी पिसाळाचा बाप असतो असं म्हणायला हरकत नाही. या व्हायरसला माणसाच्या शरीरात प्रवेश मिळाला की तो प्रथम आपल्या शरीरातील संरक्षक पेशींची निर्मिती जिथे चालू असते तिथे पोहोचतो व कशा काय त्या देव जाणे पण तिथल्या निर्मितीच्या सूचनाच बदलून टाकतो आणि त्याऐवजी व्हायरसच्या म्हणजे आपल्या पेशींच्या निर्मितीच्या सूचना तिथे देऊन टाकतो. मग काय ? त्या व्हायरसच्या पेशीची आपोआप निर्मिती होऊन त्यांची संख्या लक्षावधीनी वाढते. शरीरातल्या इतर संरक्षक केंद्रांना हे समजून संरक्षक पेशींची कुमक त्या ठिकाणी येऊन पोहोचेपर्यंत या व्हायरसची निर्मिती व त्यांची शक्ती खूपच वाढलेली असते. मग शरीरात संरक्षक पेशी व व्हायरसच्या पेशी यांचं एक भारतीय महायुध्दच होतं व त्यात योगेश्वर कृष्ण म्हणजे ईश्वरी संकल्प ज्याच्या बाजूने असेल तो जिंकतो म्हणजे माणसानं जिंकावं असा ईश्वरी संकल्प असेल तर व्हायरसच्या पेशी मरतात व माणूस जगतो. भगवंताची इच्छा त्याउलट असली तर माणूस "राम" म्हणतो, व त्याच्या नातेवाईकांना "राम बोलो भाई राम " म्हणत पुढच्या तयारीला लागावं लागतं.

मी : महाराज, हा व्हायरस इतका सरस असेल व महाबुध्दिमान असेल याची कल्पना नव्हती. आता पुढे सांगा.

महाराज : व्हायरस, ॲमिबा (एकपेशीय), छोटे कीटक, सरपटणारे प्राणी, मासे व इतर जलचर प्राणी, पक्षी, पशू व माणूस वगैरे सजीव प्राण्यांचे अनेक प्रकार आहेत. इतर जीवांना उपजत बुध्दी असते. त्यामुळे "आहार, निद्रा, भय, मैथुनंच" इतकंच त्यांच्या आयुष्यात घडत असतं. त्यातसुध्दा "जीवो जीवस्य जीवनम्" हा भगवंताचा नियम असल्यामुळे बऱ्याच जातीचं अस्तित्व या जगातून नष्टच झालं आहे.

मी : महाराज, आपण आतापर्यंत सांगितलेली माहिती एकदम उद्‌बोधक अशी होती. आता असंच माणसाबद्दल सांगा.

महाराज : आता आपण जीव म्हणून माणसाकडे वळू या. जसं आईला तिची सर्वच मुलं आवडत असली तरी तुका म्हणे त्यातल्यात्यात एखादंच मूल तिचं विशेष लाडकं

असतं. तसं माणसाचं शरीर आणि बुध्दी ही त्याची विशेष लाडकी निर्मिती असली पाहिजे. म्हणून ही निर्मिती हा ईश्वराचा सगळ्यात मोठा चमत्कार म्हणता येईल. जसं वस्तूचं मूलद्रव्य अणू हे असतं तसं सजीव प्राण्याचं मूलद्रव्य पेशी हे असतं. माणसांच्या शरीरात जवळजवळ ६ × $१०^{१३}$ इतक्या जिवंत पेशी असतात. म्हणजे एका टाचणीच्या डोक्यावर अशा हजारो पेशी राहू शकतात. या पेशी वेगवेगळ्या आकाराच्या असतात.

ही पेशी केंद्रक आणि पेशीद्रव्य या घटकांची बनलेली असून त्याभोवती पेशी-पटल या नावाचं आवरण असतं. पेशी-द्रव्यात विविध जैविक व अजैविक घटक असतात. तसंच त्यात ऊर्जा-निर्मिती करणारी केंद्रंही असतात. या पेशीतील पेशी पटलही अत्यंत महत्वाचं असतं पेशीला प्रोटीन्स तयार करण्यासाठी आवश्यक असलेल्या वस्तू ते रक्तातून आत घेतं व त्यावर योग्य प्रक्रिया करून झाल्यावर निरूपयोगी वस्तू ते रक्तप्रवाहात सोडून देतं. या पेशीच्या केंद्रकात सूक्ष्म धाग्यासारखी गुणसुत्रं असतात यांचे डी.एन.ए. व आर.एन.ए. असे दोन घटक असतात. माणसाच्या प्रत्येक पेशी - मध्ये गुणसूत्राच्या २३ जोड्या असतात.प्रत्येक गुणसूत्रावर सुमारे २००० जीन्स असतात. या जीन्समध्ये अनुवंशिक लक्षणं व इतर प्रचंड माहिती साठवलेली असते. अगदी केसांचा रंग, कातडीचा नाजूकपणा, शरीरयष्टी इतकंच नव्हे तर त्याला होणारे संभाव्य रोग वगैरे सर्व माहिती जननपेशीच्या गुणसूत्रातील जीन्समध्ये साठवलेली असते. या गुणसूत्रांचा आकार पीळ भरलेल्या लवचिक शिडीसारखा असतो. ही गुणसूत्रं जणू माणसाच्या जीवनाचे सूत्रधार असतात. ही गुणसूत्रं म्हणजे ईश्वराच्या राज्यातला सर्वात मोठा चमत्कार म्हणता येईल. सत्यसाईबाबा जितक्या सहज चमत्कार करू शकतात तितक्याच लीलेने आपल्या आई-बाबांच्या जननपेशीतील गुणसूत्रं चमत्कार करू शकतात. तेव्हा चमत्कारांच्या शोधासाठी आपल्याला आपल्या शरीराच्या बाहेर जायला नको. प्रत्येक क्षणी आपल्या शरीरातच भगवंताच्या लीलेने हजारो चमत्कार घडत असतात.

मी : या पेशी म्हणजे खरोखरच देवाचा चमत्कार म्हणता येईल. बरं, पुढे सांगा.

महाराज : या पेशींचं सर्वात मोठं वैशिष्ट्य म्हणजे शरीरातील कोठल्याही ठिकाणच्या पेशीचं काम करण्याची हिच्यात क्षमता असते. तरीसुध्दा ती ज्या ठिकाणी असेल तिथलंच काम ती इमानेइतबारे करीत असते. जसं एखाद्या नाटक कंपनीचा मालक

त्याच्या नाटकात एखाद्या भिकाऱ्याची भूमिका अगदी सफाईने व कुरकुर न करता करतो तसं.

अशा अनेक पेशी एकत्र येऊन माणसाचा एक अवयव बनतो. असे अनेक अवयव एकत्र येऊन एक विशिष्ट काम करणारी संस्था बनते. अशा अनेक संस्थांच्या मदतीने माणूस आपले जीवन जगत असतो. उदा. श्वसन, रूधिराभिसरण, पचन, मलोत्सर्ग, अस्थि, स्नायू, संरक्षण, चेता, वगैरे संस्था हातात हात घालून गुण्यागोविंदाने काम करत असतात. या संस्थांची कामं तुला माहितच आहेत. पण यांचं वैशिष्ट्य असं आहे की बाहेरच्या जगात ज्या प्रक्रिया घडवण्यासाठी हजारो डिग्री फॅरेनहाईट उष्णतेची गरज लागते त्या प्रक्रिया आपल्या शरीरात ९८° फॅरेनहाइटलासुध्दा घडू शकतात.

पण एखादे वेळी यातील काही पेशींना जणू काही अहंकाराची बाधा होते व त्यांची वाढ प्रमाणाबाहेर होऊ लागते व त्यामुळे जवळच्या इतर अवयवांची कामं बंद होऊ लागतात. यांच्या पहिल्या अवस्थेत वेदना होत नाहीत. त्यामुळे माणसाला या वाढीची जाणीव होत नाही. पण दुसऱ्या अवस्थेत माणसाला वेदना होऊ लागतात. तेव्हा या बेसुमार वाढलेल्या पेशींची माणसाला जाणीव होते. पण तोपर्यंत उशीर झालेला असतो व या वाढीचा दुष्परिणाम माणसाच्या मृत्युमध्ये होतो. या वाढीला कॅन्सरची वाढ असे म्हणतात.

मी : महाराज हे सगळं ऐकायला अगदी अद्भूत वाटतय. आता आपल्या बुध्दी विषयी थोडसं सांगा.

महाराज : माणसाची बुध्दी ही एक अलौकिक गोष्ट आहे. इतर प्राण्यांसारखी माणसाला उपजत बुध्दी तर आहेच. म्हणून नुकतचं जन्मलेलं मुल आईचा स्तन कोठे आहे ते शोधत असतं. कारण "कोणे केली बाळा । दुग्धाची उत्पत्ती । वाढवी श्रीपती । सवे दोन्ही ।।". पण याशिवाय माणसाच्या भोवतालच्या जगाचं इंद्रियांच्या मदतीने झालेलं ज्ञान, त्यावर त्याच्या भाषेतून केलेला विचार व त्याच्या शरीराच्या माध्यमातून व्यक्त झालेली क्रिया किंवा प्रतिक्रिया आणि आत्मानुभवासाठी आवश्यक असलेली अंतर्मुखता ही बुध्दीच्या चार स्तरांवरची कार्य आहेत. या बुध्दीच्या कार्याची थोडी ओळख करून घेऊ या.

मेंदूचं वसतिस्थान माणसाच्या शरीराच्या शिखरावर आहे. "दास डोंगरी

रहातो । यात्रा देवाची पहातो ।।" तसं शिखरावर राहून हा शरीर चालवत असतो. एखाद्या पतंगाच्या शेपटीसारखी या मेंदूला पाठीच्या मणक्यांची लांबलचक शेपटी असते. साऱ्या जगावर अधिराज्य गाजवण्याऱ्या या मेंदूचं वजन असतं तरी किती ? तर सत्यनारायणाच्या प्रसादाइतकं फक्त सव्वा किलो. याचा स्पर्श रबरासारखा मऊ व ओलसर असतो . तर याचा आकार देवापुढे ठेवलेल्या लहानशा नारळाच्या आकारा एवढा असतो. रंग जरी लहान मुलांच्या गालासारखा गुलाबी असला तरी त्याच्या पृष्ठभागावर एखाद्या म्हाताऱ्या माणसाच्या चेहऱ्यावर असतात तशा असंख्य सुरकुत्या पडलेल्या असतात. याची स्थापना डोक्याच्या हाडांच्या कवटीच्या आत, एकांत एक अशा तीन पटलांच्या आंत असलेल्या पाण्यामध्ये, सेफ डिपॉझिट व्हॉल्ट मधल्या लॉकरमध्ये ठेवलेल्या वस्तूंप्रमाणे, सुरक्षितपणे केलेली असते. शरीरातील सर्व वेदनांची जाणीव मेंदूमध्ये उमटते व त्यामुळे आपल्याला शारिरिक दुःख होतं. पण आश्चर्य म्हणजे त्याला स्वतःची जाणीव अजिबात नाही. त्यामुळे केस आणि नखं याप्रमाणे रोग्याच्या डोळ्यादेखत त्याच्या मेंदूचा एखादा भाग शस्त्रक्रियेने काढून टाकला तरी त्याला मुळीच वेदना होत नाहीत.

या मेंदूमध्ये तेराशे कोटी (म्हणजे जगाच्या लोकसंख्येच्या अडीचपट) (चूक भूल घ्यावी द्यावी) इतक्या पेशी असतात. यांना न्यूरॉन्स् असं म्हणतात. आपल्या शास्त्रात यांना चैतन्य विशिष्ट किंवा उपहित बुध्दी-पेशी असं नाव आहे, शरीरातील इतर पेशी मृत झाल्या तरी त्यांच्या जागी नवीन पेशी जन्मास येतात व त्यांची जागा घेऊन त्यांचं काम करू लागतात. अशातऱ्हेने दर सात वर्षांनी संपूर्ण शरीरातील पेशी बदलतात. आपल्या दृष्टीने याचा अर्थ असा आहे की सबंध शरीरातील पेशी तमोगुणांनेयुक्त असल्या तरी साधनेने सात वर्षानंतर रजोगुणात्मक होऊ शकतात व पुढील सात वर्षांच्या साधनेनंतर त्या सत्वगुणयुक्त होतात. म्हणून आपल्याकडे रामाच्या चौदा वर्ष वनवासाचा अर्थ आत्मारामाची चौदा वर्ष उपासना आणि त्यानंतर संपूर्ण सात्विक जीवन असा होतो. अशा तऱ्हेने शरीराच्या इतर भागातील पेशी जरी दर सात वर्षांनी बदलत असल्या तरी मेंदूच्या पेशी मात्र याला सन्माननीय अपवाद आहेत. कारण या पेशी मृत झाल्या की त्याऐवजी नवीन पेशी जन्माला येत नाहीत.

मी : पण असं होता होता या पेशींची संख्या कमी होत होत मध्येच अपुरी पडली किंवा संपून गेली तर?

महाराज : यासाठी भगवंताने आपल्याला सुरूवातीलाच इतका साठा देवून ठेवला आहे की दर मिनिटाला एक नवीन गोष्ट शिकायची म्हटली तरी तीनशे वर्षे पुरतील इतक्या पेशी आपल्या मेंदूमध्ये असतात. या पेशींना अत्यंत सूक्ष्म अशा विजेऱ्या (बॅटऱ्या) जोडलेल्या असतात व रक्तातील साखर प्राणवायूच्या मदतीने जाळून त्यातून या विजेऱ्या मेंदूला विद्युतपुरवठा करतात व त्यावर या पेशींचं काम चालतं त्यातून निर्माण होणारा "कर्बद्विप्राणिल" किंवा कार्बन-डायॉक्साईड वायू बाहेर टाकला जातो. या मेंदूचे वजन जरी शरीराच्या वजनाच्या २ टक्केच असलं तरी ऑक्सिजन व रक्ताचा याला होणारा पुरवठा मात्र २० टक्के असतो. इतकं याचं महत्व आहे.

मेंदूच्या कार्याचे दोन भाग होतात. एक भाग बाह्य जगाचं ज्ञान मिळवून त्यावर योग्य तो विचार करून त्याच्या मदतीनं अचूक क्रिया करण्यात मग्न असतो. तर दुसरा भाग शरीरातील निरनिराळ्या भागातून येणाऱ्या माहितीच्या आधारावर शरीराचं कार्य सुनियंत्रित करीत असतो. उदा. रक्तातील साखर, शरीराचं उष्णतामान, श्वासप्रश्वासाची लय, हृदयाच्या ठोक्याचा ताल, हार्मोनची निर्मिती, शरीर संरक्षण व्यवस्था इत्यादी गोष्टींचं नियंत्रण हा भाग आपल्या नकळत करीत असतो. म्हणून या कामाची आपल्याला दादही नसते. वास्तविक मेंदूचा हा भाग त्याचं काम गीतेतील निष्काम, निरपेक्ष, कर्मयोग्यासारखं करत असतो. त्यामुळे याचं काम जोवर सुरळीत चालतं तोपर्यंत त्याची आपल्याला जाणीव होत नाही. त्यात जर बिघाड झाला तरच आपल्या लक्षात येतं. तेव्हा असा हा माणसाच्या बुध्दीचा चमत्कार आहे.

(तर अशा या जीवाला जगण्यासाठी अन्न, पाणी, हवा, वातावरणातील बदलापासून स्वतःचं संरक्षण करण्यासाठी वस्त्र व निवारा, शरीर टेकण्यासाठी जमीन, आरोग्य टिकविण्यासाठी औषध, चरितार्थ चालवण्यासाठी शिक्षण, व आलेला कंटाळा घालवण्यासाठी करमणूक यांची गरज लागते. या गरजांबरोबरच त्याला प्रेमाच्या उबेचीही मानसिकदृष्ट्या गरज असते.) Imp

"अन्न, वस्त्र, निवारा । आणि प्रेमाचा फवारा ।
जीवन, औषध आणि वारा । सोबत मायेचा उबारा ।
चरितार्थासाठी प्रशिक्षण । या गोष्टी देतात सुखद जीवन ।"

म्हणून या सर्व गोष्टी मिळाल्या की जीव आनंदात असतो.

आता या गोष्टी त्याला आपल्या भोवतालच्या जगातून मिळवाव्या लागतात.

प्रत्येक जीव आणि उरलेलं जग हे दोन्ही मिळून एकजिनसी, अभेद्य, विश्व तयार होतं. हे विश्व म्हणजे ईश्वराचं एक अफाट रूप आहे, हे ऐक्य विसरल्यामुळे प्रत्येक जीव स्वतःला स्वतंत्र मानू लागतो आणि आपण व उरलेलं जग असे तो या विश्वाचे दोन भाग करतो. जसं भूमितीतील कोन प्रतलाचे आंतर्भाग आणि बाह्यभाग असे दोन भाग करतो तसं इथून जीव व जगत् यांचा जीवाच्या द्वैतभावनेतून संबंध सुरू होतो.

हा जगाशी संबंध जीवाच्या ज्ञानेंद्रियांच्या माध्यमातून येतो व त्यावर विचार होऊन जीव त्यासंबंधी प्रतिक्रिया शरीराच्या माध्यमातून करतो. जीवाला जगाच्या या ज्ञानाची गरज मूलतः आपला जीव जगवण्यासाठी म्हणजे आपलं अस्तित्व टिकवण्यासाठी असते.

* * *

# प्रकरण ४ थे

## भगवंताच्या अज्ञानातून निर्माण होणारं मानवी जीवन

मी : महाराज, हे ज्ञान कसं होतं ते जरा पाहू या का?

महाराज : आपण जागे असताना एखाद्या सजीव किंवा निर्जीव वस्तूपासून निघालेल्या लहरी किंवा कण आपल्या इंद्रियात प्रवेश करतात. कारण आपल्या इंद्रियांमध्ये No Entry किंवा No admission without permission हा बोर्ड नसतो. या इंद्रियांच्या स्वतंत्र संवेदना तयार होऊन त्या बुद्धीत योग्य ज्ञानकेंद्रात पोहोचविल्या जातात. बुद्धीमध्ये अशी अनेक कार्यक्षम केंद्रं असतात.

समजा आपण शांत मनाने एखादी वस्तू पाहिली. आता ही वस्तू आपण पूर्वी पाहिली नसल्यास नवीन वस्तू म्हणन तिचे सर्व बाह्यगुण त्यांच्या बारकाव्यासकट स्मृतीत नोंदले जातात व तिला नाव दिलेलं असल्यास ते नांवही समजून घेतलं जातं. उदा. आपल्याला तिचा आकार, तिच्या विविध रंगाच्या छटा, समोर दिसणाऱ्या पृष्ठभागाचा गुळगुळीतपणा किंवा खडबडीतपणा, तिच्या घनफळाचा अंदाज इत्यादी अनेक गुणांचे ज्ञान डोळ्यांच्या माध्यमातून होतं. तसंच वस्तूला सर्व बाजूंनी पाहिलं की तिचं बाह्यज्ञान पूर्णपणे होतं. यासाठीच भगवंताच्या सगुण मूर्तीचं मनोहारी सौंदर्य सर्व बाजूंनी न्याहाळता यावं म्हणून देवाला प्रदक्षिणा घालण्याची आपल्याकडे पद्धत पडली असावी. तसंच आपल्या भोवतालच्या जगताच्या सौंदर्याचा आस्वाद घेता यावा म्हणून स्वतःभोवती प्रदक्षिणा घालण्याची प्रथा पडली असावी. बरं, ही वस्तू आपण पूर्वी पाहिली असल्यास स्मृतीच्या मदतीने आपण ती ओळखू शकतो व तिचं नावही आपल्याला आठवतं म्हणजेच त्या वस्तूचं ज्ञान होतं.

मी : (उत्सुकतेने) महाराज, पुढे काय होतं?

महाराज : यानंतर त्या वस्तूपासून आपल्याला धोका आहे का हे प्रथम पाहिलं जातं व थोडासाही धोका असल्यास कुठलाही विचार न करता आपण त्या वस्तू पासून आपल्या पृष्ठभागाला आपले चरण लावीत लांब पळतो. उदा. गाडीच्या फलाटावर कितीही गर्दी असली तरी फलाटावर कुठेतरी टाईम-बॉंब (काल-स्फोटक) ठेवला आहे अशी

नुसती कुणकुण जरी कानावर आली तरी आज १ एप्रिल असेल वगैरे विचार न करता फलाट क्षणार्धात रिकामा होतो किंवा गारुड्याच्या खेळातला त्याचा साप आपल्या दिशेने येताना दिसला तर तो बिनविषारी किंवा निरुपद्रवी आहे याची गारुड्याने खात्री दिलेली असून सुद्धा आपण मागे मागे सरकतो. न जाणो त्याच्या विषाच्या कुपीत थोडं फार विष शिल्लक राहिलं असलं तर आणि गारुड्याला हे गुपित माहित नसलं तर म्हणून आपण कोठलाही धोका न पत्करता क्षणार्धात त्या धोकादायक वस्तूपासून दूर जातो. याचं कारण आपलं अस्तित्व टिकवावं हे आपल्या जीवनाच मूल ध्येय असतं (उपद्रव)

बरं, ही वस्तू निरुपद्रवी आहे अशी आपली खात्री पटली की मग या वस्तूकडे बारकाईने लक्ष देऊन या वस्तूच्या पूर्वीच्या रूपातील व आत्ताच्या रूपातील साम्य व फरक आपल्या लक्षात येतो व त्यातून तुलना सुरु होते. मग या वस्तूचा आपल्याला काही उपयोग होतो आहे का हे पाहिलं जातं. काहीही उपयोग नसल्यास मनात कोणतीही विचारमालिका निर्माण होत नाही व त्यातून कसलीही क्रिया घडत नाही व मनाची शांत अवस्था टिकून राहते. (उदासीन)

या वस्तूचा आत्ता काही उपयोग असल्यास तो करून घेण्याचा प्रयत्न सुरु होतो. (उपयोग) तसंच या वस्तूने पूर्वी आपल्याला सुख दिलेलं असल्यास तशा सुखाचा उपभोग आत्ताही मिळू शकेल काय असा मनात विचार येऊन तशी शक्यता असल्यास या वस्तूपासून आपल्याला आत्ताही सुख मिळावं व तेही जास्तीत जास्त मिळावं म्हणून आपण धडपड करू लागतो. (उपभोग) तसंच या वस्तूपासून आपल्याला दुःख झालेलं असल्यास आत्ताही त्या वस्तूचा सहवास दुःखकारक होण्याची शक्यता आहे का याचा विचार होऊन तशी शक्यता असल्यास आपण त्या वस्तूला टाळतो व तिच्यापासून लांब जातो. एखाद्या वस्तूपासून आपल्याला सुख मिळावं की दुःख व्हावं हे आपल्या पूर्वसंस्कारावर अवलंबून असतं. म्हणून सुख-दुःखाच्या कल्पना व्यक्ती-व्यक्तीगणीक बदलत असतात. तसंच आपल्या मनात काही भाव उत्पन्न होतात. (उद्भाव) असो. हे सर्व झाल्यावर हा सारा प्रसंग स्मृतीत जाऊन त्या वस्तूच्या पूर्वीच्या ज्ञानाला जोडला जातो म्हणजे उपद्रव, उपयोग, उपभोग, उद्भाव व उदासीन अशी या ज्ञानाची पाच वैशिष्ट्ये आहेत.

आता एखाद्या माणसाचं मला दर्शन झालं की मला ते दर्शन किंवा भेट हे

आवाहन असतं. त्यावर पूर्व संस्कारानुसार माझ्याकडून काही प्रतिक्रिया घडते. ही प्रतिक्रिया त्या माणसाला आवाहन असतं. या आवाहनावर पुन्हा त्याची काहीतरी प्रतिक्रिया उमटते, या आवाहन-प्रतिक्रियांच्या साखळीला आपण प्रसंग असं म्हणतो व जीवन अशा प्रसंगांनी नटलेलं असतं.

मी : या सुख-दुःखाच्या प्रसंगातून पुढे काय घडतं?

महाराज : या सुख देणाऱ्या वस्तू आपल्याला सतत मिळत रहाव्या असा आपल्या मनात विचार येतो. त्याला आसक्ती किंवा राग असं नाव आहे. "सुखानुशयी रागः" अशी भगवान पतंजलींनी या "आसक्ती" ची व्याख्या केली आहे. इच्छा प्रबळ होऊन तिला "च" लागला की तिला वासना किंवा ईषणा म्हणतात. आपल्या शास्त्रात प्रमुख अशा चार ईषणा सांगितल्या आहेत.

१) द्रव्येषणा (पैसा), (२) लोकेषणा कीर्ती), (३) कामेषणा (इच्छा), (४) दारेषणा (स्त्री-पुरुष संबंध). प्रत्येकीचा स्वतंत्रपणे विचार करू या.

(१) द्रव्येषणा (पैसा) : हिला वित्तेषणा असंही म्हणतात. आजच्या जगांत बहुसंख्य माणसं या ईषणेनं पछाडलेली असतात. माणसाला आपल्या वासनापूर्तीसाठी ज्या वस्तूंची (सजीव व निर्जीव) गरज लागते त्या वस्तू मिळण्यासाठी त्याला पैसा हवा असतो. म्हणून आपण श्रीमंत व्हावं असं त्याला वाटतं. त्यामुळे आपली ददात मिटून पुढच्या पिढींची ही काळजी मिटेल असं त्याला वाटतं. पुढच्या तीन ईषणांच्या पूर्तीसाठीही त्याला पैशाची गरज लागते. आता या ईषणांची पूर्ती पूर्णपणाने कधीच होत नसल्याने त्याला जन्मभर पैसाच मिळवत बसावं लागतं. हा पैसा त्याला आपल्याबरोबर "वर" नेता येत नसल्यामुळे तो पैसा शेवटी खालीच रहातो व त्याच्या नातेवाईकांना अनायासाने व फुकट मिळतो, म्हणून त्याना त्याची किंमत रहात नाही. माणसाला पैसा चार प्रकारांनी मिळतो.

१. श्रीमंत घराण्यात जन्म घेऊन, पण ही गोष्ट त्याच्या हातात नसते. म्हणून "दैवायत्तं कुले जन्म" असं कर्णानं म्हटलं आहे. २. आपण मिळवलेले ज्ञान वापरून किंवा शारिरिक कष्ट करून प्रामाणिकपणे पैसा मिळवणं. हा राजमान्य आणि शिष्टसंम्मत असा मार्ग आहे. ३. प्रयत्न न करता दैवावर भिस्त ठेवून शेअर्स, लॉटरी, रेस या मार्गानं पैसा मिळवण्याचा प्रयत्न करणं. हा मार्ग फारच थोड्या लोकांना फलदायी ठरतो. ४. बेकायदेशीरपणे दुसऱ्याची अडवणूक करून किंवा फसवणूक करून वा

पिळवणूक करून "हप्त्या हप्त्याने" खंडणी उकळून अनीतीच्या मार्गाने पैसा मिळवता येतो. हा मार्ग हल्ली राजमान्य होत असला तरी तो तुकाराम महाराजांना मंजूर नाही. ते म्हणतात.

"जोडोनिया धन । उत्तम व्यवहारे । उदास विचारे । वेच करी ।

म्हणून जरुरीपेक्षा जास्त असलेला पैसा दानधर्मात खर्च करावा कारण दानानं घेणाऱ्याचा फायदा होतो व देणाऱ्याला सात्विक समाधान होतं व पुण्य मिळतं.

(२) लोकेषणा : लोकांनी आपल्याला नावाजावं किंवा चांगलं म्हणावं वा स्तुती करावी असं सामान्य माणसाला वाटत असतं, किंबहुना ते त्याच्या आयुष्याचं ध्येयच होऊन बसतं म्हणाना व यासाठीही तो पैसा मिळवत असतो. कारण "सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते। जोवरी चाले धंदा तोवरी बहिण म्हणे दादा ।" प्रथम सहकारी गृह सोसायटीचा कार्यवाह, मग गल्लीतल्या संस्थांचा अध्यक्ष, मग ग्रामपंचायत किंवा नगरपालिकेचा सभासद, नंतर आमदार, मुख्यप्रधान, खासदार, पंतप्रधान या शिडीच्या पायरीवरून त्याची लोकेषणा उड्या मारित वर चढू लागते आणि प्रारब्ध प्रतिकूल झाल्यावर सापशिडीच्या खेळातल्या प्रमाणे सापाच्या तोंडातून खाली उतरावं लागतं. मग देशातील जनतेची अधिक चांगली सेवा करण्यासाठी त्याला स्वतःच्या गावी परतावं लागतं तेव्हा त्याला लोकेषणेतला फोलपणा कळू लागतो.

(३) कामेषणा : कामेषणा म्हणजे मनातील इच्छा. या नेहमीच सर्वतोपरी पूर्ण व्हाव्यात असं माणसाला वाटतं. या ईषणा एकामागून दुसरी, त्यानंतर तिसरी, चौथी अशा सतत निर्माण होत असतात. उदा. इतरांकडे आहे म्हणून आपल्या घरी प्रथम रेडिओ असावासा वाटतो. तो आला की मग टू-ईन-वन, रेकॉर्ड प्लेअर व टेप-रेकॉर्डर पाहिजेच. म्हणून आपण वाण्याचं बिल थकवून तो आणतो, मग टीव्ही कृष्णधवल, मग तो कवडीमोलाने विकून कलर टिव्ही चा नंबर लागतो. मग व्ही.सी.आर. ची नितांत आवश्यकता भासू लागते. त्यानंतर घरगुती समारंभ कॅसेटवर टिपण्यासाठी टीव्ही कॅमेऱ्याची गरज निर्माण होते. तसंच प्रथम सायकल, मग स्कूटर किंवा मोटार सायकल (फटफटी) किंवा "चल मेरी लूना" नंतर मोटार (मारूती) आणि आखाती युद्धामध्ये पेट्रोलची टंचाई निर्माण झाली की पुन्हा सायकल, असं त्या सायकलच्या चाकासारखं इच्छांच चक्र एकसारखं फिरत रहातं.

ही कामना चित्ताला बहिर्मुख करून तात्पुरतं सुख देते, पण चित्त अंतर्मुख

झाल्यावर मिळणाऱ्या निखळ व निष्काम अशा आनंदाच्या ठेव्यापासून आपल्याला वंचित करते, ही वस्तुस्थिती माणसाच्या ध्यानी आली की मग कामेषणेचा विळखा सैल होऊ लागतो व सहज मिळेल तितकच सुख घ्यावं अशी त्याची वृत्ती होते.

(४) दारेषणा : दारा म्हणजे स्त्री. ( या शब्दाचा दारासिंगशी काहीही संबंध नाही) मानव वंशाचं सातत्य टिकावं यासाठी देवाने स्त्री व पुरुषांमध्ये एकमेकांविषयी आकर्षण निर्माण करून ठेवलं आहे. त्यातून ही ईषणा निर्माण होते. पुरुषाला असं वाटतं की आपल्याला रतीसारखी सुंदर बायको मिळावी, मग त्याचा स्वतःचा चेहरा कितीही कुरुप असला तरी तो त्याच्या खिजगणतीत नसतो. तसंच कुरूप स्त्रीलाही आपला नवरा मात्र मदनासारखा असावा असं मनोमन वाटतं. या दारेषणेमुळे पुरूष सौंदर्यवान स्त्रियांच्या मागे गोंडा घोळू लागतात व स्त्रिया त्यांना हाताच्या बोटावर नाचवू लागतात. "सहज कशी खेळविते ललना ।" पण स्त्री ही क्षणाची पत्नी असली तरी अनंत काळची माता असते. हे तत्व माणसाला उमजलं की या ईषणेचा जोर कमी होऊ लागतो. मग नोकरीत दुरच्या गावी बदली झाल्यावर मुलांच्या शिक्षणासाठी तो मुलांजवळ बायकोला ठेवून स्वतः बदलीच्या गावी एकटाच रहायला तयार होतो. लक्ष्मण हा रामावरील अपार प्रेमामुळे स्वतः वनवासात रामाबरोबर जातो आणि उर्मिलेला सासू-सासऱ्यांच्या सेवेसाठी अयोध्येतच ठेवतो. अशा तऱ्हेने कुटुंबासाठी म्हणून ते चौदा वर्षांचा विरह आनंदानं सोसतात. म्हणूनच "उर्मिले, त्रिवार वंदन तुला" या शब्दांत कवीनं तिचा गौरव केला आहे.

तेव्हा साहजिकच या ईषणांतून इच्छापूर्तीसाठी प्रयत्न सुरू होतो. त्यातून सुख-दुःख, त्यातून आसक्ती-तिटकारा, त्यातून काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, भय, चिंता हे विकार निर्माण होतात.

तर सांगायची गोष्ट अशी की सामान्य, अज्ञानी, अहंकारी माणसाचं जीवन हे अशा सर्व गोष्टींनी भरलेलं असतं. त्याला कारण म्हणजे ईश्वरी संकल्पाने सर्व गोष्टी घडतात, या मूल सत्याचं अज्ञान व त्यामुळे मी सर्व करतो असा झालेला भ्रमात्मक अहंकार, आणि त्यातून येणारं ममत्व व अयोग्य महत्व इतक्या गोष्टी असतात.

* * *

# प्रकरण ५वे

## ओवीचा शब्दशः अर्थ व त्यातून मिळणारी प्रेरणा

मी : पण महाराज, या ओवीत तर तसं कोठे म्हटलेलं नाही.

महाराज : नाही कसं? ओवीची पहिलीच ओळ पहा ना. माऊली म्हणते " जे जे भेटे भूत " यातील प्रत्येक शब्दाचा सूक्ष्म अर्थ आणि सौंदर्य जरा बघ ना.

मी : महाराज, जे जे असं दोनदा का म्हटलं आहे ?

महाराज : त्याचा जे. जे. स्कूल ऑफ आर्टस् किंवा जे. जे. हॉस्पिटलशी काही संबंध नाही. बरं का.

आपल्या बुद्धीला नेहमीच जोड्या तयार करायची सवय असते. काही एकमेकाना पूरक असतात उदा. लक्ष्मी-नारायण, शंकर-पार्वती, राम-सीता किंवा कृष्ण-राधा तर उरलेल्या बहुतेक विरुद्ध अर्थाच्या असतात. उदा. चांगलं-वाईट, योग्य-अयोग्य, बरोबर-चूक, निंदा-स्तुती, समर्थन-धिक्कार, दुषण-भूषण, नियमानुसार-नियमाविरुद्ध, कायदेशीर-बेकायदेशीर, अशा अनेक विरूध्द अर्थाच्या जोड्या आपल्या बुध्दीत ठाण मांडून बसलेल्या असतात. म्हणून सज्जन-दुर्जन ही जोडी दर्शविण्यासाठी माऊलींन जे जे आणि ते ते हे शब्द वापरले आहेत. आपल्याला भेटण्यास आलेला माणूस सज्जन असेल तर आपल्याला बरं वाटतं पण तो दुर्जन असेल तर केंव्हा एकदा त्याच्या तावडीतून आपली सुटका होईल असं आपल्याला होतं. उदा. आपला ऑफिसमधील साहेब चांगला असेल तर आपण आपली बदली होऊ नये म्हणून व तो वाईट असेल तर बदली व्हावी म्हणून खटपट करू लागतो. पण सज्जन व दुर्जन ही दोन्हीही भगवंताने धारण केलेली रूपं आहेत असं माऊली म्हणते. आता तुझ्या शंकेचं उत्तर माऊलीनं 'भेटे' या शब्दात दिलं आहे.

मी : ते कसं काय?

महाराज : हे पहा, जेव्हा मी एखाद्याला भेटायला जातो तेव्हा मी माझ्या इच्छेमुळे जात असतो. पण दुसरा जेव्हा मला भेटायला येतो तेव्हां तो माझ्या इच्छेमुळे खास येत नसतो, तर तो त्याच्या इच्छेनं येत असतो. म्हणजे मी माझ्या इच्छेनं त्याला व तो त्याच्या इच्छेनं मला भेटत असतो. हेच माऊलीनं "भेटे" या शब्दात सूचित केलं आहे. ती म्हणते की जे जे भूत तुला भेटत असतं ते तुझ्या इच्छेनं नव्हे तर ईश्वरी संकल्पात

तसं ठरलेलं असतं म्हणून ते तुला भेटत असतं आणि समजा, तुझ्या इच्छेने जरी तू एखाद्याला भेटायला गेलास तरी त्यावेळी ईश्वरी संकल्पामुळेच त्याला भेटायला जावं असं तुला वाटत असतं. त्यामुळे ईश्वरी संकल्पामुळेच तुला भूतं भेटत असतात, असं माऊलीने स्पष्टपणे म्हटलेलं आहे.

मी : पण महाराज भूत हा शब्द माऊलीनं का वापरला आहे?

महाराज : हा शब्द माऊलीनं अनेक अर्थानी वापरला आहे. प्रत्येक वस्तू पंचमहाभूतांनी बनलेली असते. पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश (याचं वर्णन हल्लीच्या भाषेत करायचं म्हणजे घन, द्रव, वायू या पदार्थांच्या तीन अवस्था, उर्जा आणि आकाश किंवा पोकळी) ही त्या पंचमहाभूतांची नांवं. हा अवकाश हे एक स्वतंत्र महाभूत आहे. असं आपल्या शास्त्रात मानलेलं आहे आणि प्रख्यात शास्त्रज्ञ आईन्स्टाईन्‌ने ते सिद्ध केलं आहे. कारण वस्तूला जशी वक्रता असते तशी अवकाशालाही वक्रता असू शकते, असा त्याने शोध लावला आहे. जसं शून्य हा आकडा ही भारतीय गणितज्ञांची जगाला देणगी आहे तसंच शून्यवत् भासणारे आकाश हे स्वतंत्र महाभूत आहे. ही ही भारतीय तत्वज्ञानाची जगाच्या तत्वचिंतकांना दिलेली एक देणगीच आहे.

[सर्व जग हे पंचमहाभूतांनी बनलेलं आहे, आणि आपल्या ज्ञानेंद्रियांना फक्त पंचमहाभूतांचेच गुणधर्म जाणवतात आणि या गुणधर्मावरून ती वस्तू काय असावी याचं आपण अनुमान करतो. हे सांगण्यासाठी भूत हा शब्द वापरला आहे. तसंच ह्या सजीव किंवा निर्जीव वस्तूचं ज्ञानसुद्धा स्मृतीत गेलेल्या भूतकाळाच्या मदतीनं होतं हे ही भूत या शब्दाने माऊलीने सांगितलं आहे.]

मी : इथपर्यंत चांगलं समजलं. पण महाराज "ते ते मानिजे भगवंत" या ओळीत "मानिजे" असं माऊलीने का म्हटलं आहे ?

महाराज : कारण काहीतरी मानणं आणि ते मानल्याशिवाय विचार व कार्य न करता येणं हा बुध्दीचा गुणधर्म आहे. Everything in this world is relative. असं आईन्स्टाईन्‌ने म्हटलं आहे. आतापर्यंत प्रत्येक वस्तूला स्वतंत्र अस्तित्व आहे असं मानून आपला सर्व व्यवहार चालू असतो. आणि त्यातूनच सर्व घोटाळा निर्माण होत असतो. म्हणून ही वस्तू व आपण ही दोन्हीही एकाच भगवंताची रूपं आहेत व एकच ईश्वरी शक्ती दोन्ही ठिकाणी दोन वेगवेगळ्या माध्यमातून प्रकट होत असते. म्हणून ती वेगळी भासते. एरवी ती एकच आहे हे सत्य बुध्दीने मानल्याशिवाय हा सर्व

घोटाळा निस्तरता येत नाही. आणि माणसाला दैवी जीवन जगता येत नाही. हे सांगण्यासाठी माऊलीनं "मानिजे" हा शब्द उपयोगात आणला आहे.)

मी : महाराज, सर्व गोष्टी ईश्वरीसंकल्पानुसार घडतात आणि सारा भूतकाळ म्हणजे ईश्वरी संकल्पाचं. प्रकटीकरण आणि त्याची स्मृतीत साठवण हे मला आता चांगलं पटलं. पण भविष्यकाळातील ईश्वरी संकल्प आपल्याला कळत नाही. मग या सत्याचा आपल्याला जीवनात उपयोग काय ?

महाराज : (हसून) प्रत्येक गोष्टीचा उपयोग आणि उपभोग यांच्या दृष्टीतून विचार करणं हा ही मानवी बुध्दीचा आणखी एक गुणधर्म आहे. म्हणून गुलाबाचं फूल दिसलं की त्याच्या सौंदर्याचा आस्वाद घेण्याऐवजी त्याचा गुलकंद करून कसा खाता येईल याचा विचार माणूस करू लागतो. परवाच एक विचित्र बातमी वाचली . अरबस्तानात म्हणे उंटांच्या शर्यतीत लहान मुलांना त्यांच्या पाठीवर बांधतात व मुलांना फटके मारतात. त्यांच्या किंकाळ्या ऐकून उंट जोरात धावू लागतात. म्हणजे लहान मुलांच्या निरागस सौंदर्यांचे कौतुक करायचं सोडून त्यांचा हा विकृत उपयोग करून घेण्याची बुध्दी या माणसांना होते. असो. आता तुझ्या प्रश्नाकडे वळू. आपण बीजगणितात एखादा प्रश्न सोडवण्यासाठी "क्ष" चा उपयोग करतो. योग्य अशा सुत्रात "क्ष" वापरून ते सूत्र सोडवतो व "क्ष" ची किंमत काढतो. आता ही किंमत अधिक आली किंवा उणे आली तरी त्याचं सुख-दुःख आपण मानीत नाही. [तसंच ईश्वराने ज्ञान, विचार,क्रिया व स्मृती म्हणजे भूतकालीन ईश्वरी संकल्प यांचा क्ष व सूत्र यांच्या सारखा उपयोग करून घेण्याचा गुणधर्म बुध्दीत निर्माण केला आहे. फरक इतकाच की या क्ष च मूल्य नेहमी आपल्या मनासारखं सुखमयच असावं असा आपला हट्ट असतो. त्यामुळे सुख मिळालं नाही की मानसिक दुःख होतं आणि शिवाय शारिरिक वेदनामय दुःख असतं ते वेगळंच. या दोन गोष्टीमुळे माणसाच्या जीवनात दुःखाचं पारडं नेहमीच जड होतं म्हणून " सुख पाहता जवापाडे ! दुःख पर्वताएवढे !" असं तुकाराम महाराज म्हणतात. म्हणून अज्ञानी माणूस भूतकालीन ज्ञानाच्या मदतीने भविष्यकाळासंबंधी मनोरे बांधत असतो. तर ज्ञानी मनुष्य तो भविष्यकाळातील ईश्वरी संकल्प वर्तमान काळातून समजेपर्यंत वाट पहातो व वर्तमानकाळाचं ईश्वरीसंकल्प म्हणून स्वागत करतो. कारण ईश्वरी संकल्प हा नित्य नूतन असतो हे त्याला पक्कं ठाऊक असतं. म्हणून जे. कृष्णमूर्ती ईश्वरी संकल्प या शब्दाचा उच्चार न करता सतत वर्तमानात

रहा. कारण तो नित्यनूतन असतो, असा उपदेश करत असत व या ईश्वरी रूप+गुणधर्म+शक्ती+संकल्प यालाच ते अंतिम सत्य असं म्हणत असत.

मी : महाराज, याचा अर्थ आपण भविष्यकाळाचा विचारच करू नये की काय ?

महाराज : असं कोण म्हणतो ? भविष्यकाळाचा विचार आपण आपल्या व्यवहारात नियोजन करण्यापुरताच करावा. उदा. मी उद्या काय काय करावं हे ठरवायला आज काहीच हरकत नाही. पण आपलं हे ठरवणं म्हणजे फक्त "क्ष" गृहीत धरण्यासारखं आहे. आता हा "क्ष" ईश्वरी संकल्पाच्या सूत्रात घालून त्याची जी किंमत येईल ती आपण अपेक्षा केलेल्या किंमतीइतकी असेलच असं नाही. कारण ती किंमत अगोदरच ठरलेली आहे. आणि ती उद्या प्रकट होणारच आहे. म्हणून आज जे आपण ठरवू तसंच उद्या घडेल असं मात्र समजू नये.

तेव्हा वस्तू पाहिल्यावर ज्ञान, विचार व क्रिया आणि त्या ज्ञानातून वस्तूचे गुणधर्म आपल्याला सुखदायक असल्यास ती मिळण्यासाठी इच्छा, प्रयत्न व फळ, तसंच कारण, कार्य व परिणाम याचं ज्ञान या तिन्ही त्रिपुट्या जीवाच्या बुध्दीत कार्यरत असतात. उदा. सरकारच्या बजेटमध्ये दोन प्रकारचे आकडे असतात. एक अंदाजे (एस्टीमेटेड) आणि दुसरे प्रत्यक्ष (ॲक्च्यूअल्स) तसं जीवेच्छा ही अंदाज आणि ईश्वरी संकल्प हा प्रत्यक्ष आकड्यांसारखा असतो. दुसरं उदाहरण द्यायचं म्हणजे धंद्याच्या मालकाला आपल्याला जास्तीत जास्त नफा व्हावा असं वाटतं म्हणून धंद्यातल्या फायद्या-तोट्यावर त्याचं सुख-दुःख अवलंबून असतं. पण धंद्यातील हिशोब तपासणाऱ्या ऑडिटर्सना किंवा तपासनिसांना मात्र त्याचं सोयर-सुतक अजिबात नसतं. खरी वस्तुस्थिती काय असते हेच त्यांना शोधून काढायचं असतं. तसं आपल्या इच्छा, आकांक्षा या ईश्वरी संकल्पाची वस्तुस्थिती काय आहे हे शोधून काढण्यासाठीच असतात. पण अज्ञानी माणूस मात्र आपल्या सर्व इच्छा इच्छापूर्तीसाठीच असतात, असं मानतो व त्यामुळे पुढील सर्व चक्रात अडकतो.

मी : पण महाराज, आम्हाला असं वाटतं की जर इच्छेची पूर्ती होणार नसेल तर ती करायचीच कशाला ?

महाराज : जसं काही चहाबाज लोकांना वाटतं की जर सकाळी उठल्यानंतर चहा प्यायचा नसेल तर सकाळी उठायचं कशाला ? असो. पुढची शंका काय आहे ?

मी : ईश्वरानं विश्वातील सर्वच रूपं स्वतः धारण केली आहेत. असं तुम्ही सांगता,

म्हणूनच त्यावर विश्वास ठेवावासा वाटतो. पण तसं असेल तर मग दुर्जन, दुष्ट खलनायक, तसंच साप, नाग, विंचू वगैरे विषारी प्राणी यांचीही देव म्हणून पूजा करावी लागेल. तुम्ही कितीही सांगितलंत तरी दुष्ट, नराधम, क्रूर, नरराक्षस ही ही ईश्वराची रुपं आहेत हे मानायला माझं मन अजून काही तयार होत नाही. असं कां होतं ?

महाराज : कारण अजून तुझं मन तितकं विशाल झालेलं नाही म्हणून. शिवाय आपल्या प्रगतीसाठी आपण नेहमी चांगल्याचा स्वीकार व वाईटाचा धिक्कार करावा असं आपल्याला लहानपणापासून शिकवलं गेलं आहे. म्हणून फक्त पवित्र, मंगलमय, कल्याणकारी अशा गोष्टींनाच आपण दैवी किंवा ईश्वरीय असं म्हणतो व दुष्ट, संहारक शक्ती या सैतानाच्या आहेत असं मानतो. पण हा फक्त मानवी कल्याणाच्या पातळीवरचा विचार आहे. शिवाय माऊलीनं सांगितलेल्या भगवंताची वेगळी पूजा वगैरे करावी लागत नाही. तर त्याला समजावून घेणं, त्याचं ज्ञान होणं हीच त्याची पूजा असते. जरा खोलात जाऊन विचार केला की तुला असं दिसून येईल की आपल्याला जे वस्तूचं ज्ञान होतं त्या वस्तूमुळे आपल्या अस्तित्वाला धोका नाही ना हे प्रथम पाहिलं जातं आणि थोडासा जरी धोका आहे असं वाटलं तरी आपण त्या वस्तूपासून लांब पळतो आणि सुरक्षित जागी जाऊन बसतो. कारण त्या वस्तूचे गुणधर्म आपल्या अस्तित्वाला धोकादायक असतात. पण म्हणून ते ईश्वराचंच रूप आहे, या सत्याला बाध येत नाही. तुकाराम महाराज म्हणतात "सर्प, विंचू नारायण ! परी ते वंदावे दुरून !" नाग, विंचू ही देवाचीच रूपं आहेत याचं स्मरण ठेवावं. पण नागाच्या फणेवर किंवा विंचवाच्या नांगीवर जर डोकं ठेवायला गेलात तर तुमचाच कपाळमोक्ष होईल व राम कसा कर्ता आहे हे समजून घ्यायला तुम्ही शिल्लकच रहाणार नाही. म्हणून या प्राण्यांना दुष्ट प्राणी या सदरात आपण टाकलं आहे. तसंच आपल्या समाजात वैयक्तिक मालकीला कायदेशीर मान्यता असल्यामुळे या जीवनात जमवलेल्या वस्तूंची मालकी जे आपल्याकडून हिरावून घेतात, त्यांना आपण दुष्ट, दुर्जन म्हणतो. आता जे प्राणी आपल्यापेक्षा लहान असतात त्यांच्या दृष्टीने विचार केला तर आपणही दुष्ट, दुर्जन ठरतोच की. उदा. एखादी बाई घराची स्वच्छता करण्यासाठी हजारो मुंग्यांचा, झुरळांचा, कीटकांचा, डासांचा, पालींचा संहार करते. तेव्हा त्या सगळ्यांच्या दृष्टीनं विचार केला तर ती क्रूर, दुष्ट, नराधम (की मादी-अधम?) ठरते. पण तिला तसं कधीच वाटत नाही. कारण ती त्यांचा संहार करून साफसफाईच्याद्वारा स्वतःचं सुखी अस्तित्व

टिकवण्याचा विचार करत असते. कारण स्वच्छ घर पाहिलं की तिला आनंद होतो. तसंच आपल्या शरीराचं अस्तित्व टिकावं म्हणून प्रत्येक क्षणी लाखो रोगजंतूंची हत्या आपल्या शरिरात चालू असते. इतकंच काय पण जन्मभर अहिंसेचा प्रचार करणाऱ्या गौतम बुध्दाच्या शरीरातसुध्दा अशीच हिंसा चालू होती. म्हणून तो अहिंसेचा प्रचार करण्यासाठी जिवंत राहू शकला. तेव्हा आपलं अस्तित्व टिकवण्यासाठी मदत करणारा तो सज्जन,सुष्ट व ते धोक्यात आणणारा तो दुष्ट-दुर्जन अशी मानवी पातळीवरची माणसांची विभागणी आपण केली आहे. पण या पलीकडे जाऊन विचार केल्याशिवाय सुष्ट-दुष्ट, सज्जन-दुर्जन ही सारी एकाच ईश्वराची रूपं आहेत, ही वस्तुस्थिती आपल्याला पटणं कठीण जातं.

मी : महाराज, या संबंधात एखादं उदाहरण सांगाल कां?

महाराज : हे पहा, सायकल, मोटार-सायकल, स्कूटर, मोटार, लॉरी, एस्.टी.ची प्रवासी गाडी, आगगाडी, विमान आणि हेलिकॉप्टर ही सर्व प्रवासाची साधनं आहेत. आता या सर्व साधनांना जशी गतिवर्धकाची जरूरी असते तशी गतिरोधकाचीही गरज आहे. उदा. दोन वस्तूंमध्ये निर्माण होणारं घर्षण हे नैसर्गिक गतिरोधक असतं म्हणून गतिमान वस्तूची बाह्य बल-प्रेरणा थांबली की कालांतरांने तिची गती थांबते. म्हणून वाहन चालवताना गती वाढवण्यासाठी आपण गतिवर्धकाचा उपयोग करतो. अगदी तसंच भगवंताला या विश्वाचा गाडा चालवायचा असल्यामुळे त्यालाही गती कमी करण्यासाठी दुर्जनांची व गती वाढवण्यासाठी सज्जनांची आवश्यकता असते. शिवाय असं पहा की सज्जन व दुर्जन ही दोन्हीही त्याचीच रूपं आहेत. जसं मोटार चालक ज्या पायाने गतिवर्धक दाबून गती वाढवतो त्याच पायाने ब्रेक दाबून गती कमी करतो. किंवा सायकल चालवणारा पायाने पॅडल मारून गती वाढवतो तर हाताने ब्रेक दाबून गती थांबवतो. पण हात व पाय दोन्हींही त्याचेच असतात.

शिवाय असं पहा, एखाद्या वाहनाच्या कारखान्यात गतिवर्धक आणि गतिरोधक तयार करण्याची दोन वेगळी खाती असतात दोन्ही खाती आपल्या उत्पादनाची कार्यक्षमता वाढवण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत असतात. आणि त्यांचे प्रयत्न सकृत्‌दर्शनी एकमेकांच्या विरूध्द आहेत, असं वाटलं तरी कारखान्याच्या मालकाच्या दृष्टीने दोघांचही महत्त्व सारखंच असतं, तसं सज्जन हे जगाच्या कल्याणासाठी तर दुर्जन हे जगाच्या विनाशासाठी प्रयत्न करत असतात. शिवाय ही दोन्ही रूपं त्यानेच धारण केलेली असतात. यावरून

सहज एक गोष्ट आठवली.....

एका माणसाचा बंदुकीच्या गोळ्यांना सुध्दा दाद देणार नाही अशी काच तयार करण्याचा कारखाना होता. ही काच तो संरक्षण खात्याला पुरवीत असे. एकदा संरक्षण-मंत्र्यांनी त्याची काच बंदुकीच्या गोळीने फोडून दाखविली. त्याने दिलगिरी व्यक्त करून लवकरात लवकर अधिक मजबूत काचेचा नमुना आणून द्यायचं कबूल केलं. त्याप्रमाणे त्याने मजबूत काच तयार करून आणून दिली. तो मंत्र्यांच्या केबिनमधून बाहेर आला. त्यावेळी एक माणूस बाहेर मंत्र्याच्या बोलवण्याची वाट बघत बसला होता. पुन्हा काही काळानंतर संरक्षण मंत्र्यांनी त्याला बोलावून त्याची काच फोडून दाखविली. त्याने पुन्हा अधिक मजबूत काच तयार करण्याचं आश्वासनं दिलं. असं दोन चार वेळा झालं. दरवेळी हा मंत्र्यांच्या केबिनमधून बाहेर आला की बाहेर नेमका तोच माणूस मंत्र्यांच्या केबिनच्या बाहेर थांबलेला असे. शेवटी त्याने याचा परिचय करून घेतला आणि व्यवसाय काय याची चौकशी केली तेव्हा तो म्हणाला की माझा कोठलीही काच फोडेल अशा बंदुकीच्या गोळ्या तयार करण्याचा कारखाना आहे. पण मी अशा गोळ्या तयार केल्या की मंत्री माझ्यासमोर अशी काच ठेवतात की तिला माझ्या गोळ्या फोडू शकत नाहीत. तेव्हा त्याला सर्व उलगडा झाला. यात संरक्षण मंत्र्यांनी मात्र दोघांचीही कार्यक्षमता वाढवली. तसंच सज्जनांमुळे दुर्जनांची कठोरता आणि दुर्जनांमुळे सज्जनांची सहनशीलता ईश्वराला वाढवायची असावी.

शिवाय ब्रेक्सच्या खात्यात काम करणारा माणूस गती कमी करण्याचा प्रयत्न करीत असतो. पण नंतर त्याची बदली जर गतिवर्धकाच्या खात्यात झाली की तोच माणूस गती वाढेल कशी याचा विचार करू लागतो. तसंच भगवंताच्या या विश्वाच्या कारखान्यामध्ये हजारो माणसांना मारणारा, प्रत्येक मनुष्य - हत्येसाठी एक खडा याप्रमाणे खड्यांनी ज्याचे सात मोठे रांजण भरलेले होते असा दरोडेखोर वाल्या कोळी, ईश्वरी संकल्पामुळे जेव्हा वाल्मिकी ऋषी बनला तेव्हा काम-मोहित अशा क्रौंच पक्षाचीसुध्दा हत्या त्याच्या मृदु अंतःकरणाला सहन झाली नाही. लांब कशाला, माझंच उदाहरण घे ना. मी देखील दुर्जन माणूस म्हणून भगवंताच्या ब्रेकच्या खात्यात बरीच वर्षे काम करीत होतो. नंतर ईश्वरी संकल्पामुळे माझी या खात्यात बदली झाली. तेव्हा लोकांचा विश्वासच बसेना. "करून करून भागला ! आणि देव पूजेला लागला !" असं माझे मित्र त्यावेळी म्हणाले होते.

मी : महाराज, तुम्ही सांगता म्हणूनच ही गोष्ट खरी मानायला पाहिजे नाहीतर तुम्ही दुर्जन होतात ही गोष्ट मला तरी अगदी अशक्य वाटते.

महाराज : अरे, भगवंताच्या राज्यात काय अशक्य आहे बाळ, भगवंताची लीला अगाध आहे.

मी : असं आणखीन एखादं उदाहरण असलं तर सांगा ना ?

महाराज : अरे, उदाहरणांना काय तोटा ? ज्ञानेश्वरीत माऊलीनं ४००० दृष्टांत दिले आहेत असं जाणकार म्हणतात. हे पहा, हल्ली दुर्मिळ असलेल्या एखाद्या एकत्र कुटुंबात खूप मुलं सुटीत आजोळी आलेली असतात. दिवसभर ती दोन विरूध्द पार्ट्या पाडून वेगवेगळे खेळ खेळत असतात. संध्याकाळी खेळ संपला की जिंकलेली पार्टी छाती पुढे काढून व हरलेली पार्टी खाली मान घालून पण आपण चांगला लढा (फाईट) दिला असं स्वतःचं समर्थन करीत आजीकडे येतात व आपला पराक्रम रंगवून रंगवून तिला सांगतात. आता आजीची दोन्ही विरूध्द पार्ट्यातील खेळाडूंवर सारखीच माया असते. तेव्हा ती म्हणते. "मेल्यांनो, खूप खेळलात. आता आत चला आणि गरम गरम गुरगुट्या भात आणि त्यावर तूप व वरण घालून तो छानपैकी खाऊन घ्या पाहू." या उदाहरणावरून तरी तुला आता सज्जनात आणि दुर्जनात, रामात आणि रावणात, कृष्णात आणि कंसात तोच विलास करत असतो हे समजलं का ?

मी : तरी सुध्दा एखादा दुर्जन एखाद्या निरपराध माणसाचा बळी घेतो तेव्हा त्या दुर्जनाच्या ठिकाणी ते ईश्वराचं रूप आहे अशी कल्पना करणं कठीणच जातं.

महाराज : अरे, तुला मघाशीच सांगितलं नाही का ? तुझ्या चिंतनाला खोली आणि विशालता आली की ते जमू लागेल. त्यासाठी तुझ्या चिंतनात स्पष्टता आली पाहिजे. ती कशी आणावी तेच तर या ओवीत सांगितलं आहे. आणि काय रे ? माणसाच्या सर्व सुखसोयींसाठी तो सर्व ठिकाणी वृक्षांचा, झुडपांचा व वनस्पतींचा उपयोग करत असतो. उदा. खाण्यासाठी अन्न, धान्य, फळं, पालेभाज्या, वासासाठी व सौंदर्यासाठी फुलं व पानं, घरासाठी लाकडं, फांद्या, गवत, इतकंच काय पण मेलेल्या माणसाला जाळण्यासाठी सरण किंवा चिता (जळाऊ लाकडं) तसंच औषधासाठी वनस्पती इत्यादी. आता तूच सांग की माणसं जेव्हा अशा निरपराध वृक्षांचा, झाडांचा, वनस्पतींचा त्यांच्या मनाला येईल तसा उपयोग करतात तेव्हा आपण क्रूर किंवा दुर्जन आहोत असं त्यांना क्षणभर

तरी वाटतं का ?

मी : महाराज, ईश्वराने "जीवो जीवस्य जीवनम्" असा नियम घालून दिला आहे. त्याला आम्ही काय करणार ? पण त्याने असा नियम का केला असावा ?

महाराज : कारण त्याला थोड्या सामग्रीत सर्वांच्या अन्नाची सोय करायची असावी. नाहीतर प्रत्येक जीवासाठी स्वतंत्र अन्न निर्माण करायचं असं जर त्यानं ठरवलं असतं तर त्याला किती प्रचंड प्रमाणात अन्न निर्माण करायला लागलं असतं याची कल्पनाच केलेली बरी. म्हणूनच आपल्याला जगण्यासाठी वनस्पतींचा, पक्ष्यांचा, माशांचा, प्राण्यांचा, पशूंचा वध करावा लागतो. त्याचं आपल्याला कधी वाईट तर वाटत नाहीच. उलट मिटक्या मारत भोजन करताना आपल्याला सुखच वाटतं. वृत्रासुराचा वध करण्यासाठी आपल्या अस्थी उपयोगी पडतील हे कळल्यावर दधीचि ऋषींनी जिवंतपणी मरण स्वीकारलं व मग देवांना आपल्या अस्थींचं दान केलं. याचं आपल्याला किती कौतुक वाटतं. पण इतर प्राणी व माणसं जगावी म्हणून या जगात प्रत्येक क्षणी कुठली तरी वनस्पती, धान्य, प्राणी, पक्षी, मासा, महादधीचि होऊन मरण स्वीकारताना दिसतो. याउलट दुसऱ्या बाजूला आपल्या पिल्लावर जीवापाड प्रेम करणारी माकडीण स्वतःच्या जीवावर बेतल्यावर मात्र आपलाही प्राण वाचवण्यासाठी त्याला पायाखाली घालून त्याचा बळी देते, असंही पहायला मिळतं. किंवा शाकाहारी असलेले विश्वामित्र ऋषि त्याना दुष्काळात कुत्र्याच्या तंगडीचं मांस खाऊन जीव जगवावा लागला. जेव्हा आपण सतत इतरांच्या मरणावर जगतो तेव्हा आपण स्वतःला दुर्जन मानत नाही पण दुसरा माणूस जगण्यासाठी माझा नाश करण्यासाठी प्रयत्न करतो तेव्हा मात्र आपण त्याला दुर्जन म्हणतो, हा विरोधाभास नव्हे काय ?

मी : हा विरोधाभास मिटवायचा कसा ?

महाराज : अरे, एकाच ईश्वराची ही सर्व रूपं आहेत, अगदी त्यात आपण सुद्धा धरून, हे समजल्यावर हा विरोधाभास शिल्लक राहात नाही. कारण वनस्पतीही तोच असतो आणि माणूसही तोच असतो. खाणाराही तोच आहे आणि खाद्यही तोच आहे. आणि विशेष म्हणजे खाल्लेलं पचविण्याची शक्तीही तोच आहे. गीतेत म्हटलंच आहे की,

"अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः ।
प्राणापान समायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम् ।।"

एका सत्पुरूषाला चोरांनी गाठलं. खूप चोप दिला व ते पळून गेले. तो बेशुध्द झाला. नंतर काही लोकांनी त्याला पाहीलं. ते त्याला घरी घेऊन गेले. त्याला शुध्दीवर आणलं व त्याची शुश्रुषा केली. काय झालं हे विचारल्यावर तो म्हणाला मी रस्त्यातून जात असताना ज्यानं(ईश्वरानं) मला मारलं तोच (ईश्वर) आता माझी शुश्रुषा करताना मला दिसतोय. त्याला तसं वाटतं होतं. कारण त्याच्या बुध्दीतला विरोधाभास, सर्वच ईश्वराची रूपं आहेत. या ज्ञानामुळे मावळला होता. आपलंही असंच होत नाही काय? आपण झोपेत असताना एका हाताला खाज आली म्हणून दुसऱ्या हाताने कराकरा खाजवतो. प्रसंगी त्यातून रक्तही येतं. पण जाग आल्यावर पहिला हात दुसऱ्या हाताला दुर्जन म्हणतो का व जशास तसं या न्यायाने भविष्यकाळात त्याचा सूड उगवतो का? नाही. कारण दोघांचाही एकच नियंता आपल्या बुद्धीत बसलेला असतो. तसं अज्ञानामुळे आपण सज्जन-दुर्जन असा भेद करतो. पण खरं तर ईश्वरी संकल्पानुसारच दोघेही तसं वागत असतात हे ज्ञान झाल्यावर सज्जनाला दुर्जनाच्या दुष्टपणाचा राग येत नाही व स्वतःच्या सज्जनतेचा गर्व वाटत नाही. कारण आपण दोघेही अज्ञात अशा ईश्वरी संकल्पाच्या पूर्व नियोजनानुसार वागत असतो असा त्याला विश्वास वाटत असतो.

मी : पण महाराज, ही गोष्ट इतकी स्पष्ट असतांना माणसाला याचं ज्ञान का होत नाही?

महाराज : कारण जेव्हा ईश्वरानं माणसाचं रुप धारण करायचं ठरवलं तेव्हा त्यानं या ईश्वरी स्वरुपाचं जीवाना ज्ञान नसावं असं ठरवलं. कारण नाहीतर पहिल्याच पिढीतील सर्व जीवांना ईश्वराचं ज्ञान होऊन ते मुक्त झाले असते व हा सृष्टीचा गाडा पुढे चालला नसता व ईश्वराला हल्लीच्या भाषेत सांगायचं म्हणजे शेवटची गाडी पकडून वैकुंठाला परत जावं लागलं असतं. म्हणून जीवाचे गुणधर्म ठरवताना त्यानं असं ठरवलं असावं की ईश्वरी स्वरुपाचं त्याला अज्ञान असावं व कालांतराने हे ज्ञान त्याला होऊन तो अज्ञानाच्या जाळ्यातून मोकळा होऊन ईश्वर स्वरुपी विलीन व्हावा.

मी : ज्ञात्याला अज्ञान कसं धारण करता येईल?

महाराज : ईश्वराला त्यात काय अशक्य आहे? आणि त्याचे अंश असलेले आपण नाही का दिवसभर काम केल्यावर जाणूनबुजून अज्ञान पांघरून घेवून झोप घेत? झोपेत आपल्याला काहीतरी ज्ञान असतं का? झोपेत असलेल्या माणसाच्या शेजारी मदन किंवा रती येऊन बसली काय किंवा एखादा विषारी नाग येवून फणा काढून

बसला काय. त्याला त्याचं काहीच सोयर-सूतक नसतं. इतकंच काय पण आपण झोपेतून केव्हा जागे होऊ की झोपेतच मरू याचीही खात्री नसते. तरी आपण सर्वजण रोज झोप घेतोच की नाही? आता कोणीतरी हाक मारल्यावर किंवा घड्याळाचा गजर झाल्यावर अथवा झोप पुरी झाल्यावर आपण जागे होतो ना. तसं सत्पुरूषाच्या संगतीने किंवा आवाहनाने वा आपलं अज्ञान पुरेपुर उपभोगून झालं व आपल्याला त्याचा कंटाळा येवू लागला किंवा त्रास होऊ लागला की मग ईश्वरीय ज्ञान कसं होईल याचा आपण मागोवा घेऊ लागतो. मग आपण हे ज्ञान मिळवीत असतानाच आपल्याला ज्ञानेश्वरीच्या वाचनात ही ओवी सापडते आणि मार्गही मिळतो.

मी : पण महाराज, सर्वशक्तिमान अशा ईश्वराने निर्जीव वस्तूंची व सजीव प्राण्यांची व माणसांची अशी अल्पशक्तिमान रुपं का धारण केली असावीत ?

महाराज : अरे, त्याचे अंश असलेले आपण सुद्धा लंगडीच्या खेळात एका पायावर उड्या मारून प्रतिस्पर्ध्याला पकडायचा प्रयत्न करीत नाही का? आपल्याला त्यावेळी दोन पायांवर धावपळ करण्याची शक्ती नसते का? तसंच कुठेही पळायची क्षमता असून देखील प्रतिस्पर्धी खेळाडू रिंगणातल्या रिंगणातच पळत राहात नाही का? आपण हे असं का करतो? तर आपल्यापैकीच कोणीतरी केलेल्या खेळाच्या नियमामुळे आपणाला तसं करावं लागतं. तसंच ईश्वराने या सृष्टीच्या लीलेसाठी स्वतःच घालून घेतलेल्या नियमाप्रमाणे त्याने अनेकविध अल्पशक्तिमान रुपं धारण केली. ज्ञानाच्या जोडीला अल्पशक्ती असली तरी त्यातून विनायक उर्फ बुध्दिदाता गणपती म्हणजे सृजनशील असा विवेक निर्माण होतो. याउलट मानवाने अल्पशक्तिमान असून सुद्धा आपल्या अज्ञानी बुद्धीच्या जोरावर इतका प्रचंड सावळा गोंधळ घातला आहे तर तो जर सर्वशक्तिमान असता तर त्याने या विश्वाचा नाशच करून टाकला असता. कारण ईश्वराच्याच नियमानुसार अज्ञान आणि शक्ती एकत्र आली की त्यातून विनाशक असा अहंकार निर्माण होतो म्हणून ईश्वराने अल्पशक्तिमान व बुद्धिवान अशा मानवाचं रुप धारण केलं असावं.

मी : हा "भक्तियोगु निश्चित" असं माऊलीनं का म्हटलं आहे?

महाराज : कारण भक्तियोगात इतर योगांतील लहान सहान उणीवा भरून काढलेल्या आहेत.

मी : त्या कशा काय, महाराज?

महाराज : योग हा शब्द "युज" धातूपासून तयार झालेला आहे. "युज" म्हणजे To Join-जोडणे. म्हणून योग शब्दाचा अर्थ व्यवहारात नवीन वस्तू मिळवणे असाही होतो. " अप्राप्तस्य प्राप्तः योगः । प्राप्तस्य परिपालनः क्षेमः ।" नवीन वस्तू मिळवणे म्हणजे योग व मिळवलेली वस्तू टिकवणे म्हणजे क्षेम. असा "योगक्षेम" या शब्दाचा अर्थ आहे. उदा. : स्त्री व पुरुषांनं लग्न करणे याला विवाहयोग असं म्हणायचं व उभयतांच्या अंगी क्षमाशील वृत्ती असल्यास क्षेम म्हणजे तो टिकणे व त्यातील गोडी वृध्दिंगत होणे. दोन माणसं एकत्र आली की ती उभयतांचं क्षेमकुशल विचारतात. म्हणजे सर्व काही आहे तसंच चांगल्या रितीने टिकून आहे ना? ठीक आहे ना? असा त्यांचा विचारण्याचा भाव असतो. तसंच दोन वस्तू एकत्र जोडणे म्हणजे योग असाही या शब्दाचा अर्थ आहे.

मी : म्हणजे हल्लीच्या भाषेत त्याला 'फेविकॉल" म्हणता येईल.

महाराज : यावरून मला सहज एक विनोद आठवला. मला एक गृहस्थ भेटले व म्हणाले की त्यांच्या मुलाला नोकरी लावण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केला व शेवटी त्याला कसाबसा एका कंपनीत चिकटवून टाकला. मी म्हटलं की कोठल्या कंपनीत? ते म्हणाले, " मी त्याला शेवटी फेविकॉलच्या कंपनीतच चिकटवून टाकला. तोही आता तिथे चांगला चिकटून बसला आहे." असं योग हा भक्ताचं चित्त आणि भगवंत यांना बेमालूमपणे जोडून टाकतो. हे योग चार प्रकारचे आहेत. कर्मयोग, राजयोग, ज्ञानयोग आणि भक्तीयोग. ज्यात विभक्त होण्याची क्रिया किंवा विभक्त असल्याची जाणीव नसते त्याला भक्ति म्हणतात. व्याकरणात विभक्तीचे प्रत्यय असतात. मी-तू पणाचा भाव असतो, तर जीवनात भक्तीचा प्रत्यय घ्यायचा असतो व भगवद्‌भाव अनुभवायचा असतो. माऊलीनं निवडलेल्या भक्तियोगात इतर तीनही योगातील अपूर्णता भरून काढली आहे.

मी : महाराज, ती कशी काय हे जरा सांगाल काय?

महाराज : यासाठी प्रत्येक योगाचा थोडक्यात परामर्श घेऊ या.

कर्मयोग म्हणजे कर्मफलाचा मानसिक त्याग करून निरपेक्ष भावनेनं कर्म करणं, म्हणजे केलेल्या कर्माचं फळ अनुकूल किंवा प्रतिकूल कसंही मिळालं तरी मनाचा समतोल व शांती ढळू न देणे. भगवान श्रीकृष्णानी गीतेत सांगितलं आहे की "कर्मणि एव अधिकारः, ते मा फलेषु कदाचन " याचा अर्थ तुझा फक्त कर्मावर

अधिकार आहे पण फळावर नाही. आता यात मी कर्म करतो पण कर्मफलदाता प्रारब्ध किंवा ईश्वर आहे असा अर्थ निघतो. म्हणून कर्मयोगात मी कर्म करतो ही भावना गृहीत धरली आहे. त्यामुळे अत्यंत सूक्ष्म प्रमाणात का होईना पण "मी" पणा शिल्लक राहातोच. पण भक्तियोगात कर्म हे ही मी करीत नसून ईश्वरी संकल्पामुळे माझ्याकडून ते करवलं जातं असा भाव असतो. त्यामुळे थोडासाही "मी" पणा उरत नाही.

आता राजयोगात द्रष्टा आणि स्वरुप यांच मीलन घडवायचं असतं आणि हे मीलन योगाच्या अभ्यासानं स्वतःच्या प्रयत्नानं घडवून आणायचं असतं. हे "अथ योग अनुशासनम् ।" या सूत्रात सांगितलं आहे. अनुशासन म्हणजे प्रयत्न. म्हणजे इथेही मी व माझे प्रयत्न हे आलेच. पण भक्तियोगात सर्वच गोष्टी ईश्वरी संकल्पामुळे घडत असतात, हे समजल्यामुळे ईश्वराचं एक सांत रुप त्याच्या अनंत रुपाशी पूर्व नियोजित ईश्वरी संकल्पामुळे मीलन पावतं असा साधकाचा भाव असतो. म्हणजेच इथे मीपणाला वाव नसतो. आता तिसरा ज्ञानयोग. हा "ब्रह्मसत्य जगन्मिथ्या " या तत्वावर आधारलेला आहे. यात ज्ञानेंद्रियांच्या मदतीने भासणारं हे जग मिथ्या म्हणजे खोटं मानून बुद्धीच्या पलिकडचं ब्रह्म, ज्यामुळे ही बुद्धी कार्य करू शकते ते ब्रह्म सत्य आहे असं मानून तशी साधना करावी लागते. ही साधना नेति नेति (म्हणजे न इति न इति-हे नव्हे) या तत्वावर आधारलेली असते. पण ही साधना सामान्य संसारी माणसांना विशेषतः स्त्रियांना फारच कठीण जाते. कारण नउमास उदरी वाहून व पदरी वाढवून लहानाचा मोठा केलेल्या पोटच्या गोळ्याला मिथ्या म्हणजे खोटा असं मानायला त्यांच मन धजत नाही. त्यामुळं ही माणसं अशा साधनेच्या वाट्याला सहसा जात नाहीत. पण भक्तियोगात हे जग, त्यातल्या सर्व वस्तू ही ईश्वराचीच रुपं आहेत असं समजल्यामुळे, ते ईश्वरा इतकंच सत्य आहे हे मानायला काहीच अडचण येत नाही. अशा तऱ्हेनं तीनही योगातील उणीवा या भक्तियोगात भरून काढल्या जातात. म्हणून "निश्चित" हा शब्द माऊलीनं वापरला आहे. जसं एखाद्या कर्जदाराला कोणीतरी जामीन राहिल्याशिवाय त्याचं कर्ज मंजूर होत नाही, तसं या ओवीत सांगितल्याप्रमाणे भक्तियोगाची साधना करणाऱ्या साधकाला माऊली स्वतः जातीने जामीन राहील असं "निश्चित" या शब्दानं माऊलीनं सुचवलं आहे.

✱ ✱ ✱

# प्रकरण ६ वे

## भगवंताशी एकरूप होण्याची साधना - मंत्र व तंत्र

मी : महाराज, आपण मला ओवीतल्या सर्व शब्दाचा अर्थ अगदी मूळांपासून आणि विस्तृतपणानं सांगितलात व माझ्या सर्व शंकाही संपल्या. आता या ओवीतली साधना कशी करायची ते मला सांगा.

महाराज : या ओवीत माऊलीनं काहीही वेगळी अशी साधना करायला सांगितलेली नाही हेच या ओवीचं वैशिष्ट्य आहे. "नलगे सायास । जाणे वनांतरा । सुखे येतो घरा। नारायण ।" तुकाराम महाराज. माऊलीची अध्यात्माची व्याख्या फार सोपी आहे. मुद्दाम ठरवून करतो तो व्यवहार आणि सहज घडतं ते अध्यात्म. त्यामुळे ईश्वर-स्मरणात शुद्ध अंतःकरणानं सहजपणानं जीवन व्यतीत केलं की त्याचं आपोआप अध्यात्मिक साधनेत रुपांतर होतं. तुकाराम महाराजांनी भंडारा डोंगरावर बसून साधनेसाठी त्या डोंगराएवढे कष्ट केले. ईश्वरप्राप्तीसाठी आपला प्राणसुद्धा पणाला लावला. पण हेच तुकाराम महाराज सिद्ध झाल्यावर त्यांनी साधकांना असा उपदेश केला की,

" नको सांडू अन्न । नको सेवू वन । चिंती नारायण । सर्व भोगी ।।
मातेचिया खांदा । बाळ नेणे शीण । भावना त्या भिन्न । मुंडावया ।।
नको गुंतो भोगी । नको पडो त्यागी । लावूनी सारेची अंगी । देवाचिया ।।"

भगवंताच्या भेटीसाठी उपास तापास करण्याची किंवा संसार सोडून जंगलात जाऊन राहण्याची काहीच गरज नाही. तर संसारातच राहून प्रत्येक क्षणी सर्व सुख-दुःखात, भोगात-उपभोगात, रती-उपरती मध्ये भगवंताचं चिंतन करावं, गोंदवलेकर महाराजही हेच म्हणतात. "नामांत रंगुनिया व्यवहारी सर्व भोग सेवावे ।। हाचि सुबोध गुरूंचा भोगासंगे कुठे न गुंतावे ।।" आता तुला जसं जमेल तसं नामस्मरण तू करत असतोसच पण सर्व उद्योग बाजूला ठेऊन दिवसभर एकांतात नामस्मरण करीत बसणे तुला शक्य झाले आहे काय ? म्हणूनच हातचा उद्योग बाजूला न ठेवता त्या उद्योगातच भगवंताचं स्मरण घडवण्याची साधना या ओवीत माऊलीनं सांगितली

ईश्वरी ज्ञानाच्या चौकटीच्या चार बाजू
व्यवहाराची चौकट

आहे.

मी : (उत्सुकतेने) पण महाराज, प्रत्यक्षात ही साधना कशी साधायची ते सांगाना ?

महाराज : इतका वेळ आपण ओवीतील प्रत्येक शब्दाचा अर्थ पाहिला. आता सबंध ओवीचा अर्थ पाहू या. आपल्याला दिवसभरात ज्या ज्या निर्जीव वस्तू किंवा सजीव प्राणी आणि माणसं वगैरे भेटतील ती ती सर्व भगवंताची रूपं आहेत असं मानणं म्हणजे निश्चितपणे भगवंताची भक्ती करणं होय, असं माऊली या ओवीत म्हणते. आता ही भक्ती रोजच्या दैनंदिन कार्यक्रमाच्या चौकटीत कशी बसवायची हा तुझा प्रश्न आहे. त्यासाठी ईश्वरी ज्ञानाची चौकट दैनंदिन व्यवहाराच्या चौकटीला जोडून टाकावी म्हणजे झालं. ईश्वरी ज्ञानाच्या चौकटीला चार बाजू आहेत. पहिली बाजू म्हणजे आपल्यासकट सर्व विश्व हे ईश्वराच्या सांत व मर्यादित अशा असंख्य रूपांनी भरलेलं आहे. दुसरी बाजू म्हणजे या सर्व रूपांचे म्हणजेच ईश्वराचे असंख्य गुणधर्म आहेत. त्यातून एकच ईश्वराची शक्ती विविध गुणधर्मांच्या रूपाने प्रकट होत असते ही तिसरी बाजू आणि आपल्या आयुष्यात आणि या विश्वात प्रत्येक क्षणी जे जे घडत असतं ते ते पूर्वनियोजित ईश्वरी संकल्पानुसार घडत असतं, ही ईश्वरीय ज्ञानाची चौकट बंद करणारी चौथी बाजू. या चौकटीत भक्ताचा भगवंत हा बंदिस्त झालेला असतो. आपल्याकडे प्रेमाचा त्रिकोण वगैरे असतो, असं म्हणतात. पण आपल्या व्यवहाराची चौकट कशी असते पहा. आपण पंचेंद्रियांच्या द्वारा, स्मृतीच्या सहाय्याने व बुध्दीच्या मदतीने वस्तू ओळखतो व तिचे गुणधर्म आपल्याला समजतात. नंतर आपण त्या वस्तूची तिच्या भूतकाळातील गुणधर्मांशी किंवा इतर तशाच वस्तूंच्या गुणधर्मांशी तुलना करतो, व मग त्यातील साम्य व फरक आपल्या लक्षात येतात. मग आपण त्यावर विचार करून किंवा केल्याशिवाय तिचा उपयोग व्हावा, उपभोग मिळावा वा दुःख टळावं म्हणून प्रयत्न करतो. त्यातून पुन्हा सुख-दुःख, त्यातून आसक्ती-तिटकारा, त्यातून कामक्रोधादि विकार, त्यातून स्मृतीतल्या पूर्व संस्कारांना हे संस्कार जोडले जाणं व हे सर्व पुन्हा स्मृतीत जमा होणं हे आपण मागे पाहिले आहे. अशा या ज्ञान, विचार, प्रयत्न व विकार यांनी बनलेल्या व्यावहारिक चौकटीला ईश्वरी ज्ञानाची चौकट कशी जोडायची ते सांगतो. त्यासाठी प्रथम "मी" पासून सुरूवात करू या.

सकाळी आपल्याला जेव्हा जाग येते त्यावेळी डोळे उघडून पहायच्या अगोदर माऊलीच्या भाषेत सांगायचं म्हणजे आपल्याला पहिल्याप्रथम आपला "मी" भेटतो.

व्यावहारिक चौकटीतल्या या "मी"ला स्वतंत्र अस्तित्व असतं व ते स्वातंत्र्य त्याला अबाधितपणे टिकवायचं असतं. त्याला चिरंजीव होऊन जगायचं असतं. म्हणून त्याला मरणाची भिती वाटत असते. आतापर्यंत सुरळीत चाललेलं जीवन यापुढेही असंच सुरळीत चालत राहील असं त्यानं गृहीत धरलेलं असतं. त्याला सुखाचा हव्यास असतो व ते दिवसेंदिवस भूमितीश्रेणीनं वाढावं असं त्याला वाटत असतं. त्याला दुःखाचा वाराही नको असतो. त्यामुळे शारिरिक दुःख उद्भवलं की त्याला वैताग येतो व ते नष्ट करीपर्यंत तो बेचैन असतो. त्यामुळे त्याला मानसिक दुःख होत रहातं. त्याच्या सर्व इच्छा पुऱ्या व्हाव्यात असंही त्याला वाटतं. द्रव्येषणा, दारेषणा, लोकेषणा, कामेषणा या सर्व ईषणा त्याच्या मनात खळबळ माजवत असतात. या पुऱ्या झाल्या तर नवीन इच्छा व नाही पुऱ्या झाल्या तर पुन्हा मानसिक दुःख असं न संपणारं दुष्ट चक्र सतत त्याच्या बाबतीत चालू रहातं. एखादी वस्तू मिळवेपर्यंत अस्वस्थता, मिळवण्यासाठी अविश्रांत श्रम व मिळाल्यावर तिचा कंटाळा व पुन्हा नव्याचा हव्यास यामुळे नेहमीच त्याचं मन असंतुलित व असंतुष्ट असतं. असा हा अहंकाराच्या तावडीतला व्यावहारिक "मी", हा कधी द्रष्टा असतो, तर कधी ज्ञाता असतो, कधी भावनाशील असतो, तर कधी कार्यकर्ता असतो. तो मुलगा-मुलगी, स्त्री-पुरूष, आजी-आजोबा, आई-बाप, काका-काकू, मामा-मामी, मावसा-मावशी, आतोबा-आत्या, मित्र-मैत्रिण, कलावंत, खेळाडू, विद्यार्थी-शिक्षक यापैकी काहीतरी असतो. तो माणूसही असतो. पण आपण मुळात चैतन्यमय शक्तीचं स्वरूप आहोत याचं मात्र त्याला अज्ञान असतं.

तर असा हा "मी",जो आपण झोपेत असता स्वतः गुप्त झालेला असतो तो आपण जागे झाल्यावर आपल्याला त्याच्या सर्व गुणविशेषांसह प्रथम भेटतो. इथून आपली माऊलीप्रणीत साधना सुरू होते. माझं शरीर,माझं मन, माझी बुध्दी, माझं अंतःकरण आणि स्वतः "मी" जीव ही सर्व त्या ईश्वराने धारण केलेली रूपं आहेत आणि ही सर्व रूपं मिळून होणारी "मी" अशी जी जाणीव आहे ती ही ईश्वराचं एक रूप आहे. तसेच माझे बरे वाईट गुणधर्म हे त्या ईश्वरानेच धारण केलेले गुणधर्म आहेत आणि या सर्वातून त्याची शक्ती प्रकट होत असते. हीच त्याची शक्ती विश्वातल्या वेगवेगळ्या माध्यमातून आपल्याला व्यक्त होत असते. तसंच आता मी आहे. मी जिवंत आहे आणि मी जागा आहे ही जी जाणीव आहे तीही या शक्तीचंच प्रकटीकरण

आहे आणि हे माझं जिवंत असणं हे पूर्वनियोजित ईश्वरी संकल्पानुसार घडत आहे. म्हणून मी स्वतंत्र जीव असण्याबरोबरच ईश्वरमय व ईश्वररूप असा ईश्वराचा अंशही आहे व या सृष्टीच्या जन्माअगोदर मी अनंत, अव्यक्त व सर्वशक्तीमान असा ईश्वर होतो व सृष्टीच्या अंतानंतर पुन्हा तसाच असणार आहे. फक्त सृष्टी निर्माण झाल्यावर मी अव्यक्त स्वरूपातून व्यक्त स्वरूपात या जीवाचे गुणधर्म धारण करून आलो आहे असा विचार करावा. त्याचं पुन्हा पुन्हा मनन करावं.

मी : पण महाराज, या चिंतनाला काही आधार आहे काय ?

महाराज : या चिंतनाला आधार म्हणजे भगवान श्रीकृष्णाने गीतेत सांगितले आहे की "ममैवांशो जीव लोके जीवभूतः सनातनः।" जीव हा माझाच अंश असून माझ्या इतकाच सनातन म्हणजे अनादि, अनंत असा आहे. तेव्हा असं चिंतन आपण डोळे उघडून पाहू लागेपर्यंत पुन्हा पुन्हा करावं.

मी : महाराज अशा चिंतनानं काय होतं ?

महाराज : आपला व्यावहारिक पातळीवरचा मी हा त्याच्या जीवनातील व जगातील घडामोडींकडे तीन दृष्टींनी पहात असतो. मनासारखं, मनाविरूध्द व उदासीन. त्यामुळे पहिल्या दोन बाबतीत त्याच्या मनात या घडामोडीमुळे नेहमीच विकार उद्भवत असंतात. उदा. काम-क्रोधादि षड्विकार, भय-चिंता, आसक्ती-तिटकारा, वगैरे. पण वर सांगितल्याप्रमाणे काही काळ सतत चिंतन घडलं की या "मी" चा म्हणजेच आपला ईश्वरी संकल्पाशी सतत एक सुसंवाद घडत रहातो. त्यामुळे एखादी घटना वैयक्तिक पातळीवर प्रतिकूल असली तरी आपण ईश्वरी अंश आहोत आणि ही घटना पूर्वनियोजित ईश्वरी संकल्पानुसार घडली आहे हे समजल्यामुळे वैश्विक पातळीवर ती सुसंगत असावी हे आपल्या लक्षात येतं. त्यामुळे आपला समतोल ढळत नाही व संतुलन बिघडत नाही. उदा. मी रोगजंतूंच्या संसर्गाने आजारी पडलो की जरी मला त्रास होत असला तरी ती रोगजंतूना मेजवानीच असते व त्यांचा मृत्यु ओढवला की मी बरा होतो शिवाय आज ही घटना जरी मला जीवाच्या वैयक्तिक पातळीवर प्रतिकूल वाटत असली तरी या सृष्टीच्या जन्मापूर्वी, मी ज्याचा अंश आहे अशा, अव्यक्त, अनंत व सर्वशक्तिमान अशा परमेश्वराने ही घटना आज अशी घडावी असं त्यावेळीच योजून ठेवलं होतं. फक्त तेव्हा काय योजून ठेवलं होतं ते मला आजपर्यंत माहित नव्हतं. ते ज्ञान मला या वर्तमानाच्या क्षणी झालं. हे लक्षात आल्यावर आपण ईश्वराचे अंश असल्यामुळे त्या

घटनेविषयी आपल्याला दुःख होईनासं होतं. उदा. एकलव्याने गुरूवर्य द्रोणाचार्यांना दिलेला शब्द पाळताना त्याला सारी धनुर्विद्या गमवावी लागली. तरी त्याने आपला अंगठा कापून तो गुरूदक्षिणा म्हणून द्रोणाचार्यांच्या चरणावर अर्पण केला. त्याचं त्याला अजिबात दुःख झालं नाही किंवा राजा दशरथाने कैकयीला दिलेला शब्द युवराज रामचंद्राने आनंदाने पाळला व चौदा वर्षांचा वनवास पत्करला. तशी आपली क्षणोक्षणी घडणाऱ्या घटनांविषयी तटस्थपणाची, साक्षित्वाची व आत्मीयतेची सुसंवादी भावना निर्माण होऊ लागते. पूर्वीची राग-द्वेषयुक्त अशी भावना आता बदलून जाते.

मी : महाराज, इथपर्यंत समजलं. आता पुढे कशी साधना करायची ?

महाराज : आपण डोळे उघडल्यावर प्रथम छत व असल्यास छताला लावलेला, गरगर फिरणारा पंखा दिसतो. त्याचा गार वारा आपल्या अंगाला स्पर्श करतो, तेव्हा आपण असा विचार करावा की मला हा पंखा दिसत आहे. त्याचा आवाज ऐकू येत आहे व त्याचा गार वारा हा माझ्या अंगाला सुखद स्पर्श करीत आहे. म्हणजे त्याचं रूप, त्याची गती, त्याचा आवाज व त्याची वारा फेकण्याची क्षमता या गुणधर्मांचं मला ज्ञान होत आहे व त्यापासून मला सुख होत आहे. आता हा पंखा कोणी तयार केला? तर माणसानी. कशापासून ? धातू, रबर, प्लॅस्टिक वगैरे अनेकविध वस्तूंपासून. आता या वस्तू मूळात कोणी निर्माण केल्या ? तर भगवंतानंच त्या निर्माण केल्या. कशापासून ? तर स्वतःच त्यानं या निर्जीव वस्तूंची रूपं धारण केली. या वस्तू एकत्र आणून त्याला पंख्याचं रूप कोणी दिलं? माणसांनी आपल्याला असलेल्या ज्ञानाचा उपयोग करून या वस्तूंवर प्रक्रिया करून त्यांची योग्य रितीने जोडणी व जुळवणी करून त्यापासून त्यांनी पंखा तयार केला. कां? तर त्यापासून माणसांना निसर्गावर अवलंबून न रहाता इच्छा होईल तेव्हा वारा मिळावा म्हणून. आता या माणसांना निर्माण कोणी केलं ? भगवंतानं. कसं निर्माण केलं ? तर स्वतःच त्यानं त्या सर्वांची रूपं धारण केली. तेव्हा मला जाणवलेले, वर सांगितलेले गुणधर्म हे मुळात फक्त पंख्याचेच गुणधर्म नसून ते ईश्वराचेही गुणधर्म आहेत व या गुणधर्मांतून त्याचीच ईश्वरी शक्ती प्रगट होत असते. तसंच माझ्या ठिकाणी वस्तूंचे गुणधर्म समजून घेण्याची शक्ती आहे व पंख्याचे गुणधर्म समजावून घेण्यातून ती शक्ती प्रकट होत असते आणि मी व पंखा या दोन वेगळ्या गोष्टीतून जरी ती प्रकट होत असली व त्यामुळे ती बाह्यतः वेगळी वाटत असली तरी मुळात ती एकच आहे. शिवाय मी बटन दाबून सुरू

★✓ ब्रह्म म्हणजे काय?

केलेला पंखा मीच माझ्या इच्छेने बघत आहे असं जरी मला वाटलं तरी पूर्व नियोजित ईश्वरी संकल्पानुसार ही क्रिया घडत आहे. आपल्याला झेपत असेल आणि पचत असेल तर आणखीनही एक विचार करावा.

मी : (उत्सुकतेने) तो कोणता महाराज ?

महाराज : तो असा की सृष्टीच्या रचनेपूर्वी मीच अव्यक्त, अनंत व सर्वशक्तिमान अशा अवस्थेत असताना हे असं घडावं असं योजून ठेवलं होतं. त्या संकल्पानुसार आत्ता जीव-दशेतला "मी" हा पंखा पहात आहे व त्यापासून मला सुख मिळत आहे.

मी : महाराज, असा विचार करणं फारच कठीण आहे. सहज विचारतो की या अशा चिंतनाला काय आधार आहे ?

महाराज : आपल्याकडे जी चार महावाक्यं सांगितली आहेत. त्यातलं पहिलं वाक्य, "अहं ब्रम्हास्मि" हे आहे. या वाक्याचा जप करायचा नसतो तर त्याच्यावर चिंतन करायचं असतं. तेव्हा या वाक्यावर आधारलेलं हे चिंतन आहे.

मी : उरलेली तीन वाक्यं कोणती ?

महाराज : "तत्वमसि " "सर्व खल्विदं ब्रम्ह" "अयमात्मा ब्रम्ह" शिवाय "सत्यं, ज्ञानं अनंतं ब्रम्ह" आणि "प्रज्ञानं ब्रम्ह" अशी दोन उपमहावाक्यं आहेत.

★ ✓ मी : महाराज, ब्रम्ह म्हणजे काय ते मला समजेल अशा भाषेत सांगाल काय ?

महाराज : ब्रम्ह हा शब्द "बृह" या शब्दापासून झाला आहे. बृह म्हणजे व्यापणे म्हणून ब्रम्ह म्हणजे सर्वव्यापक अशी मूळ स्थिती म्हणजे जीवभाव व ईश्वरभाव यातील भिन्न गुणधर्मांचा त्याग केल्यावर जी मूळ स्थिती उरते तिचं नाव ब्रम्ह.

मी : म्हणजे काय ?

महाराज : सर्वनिर्माता, सर्वनियंता, सर्वज्ञानी व सर्वव्यापक हे सर्व ईश्वराचे गुणधर्म आहेत. तर अल्पनिर्माता, अपूर्णनियंता, अल्पज्ञानी, सांत व मर्यादित व्याप्ती हे जीवाचे गुणधर्म आहेत. दोघांच्याही या गुणांचा विवेकाने त्याग केल्यानंतर जे उरतं त्याला ब्राम्ही स्थिती असं म्हणतात. आणि ते जीवाचं खरं आणि मूळ रूप असतं.

मी : महाराज, या चिंतनाने काय होतं ?

महाराज : व्यवहारात जरी आपल्या मनाविरूध्द घडलं तरी त्याचं आता दुःख होत नाही. कारण आपणच त्या ईश्वरीय अवस्थेत तसं योजलं होतं, म्हणून आता तसं घडलं. त्याचं ज्ञान झाल्यामुळे जीवाच्या अज्ञान अवस्थेत एरवी होणारं मानसिक दुःख

आता होत नाही.

मी : महाराज, शक्ती एकच असताना ती वेगवेगळ्या माध्यमातून विरूध्द गुणधर्म कसे काय प्रगट करू शकते ?

महाराज : अरे, आपलं रोजचंच उदाहरण घेना. तू आता सुखवस्तू मध्यमवर्गीय आहेस ना ? मग तुझ्या घरी विजेवर चालणारी किती उपकरणं आहेत सांग बघू ?

मी : महाराज, खूपच आहेत ट्यूब-लाईटस्, उर्फ प्रकाशनलिका, बल्ब किंवा प्रकाश गोलक, पंखे(छतावरचे व टेबलावरचे), आणि स्वयंपाकघरातला हवा बाहेर फेकणारा पंखा, पाणी तापवणारा गीझर किंवा उष्णतावर्धक, तसंच खाद्य-पेयांच्या वस्तू थंड रहाव्यात म्हणून फ्रिज किंवा शीत-कपाट, तसंच गाणी ऐकण्यासाठी रेडिओ किंवा दूरश्रवण,टेप-रेकॉर्डर किंवा दुरध्वनीफित श्रवण, पहाण्यासाठी टि.व्ही. किंवा दूरदर्शन व व्ही.सी.आर.म्हणजे दृश्य-फीतदर्शक तसंच ऑफीसनं दिलाय म्हणून टेलीफोन किंवा दूर-ध्वनी यंत्र. झालंच तर साफसफाई करायला व्हॅक्यूम-क्लीनर किंवा निर्वात-झाडू,(केरसूणी) तसंच स्वयंपाकघरात एक मिक्सर किंवा चूर्णकारक इतकी विजेची उपकरणं आमच्या घरी आहेत.

महाराज : मग आता तूच पहा. यांची कामं किती भिन्न आहेत. अनेक ठिकाणी ती एकमेकांच्या विरूध्दही आहेत. उदा. एक माध्यम वस्तू गरम करण्यासाठी तर दुसरं त्या थंड करण्यासाठी. एक यंत्र हवा तुमच्या अंगावर फेकतं तर दुसरं यंत्र ती हवा खेचून खोलीबाहेर सोडतं. एक यंत्र दूरचा आवाज ऐकण्यासाठी तर दुसरं ध्वनीफितीवरचं गाणं ऐकण्यासाठी. आता ही सारी यंत्रं विजेवर चालणारी असल्यामुळे त्यातून विद्युत प्रवाह सोडला म्हणजेच यांना इलेक्ट्रॉन्स्चा पुरवठा झाला की ही यंत्र काम करू लागतात. म.रा.वि.मंडळाच्या अवकृपेमुळे वीज बंद झाली की त्यांचा सारा कारभार ठप्प होतो. म्हणजे एकाच विजेच्या उपयोगातून विरूध्द गुणधर्म देखील प्रकट केले जातात. तसंच ही ईश्वरी शक्ती ईश्वरानेच धारण केलेल्या विविध रूपांच्या वेगवेगळ्या गुणधर्मांच्या माध्यमातून प्रगट होत असते. त्यामुळे ती वेगवेगळी भासत असली तरी मुळात ती एकच ईश्वरी शक्ती असते.

आता ज्या इलेक्ट्रॉन्सच्या पुरवठ्यावर ही सारी यंत्र चालतात. त्या इलेक्ट्रॉन्सची या यंत्राच्या मूलकणांमध्ये म्हणजे अणूमध्ये किंवा ॲटम्स् मध्ये काही कमतरता असते का ? नाही. मग त्या इलेक्ट्रॉन्सचा विद्युत म्हणून का उपयोग होत नाही ? तर

ॲटम्स्मधले इलेक्ट्रॉन्स् ॲटम्स्मध्ये अडकलेले असतात. तिथून त्यांची सुटका होऊ शकत नाही. आणि विद्युतप्रवाहातील इलेक्ट्रॉन्स् हे मोकळे असल्यामुळे त्यामधील विद्युत शक्तीचा विविध कामं करण्यासाठी उपयोग होऊ शकतो. तसंच आपण सामान्य माणसं संसारात बध्द असतो. म्हणून आपला कल्याणकारक शक्तीच्या रूपात उपयोग होऊ शकत नाही. पण अहंकाराच्या कचाट्यातून सुटलेले व संसाराच्या आसक्तीतून मोकळे झालेले जे संत सत्पुरूष असतात. त्यांचा कल्याणकारक ईश्वरी-शक्ती दुसऱ्यांची प्रगती करण्यासाठी म्हणून उपयोग करून घेते.

मी : पण महाराज, दिवसभर मला हजारो वस्तू दिसणार व शेकडो माणसं दिसणार. मग प्रत्येक वेळी एवढा लांबलचक विचार करणं कसं काय शक्य आहे ?

महाराज : तू असं प्रत्यक्ष चिंतन करायला सुरूवात केलीस की तुझ्या लक्षात येईल की वर सांगितलेले विचार करायला प्रथम जरी वेळ लागला तरी थोड्याशा सवयीनं एवढा विचार करायला २/३ क्षण देखील पुरेसे होतात. मग पुढेपुढे ईश्वरी रूप+गुणधर्म+शक्ती+संकल्प=ईश्वर=अनंत,अव्यक्त सर्वशक्तिमान तत्व इतके शब्द सुध्दा पुरेसे होतात. आणखी पुढे तर श्रीराम, श्रीकृष्ण, श्रीहरी, या सारखा एखादा शब्द सुध्दा या विचारांचं प्रतिक म्हणून उपयोगी पडतो. हेच नामाचं साध्य आहे.

मी : तरीच काही काही संत-सत्पुरूष श्रीराम किंवा कृष्ण-कृष्ण, श्रीकृष्ण किंवा हरी हरी वा आई जगदंबे असा वारंवार मोठ्याने उच्चार करतात. त्याचं रहस्य सुध्दा बहुधा हेच असावं.

महाराज : नक्कीच. आपल्या मनाला एकच विचार पुन्हा पुन्हा करायला लावला की मग ती क्रिया अगदी जलद घडू लागते. शेवटी या लांबलचक विचार शृंखलेसाठी एकच शब्दसुध्दा उपयोगी पडू शकतो. म्हणून त्याला देवाचं नाव किंवा नाम असं म्हणतात. उदा. पाहणारा देव, दिसणारा देव, हे दोन्ही गुणधर्म देवाचे त्यातूनच त्याच्या शक्तीचं प्रकटीकरण आणि हे सर्व ईश्वरी संकल्पानुसार घडणं हा सर्व अर्थ एक हरी या शब्दाचा असतो. किंवा हरी=रूप+गुणधर्म+शक्ती+संकल्प. याच विचाराचं चिंतनाचं आवर्तन सतत करणं आणि हे आवर्तन सतत आपल्या वर्तनाला जोडलं जाणं याचं नाव हरी-पाठ असं माऊलीचं म्हणणं आहे. नुसतं डास मारत मारत, घड्याळाकडे बघत बघत, जांभया देत देत हरीपाठातले अभंग यांत्रिकपणे म्हणणे म्हणजे हरि-पाठ केला असा अर्थ होत नाही तर हा हरी आपल्या डोळ्यांत, कानांत सर्व इंद्रियांत,

मनात, समोरच्या वस्तूत, जनात येवून बसला पाहीजे. तसा ते जाणवला पाहिजे. याला हरी-पाठ म्हणतात. यासंबंधात माऊली म्हणते की ;

"तो दिठी जे पाहे ! ते आपणचि होऊनि जाये ! जे आईके ते आहे! तोचि जाहला ।।"

व एकनाथ महाराज असंच काही सांगतात "जव दृष्टी देखे दृश्याते ! तव देवचि दिसो तेथे !!"

मी : तरीसुध्दा महाराज, हे सतत जमणार नाहीच असं वाटतं.

महाराज : पण करून पाहिल्या शिवाय सतत जमेल की नाही हे तुला कसं कळणार? आणि सतत नाही जमलं तरी हरकत नाही. सुरूवातीला जमेल तितका वेळ हे चिंतन करावं. पण उरलेला वेळ फुकट गेला अशी खंत करू नये. कारण हे विस्मरणही ईश्वरी संकल्पानुसारच घडलेलं असतं. माऊलीनं तर सुरूवातीला यासाठी एक क्षणसुध्दा पुरे आहे असे म्हटलेलं आहे. "तरी गा ऐसे करी ! यया आठा प्रहरा माझारी ! मोटके निमिषभरी ! देतू जाय !"

मी : महाराज, निमिष म्हणजे काय ?

महाराज : डोळ्यांच्या पापण्यांची उघडझाप म्हणजे मिटुन ताबडतोब उघडण्यासाठी लागणारा वेळ. सतत टक लावून पहाणे याला अनिमिष नेत्रांनी दर्शन घेणे असं म्हणतात. डोळे उघडे असताना चित्त बहिर्मुख असतं. पण मिटले असताना निमिषभर का होईना ते अंतर्मुख होऊ शकतं. तेव्हा निमिषाने सुरूवात करून अभ्यासाने अखंड चिंतनाचा पल्ला गाठावा.

मी : महाराज, या चिंतनाने किंवा हरि-पाठाने आपल्यावर काय परिणाम होऊ शकेल ?

महाराज : जो काय परिणाम व्हायचा तो ईश्वरी संकल्पानुसार होईल. पण काय होऊ शकेल यांचा आपण सत्पुरूषांच्या जीवनावरून तर्क करू शकतो. हे चिंतन जसजसं वाढत जातं तसातसा आपला जीवनविषयक दृष्टीकोन बदलत जातो. तो क्षुद्रतेकडून विशालतेकडे झुकू लागतो. आपला सारा व्यवहार आपले व वस्तूंचे गुणधर्म लक्षात घेऊन घडतो. म्हणजेच आपल्याला ज्या वस्तूंचे गुणधर्म आवडतात त्या वस्तू , ती माणसं आपल्याला हवीहवीशी वाटतात. आणि ज्यांच्या गुणधर्मांचा आपल्याला त्रास होतो त्या नकोशा वाटतात. मग हव्याहव्याश्या वाटणाऱ्या वस्तू व माणसं यांचा सहवास मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू होतो. एकूण काय जीवनात आपली

भूमिका मिळवणाऱ्याची असते. त्यामुळे आपण शेवटी जीवनात काय मिळवलं असा प्रश्न आपल्या पुढे उभा रहातो. पण कोणीतरी देणारा असल्याशिवाय मिळवणाऱ्याला काय आणि कसं मिळणार ? तेव्हा या चिंतनाचा परिणाम असा होतो की हळूहळू मिळवणाऱ्याच्या भूमिकेतून आपण देणाऱ्याच्या भूमिकेत प्रवेश करू लागतो.

मी : महाराज, हा बदल एक रात्रीत होतो काय ?

महाराज : नाही. जस जसं हे चिंतन मनात मुरू लागतं तसतसा हा बदल हळूहळू घडू लागतो.

मी : तो कसा काय घडतो ?

महाराज : या चिंतनापूर्वी आपण स्वतः आणि समोरच्या वस्तूंचे गुणधर्म यांचं आपल्याला होणारं ज्ञान हे अंतिम ज्ञान आहे आणि त्याच्या पलीकडे काही नाही असं आपल्याला वाटत होतं. त्यामुळे आपण स्वतःला अवास्तव व समोरच्या वस्तूला जरूरीपेक्षा जास्त महत्व देत होतो. आणि हे अवास्तव फाजिल महत्वच आपल्या सुख-दुःखाला आणि राग-द्वेषाला म्हणजे आसक्ति व तिटकाऱ्याला कारणीभूत होत होतं. शिवाय आपण व ती वस्तू यातील द्वैतभाव कायम रहात असे. आता या चिंतनानं काय होतं पहा. मी ईश्वराचं रूप आहे आणि ती आवडती वस्तू किंवा माणूसही त्याच ईश्वराचं दुसरं रूप आहे असा विचार मनात आला की एकाच ईश्वरानं ही दोन्ही रूपं धारण केली आहेत म्हणून दोघांचेही महत्व सारखं होतं म्हणजे दोघांनाही समान ईश्वरी महत्व प्राप्त होतं म्हणजेच दर्शनाच्या तराजूच्या द्रष्टा व दृश्य या दोन्ही पारड्यात संतुलन प्राप्त होतं. जसं एकाच नटानं अनेक भूमिका केल्या तरी त्याला स्वतःला सर्व भूमिका सारख्याच महत्वाच्या वाटतात. शिवाय एकच ईश्वरी शक्ती दोन माध्यमातून प्रगट होत असली तरी ती मुळात एकच आहे हे समजल्यामुळे मी स्वतःला इतके दिवस शरीर, मन, बुध्दी यांचा समुदाय म्हणजे जीव असं समजत होतो. तो मी आता याच्या जोडीला या माध्यामातून प्रगट होणाऱ्या ईश्वरी शक्तीचा अंश असं स्वतःला समजू लागतो. खरा मी शक्तीरूप आहे व तीच शक्ती सर्वत्र पसरली आहे. हे समजलं की मी आणि समोरची वस्तू यातील रूपांच्या वेगळेपणाच्या जोडीला दोघांच्यातील शक्तीचा ऐक्यभाव जाणवू लागतो व समोरच्या वस्तू विषयी, आकर्षणांच्या जोडीला मला आता आत्मीयताही वाटू लागते व या आत्मीयतेतून प्रेम निर्माण होतं म्हणजे आपण स्वतःवर जसं प्रेम करतो तसं प्रेम समोरच्या माणसावरही करू लागतो.

मी : महाराज, आणखी काय होतं ?

महाराज : मला वाटणारं त्या वस्तूचं किंवा माणसाचं आकर्षण हे ईश्वरी नियमानुसारच असल्यामुळे तसंच या आकर्षणातून माझ्या हातून घडलेला व्यवहार हा ईश्वरी संकल्पानुसार घडलेला असल्यामुळे एरव्ही या कृतीची मी तरफदारी केली असती ती आता थांबते. त्यामुळे त्यातून निर्माण होणारे पुढील विकार आता निर्माण होत नाहीत व मन शांत राहू लागतं व असं मन आता ईश्वराचं प्रगाढ किंवा सखोल चिंतन करण्याच्या अवस्थेत येतं. ईश्वर हा अनादि, अनंत, अविनाशी, अव्यक्त व सर्वशक्तिमान आहे व आपण त्याचे अंश आहोत याची अनुभूति अशाच मनाला येऊ शकते व मन त्या अनुभूतीत मुरु शकतं. त्यामुळे आता वस्तू दिसली तर मन, ज्या ईश्वराने त्या वस्तूचं रूप धारण केलं आहे अशा ईश्वराचं चिंतन करू लागतं. जसं विवाहित स्त्रीच्या कपड्यावरून वा दागिन्यांवरून आपण तिच्या पतीच्या सांपत्तिक स्थितीचा अंदाज बांधतो म्हणजे आपल्याला समोर ती स्त्री दिसते पण चिंतन मात्र पतीच्या सांपत्तिक स्थितीचं करतो तसं आता ईश्वर हा सर्वत्र एकच असल्यामुळे आपल्या मनातही ऐक्यभाव प्रस्थापित होऊ लागतो व या ऐक्यभावामुळे मला विश्वातील वस्तूविषयी प्रेम व आत्मीयता वाटू लागते.

मी : महाराज हे प्रेम का वाटू लागतं ?

महाराज : कारण, कोणत्याही ईश्वरी अनुभूतीची परिणति ऐक्यभावामुळे प्रेमात होते. कारण ईश्वराचा एक गुणधर्म परमप्रेममयता असा आहे. म्हणून ईश्वराच्या चिंतनातून प्रेमाची निर्मिती होते व ही प्रेमाची अवस्था आपल्याला मिळवणाऱ्याच्या भूमिकेकडून देणाऱ्याच्या मनस्थितीत घेऊन जाते. हे ईश्वरीय प्रेम निष्काम, निरपेक्ष व निरलस असं असतं.

मी : आपल्या व्यावहारिक प्रेमात आणि या प्रेमात काही फरक असतो का?

महाराज : आपलं व्यावहारिक प्रेम देव-घेवीतून निर्माण होतं व ते देवाण-घेवाणीच्या आधारावर अवलंबून असत. " जग हे सुखाचे । दिल्या-घेतल्याचे । बा अंतकाळाचे । कोणी नाही ।" तर ईश्वरी प्रेम हे "घेव" विसरून जातं. फक्त "देव" किंवा "देव-आण" (देवाण) इतकंच जाणतं. कारण देवाच्या प्रेमातूनच या प्रेमाचा उगम होत असतो. म्हणून या प्रेमामुळे साधक देणाराच्या अवस्थेत येतो. म्हणजे पूर्वी एखादा माणूस भेटला तर त्याच्यापासून मला काय मिळेल अशी आपल्याला चिंता असायची तर आता

समोर दिसलेल्या माणसाच्या ठिकाणी जर काही उणीव असली आणि आपण ती पुरी करू शकत असलो तर त्यातच आपल्याला धन्यता वाटू लागते व त्याला आपण किती देऊ आणि किती नको असं आपल्याला होऊन जातं. कारण, आता आपलं जीवन दैवी बनलेलं असतं. त्यामुळे जसं पाणी म्हणजे जीवन समोरचा खड्डा भरूनच मग पुढे जातं तसं आपलं जीवन बनतं. अशा तऱ्हेने कालांतराने आपलं जीवन अंतर्बाह्य बदलून जातं व आपल्यातील हा बदल ईश्वरी संकल्पानुसारच घडलेला आहे याची आपल्याला जाणीव असल्यामुळे त्याचं कर्तृत्वही कधीच आपण आपल्याकडे घेत नाही. आपली स्थिती आता

" साधुबोध जाला । नुरोनिया ठेला । ठायीच मुराला । अनुभवे ।। "

अशी झालेली असते.

आता आपल्याला सर्वत्र ईश्वराचं रूप दिसत असल्यामुळे आपल्या हातून कोणाचंही अकल्याण होऊ शकत नाही. उलट जमेल तितकं दुसऱ्यांचं कल्याणच होतं. " जगाच्या कल्याणा । संतांच्या विभूती । देह कष्टविती । उपकारे ।। " किंवा " तुका म्हणे आता । उरलो उपकारापुरता ।।" ही आपली अवस्था ईश्वरी प्रेमातून येते.

मी : परम प्रेममयता म्हणजे नक्की काय?

महाराज : परम प्रेममयता म्हणजे ज्या प्रेमात तर तम भाव नसतो व जे प्रेम पूर्व परिचयावर किंवा देवाण-घेवाणीवर आधारलेलं नसतं अशी प्रेमाची अत्युच्च अवस्था. माणसानं एखादी लहानशी गोष्ट जरी निर्माण केली तरी त्याला आपल्या निर्मितीबद्दल किती कौतुक वाटतं. मग ईश्वराला त्याच्या निर्मितीविषयी म्हणजे या विश्वाविषयी किती प्रेम वाटत असेल याची कल्पना करून पहा. आपल्या रोजच्या व्यवहारातलंच उदाहरण घे ना. आपला एखाद्याशी जुजबी परिचय असला तर आपण त्याला लांबूनच नमस्कार करतो. आणखी परिचय वाढला की हात हातात घेऊन प्रेमाने हालवतो, परिचय आणखी वाढला की, खांद्यावर हात ठेवतो किंवा प्रेमानं पाठीवरून हात फिरवतो. आणखी दोस्ती वाढली तर मिठी सुद्धा मारतो.

" मिठीत तुझिया या विश्वाचे रहस्य मज उलगडले ।।"

प्रेमाची आणखी वरची अवस्था म्हणजे आईचं प्रेम. आई आपल्या मुलाला उदरात म्हणजे तिच्या शरीरात नऊ महिने सामावून घेते. ते मूल तिच्या शरीराचाच एक भाग बनलेलं असतं. म्हणून ती जन्मभर त्याच्यावर प्रेम करते. हे प्रेम सर्वात उच्च समजलं

जातं. पण आता तूच कल्पना कर की शरीराचा काही भाग काही काळ व्यापलेल्या मुलाविषयी जर आईला व आईविषयी मुलाला इतकं प्रेम वाटतं तर ज्या ईश्वरानं हे सर्वच विश्व सतत व्यापलेलं आहे त्याला या विश्वाविषयी किती प्रेम वाटत असेल आणि ज्या ईश्वराने मला अंतर्बाह्य व्यापलेलं आहे त्याच्याविषयी मला किती प्रेम वाटायला हवं? हेच प्रेम मी स्वतःवर करत असतो. पण ते ईश्वराच्या प्रेमाचा अंश म्हणून करत असतो हे मला माहित नसतं. या साधनेनं मी शक्तीरुपाने सर्वत्रच आहे हे समजल्यावर माझं स्वतःवरच्या प्रेमाचं रुपांतर विश्वावरील प्रेमात होतं. मग आपलीही अवस्था परमप्रेममय अशी होते. मग हे प्रेम आपल्या डोळ्यातून झिरपत असतं तर आपल्या वर्तनातून पाझरत असतं. आपल्या स्पर्शातून हा प्रेमाचा परीसस्पर्श दुसऱ्याला जाणवू लागतो. या प्रेमाच्या धबधब्याचा वर्षाव समोरच्या माणसावर होऊ लागतो व तो ह्या प्रेमाच्या कारंजात न्हाऊन निघतो. "ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभाविण प्रीती", या प्रेमात घेणाराला लाभ व आनंद मिळतो, तर देणाराला तृप्ती, समाधान व पुण्य मिळतं.

***

# प्रकरण ७वे

## प्रत्यक्ष अनुभूती

मी : महाराज, या साधनांतून काही प्रत्यक्ष अनुभूती येऊ शकते काय?

महाराज : हो, येऊ शकते ना. पण त्यासाठी चित्त अंतर्मुख होण्याची गरज आहे.

मी : महाराज, अंतर्मुख म्हणजे काय? मला फक्त अतंर्मुख-आतल्या तोंडाच गळू इतकंच माहित आहे.

महाराज : अरे, आतल्या तोंडाचं गळू याचा शरिराशी संबंध आहे. तर अंतर्मुखतेचा चित्ताशी संबंध आहे. अंतर्मुख चित्ताच्या सात अवस्था असतात.

(१) डोळे मिटले असता बाह्य जगाचं भान असणं.

(२) जमिनीचा व त्यावरील आसनाचा, भिंतीचा किंवा शरिराच्या काही भागाचा स्पर्श जाणवणं.

(३) चित्तात विचार निर्माण होणं.

(४) मनःपटलावर दर्शन होणं, प्रसंग दिसणं, रंग उमटणं.

(५) डोळ्यासमोर नुसते प्रकाशाचे पुंजके, ढग दिसणं किंवा तारे चमचमणं.

(६) श्वासोच्छवासाची जाणीव होणं.

(७) मी आहे, मी जिवंत आहे व जागा आहे या स्थितीची जाणीव असणं.

चित्ताच्या मुळात दोन अवस्था असतात. एक बहिर्मुख आणि दुसरी अंतर्मुख. जाग आल्यावर बाह्य विषयाचं ज्ञान मिळवून त्यावर विचार करून प्रतिक्रिया करण्यासाठी उत्सुक असलेलं जे मन असतं त्याला बहिर्मुख चित्त म्हणतात आणि एखाद्या विषयातील ही उत्सुकता मावळली की ज्ञान, विचार व कृती करणारा बुद्धीचा हा भाग शांत होऊ लागतो. अशा शांत झालेल्या चित्ताला त्या विषयासंबंधी अनासक्त किंवा अंतर्मुख झालेलं चित्त असं म्हणतात. उदा. एखादा रहस्यमय चित्रपट पहात असताना त्यातील रहस्य समजेपर्यंत खूपच उत्सुकता वाटते. पण ते समजलं की मन शांत होत व तो चित्रपट पुन्हा पुन्हा पाहण्यास आपण तयार होत नाही व पुन्हा पाहिला तरी त्यासंबंधात आपलं मन अंतर्मुख होऊ शकतं.

मी : याचा अर्थ चित्त कायमचं अंतर्मुख असत नाही काय?

महाराज : नाही, तशी गरजही नाही. ज्या बाह्य विषयात उत्सुकता असेल त्यासंबंधी बहिर्मुख आणि उत्सुकता नसलेल्या विषयासंबंधात चित्त अंतर्मुख होऊ शकतं.

मी : बरं, असं चित्त अंतर्मुख झाल्यावर पुढे काय होतं ?

महाराज : यापुढील साधना साधकाला एकांतात करावी लागते. कारण ही अनुभूती प्रथम एकांतात येते आणि तिथे ती चांगली मुरली की मग तिचा प्रत्यय व्यवहारातही येवू लागतो. म्हणून ही साधना प्रथम पहाटे करून पहावी.

पहाटेच्या शांत समयी सुखासन घालून बसावं. त्यामुळे शरीराला कोठेही ताण पडत नाही. मन प्रसन्न असावं. डोळे मिटून स्वस्थ बसावं, स्वस्थ बसल्यामुळे कर्मेंद्रियांची कामे थांबतात. डोळे मिटल्यामुळे पहाण्याचं, सभोवती शांतता असल्यामुळे ऐकण्याचं, तसच वास घेण्याचं, खाण्याचं आणि स्पर्श करण्याचं अशी पाचही ज्ञानेंद्रियांची कामं थांबली आहेत. नाही म्हणायला आसमंतातून सुगंध दरवळत असेल तर तो वास आपल्याला येईल. त्यामुळे आपल्या भूतकाळातील स्मृति जाग्या होतील. तर त्यांच्या मागे आपल्या मनाला धावू देऊ नये. पुन्हा त्याला मुळ जागी आणून बसवावं. तसंच काही काळ आपल्याला होत असलेला जमिनीचा स्पर्श जाणवेल पण त्यातून आपलं लक्ष काढून घ्यावं. म्हणजे तो आपल्याला जाणवेनासा होईल.

मी : महाराज, हे लक्ष कसं काढून घ्यायचं ?

महाराज : डोळे मिटल्यावर आपल्याला जे समोर दिसतं त्याच्यावर लक्ष केंद्रीत केलं की इतर संवेदना किंवा विचार यावरील लक्ष काढून घेता येतं. असा अभ्यास करीत असतांना तीन अडथळे निर्माण होतात. त्यांना विक्षेप, कषाय आणि लय अशी आपल्या शास्त्रात नावं आहेत. विक्षेप म्हणजे विचार, आपण स्वस्थ बसलो की आपल्या मनात भूतकाळासंबंधी व भविष्यकाळासंबंधी अनेक विचार पुन्हा पुन्हा येत रहातात. हे विचार बहुतेक ज्या गोष्टींचं आपल्याला महत्व वाटतं त्यांच्यासंबंधी असतात आणि तेसुद्धा पूर्वी जे घडलं ते तसं घडलं नसतं तर बरं झालं असतं आणि आपल्याला हवं असेल ते घडलं तर फारच बरं होईल अशा तऱ्हेचे असतात.

मी : महाराज, हे विचार यायचे बंद कसे होतील ?

महाराज : पहिली गोष्ट म्हणजे आपण जे महत्व आपल्याला आवडणाऱ्या गोष्टींना देतो ते कमी करायचं.

मी : ते कसं ?

महाराज : आपल्याला आवडणाऱ्या गोष्टींचे गुणधर्म हे त्यांच रूप ज्यानं धारण केलं त्या ईश्वराचे गुणधर्म आहेत व तो ईश्वर सर्वत्रच आहे हे लक्षात आलं की त्या गोष्टींचं महत्व कमी होतं व ईश्वराचं महत्व वाढतं. तसंच आपल्याला भूतकाळातील घडलेल्या घटना, या ईश्वरी संकल्पामुळे तशाच घडणार होत्या त्यामुळे त्याच्यावर विचार करून काहीच फायदा नाही. शिवाय भविष्यातील ईश्वरी संकल्प हा आपल्याला अज्ञात असल्यामुळे त्याच्यावरही काही विचार करून काही उपयोग नाही. असा विचार करून हे विचार थांबवावेत. तसंच अर्धवट राहिलेल्या कामांवरही विचार मनात येतात. म्हणून आपण करायची कामं ही ईश्वराची कामं आहेत असं समजून लवकरात लवकर पूर्ण करून टाकावीत म्हणजे त्यासंबंधीचे विचार मनात येत नाहीत. अशा रितीने अभ्यास केल्यास फक्त नियोजनात्मक व योग्य असेच विचार मनात येतात व असे विचार फारच थोडे असतात. त्यामुळे बहुतेक वेळ आपलं मन निर्विचार राहू शकतं. अर्थात याला खूप वेळ लागतो.

आता कषाय हा दुसरा अडथळा. आपण डोळे मिटून बसलो असतांना थोडेसे अंतर्मुख झालो की, अचानक चित्रविचित्र अशी स्वप्न पडल्यासारखी दृश्य दिसू लागतात. एखादेवेळी आवाज वगैरे ऐकू येवू लागतात, नाहीतर वेगवेगळे रंग दिसू लागतात. काही काही वेळा चांगली चांगली दर्शनंही होत असतात. त्यामुळे काही वेळा भिती वाटते तर दर्शन झाल्यामुळे आपल्याला साक्षात्कार वगैरे झाला असं आपल्याला वाटतं. मग आपण स्वतःलाच गुरु समजू लागतो व शिष्य गोळा करण्याच्या मागे लागतो. पण हा आपला गोड गैरसमज असतो. ही अवस्था प्रसंगी कितीही चांगली वाटली तरी ती ओलांडून पुढे जावं लागतं.

मी : पण ही अवस्था ओलांडून पुढे जायचं कसं?

महाराज : चित्त आणखी अंतर्मुख केलं की ही अवस्था ओलांडता येते. इथे तिसरा अडथळा पुढे येतो. याचं नाव लय. लय म्हणजे झोप. पुढे आपल्याला चक्क झोप येवू लागते. यावर मात करायची म्हणजे आपण डोळे मिटून जागं रहायचं. फक्त चित्त पहिले दोन्ही अडथळे निर्माण होणार नाहीत, इतकं अंतर्मुख ठेवायचं. यानंतर आपण डोळे मिटले असता चित्त निर्विचार स्थितीत रहातं व काही दिसणं किंवा ऐकू येणं बंद होतं. आता आपलं लक्ष मंदपणे चाललेल्या श्वासोच्छवासाकडे लागतं. इथून थोडं अंतर्मुख झाल्यावर श्वासोच्छवास ऐकू येणं बंद होतं. पण डोळ्यांसमोर पापण्यांच्या

आतल्या बाजूला भुरकट, मातकट, पिवळट रंगाचा प्रकाश दिसू लागतो व आपण त्या प्रकाशाहून वेगळे आहोत अशी वेगळेपणाची ज्ञानवृत्ती उठत रहाते. अर्थात, हा ही कषायाचा शेवटचा भाग असतो. इथूनही आपलं लक्ष अंतर्मुख केल्यास ते अशा एका बिंदूपाशी येऊन थांबतं की इथे फक्त एक मुलभूत सूक्ष्म अशी जाणीव स्फुरत रहाते व ही जाणीव ज्या पोकळीत स्फुरत रहाते तिला चिदाकाश असे म्हणतात. व या बिंदूला पराबिंदू असं नांव आहे. कारण चित्त या बिंदूच्या पलिकडे अंतर्मुख होवू शकत नाही. जसा एखाद्या गंगेसारख्या महानदीचा उगम टपटप असा आवाज करीत पडत रहाणाऱ्या छोट्याशा झऱ्याच्या जलबिंदूतून झालेला असतो. तसंच आपल्याला जिवंत ठेवणाऱ्या व आपल्याकडून ईश्वरी संकल्पानुसार कार्य करून घेणाऱ्या चित्‌शक्तीचा उगम या पराबिंदूतील शुद्ध जाणिवेत असतो. या जाणिवेचे वर्णन मी आहे, मी जिवंत आहे व मी जागा आहे या तीन वाक्यात करता येईल.

मी : हे सर्व समजायला फारच कठीण आहे हो, महाराज.

महाराज : असं तुला वाटणं साहजिकच आहे. कारण सामान्य माणसानं या चित्ताच्या आतल्या आतल्या अवस्था कधीच अनुभवलेल्या नसतात. त्यामुळे नुसत्या श्रवणाने त्याला काहीच बोध होत नाही. म्हणून हे ऐकतांनासुद्धा एखाद्या लहान मुलानं उच्च गणिताच्या कूट प्रश्नावरची चर्चा ऐकल्यानंतर त्याची जशी स्थिती होते तशी तुझी झालेली असेल याची मला कल्पना आहे. पण तूच प्रश्न विचारलास म्हणून हे सर्व सांगणं मला भाग पडलं. पण आता थोडी कळ सोस. आपण पराबिंदूपर्यंत आलेल्या शुद्ध जाणिवेपर्यंत आलेले आहोत ही शुद्ध जाणीव पराबिंदूच्या पलिकडे जावू शकत नाही. जसं गाडी ही व्ही.टी. च्या पलिकडे जात नाही, मग आपण उतरून बस, टॅक्सी वगैरे पकडून भारताच्या प्रवेशद्वारापर्यंत (गेट वे ऑफ इंडिया) जातो. व अनंत अशा सागराचं दर्शन घेण्याचा आनंद अनुभवतो. तसं ही शुद्ध जाणीव पराबिंदूच्या मागे जावू शकत नसली तरी पराबिंदूच्या वरच्या दिशेने सरकू लागते व तिथेही अभ्यासाने एका बिंदूवर स्थिर होते. या बिंदूला ब्रह्मरंध्र असं म्हणतात. कारण या बिंदूतून आपल्या जाणिवेला ब्रह्माशी किंवा ईश्वराशी एकरूप होता येतं किंवा स्वरुपामध्ये विलीन होता येत. म्हणून याला ब्रह्मरंध्र असं नांव आहे. अनेक योगी शेवटच्या क्षणी या ब्रह्मरंध्रातून आपला प्राण सोडतात व ब्रह्माशी एकरूप होऊन जातात. इथे डोळ्यांची बुबुळं भुवयांच्या मध्यबिंदूवर स्थिर झालेली असतात. या बिंदूला आज्ञाचक्र असं म्हणतात.

पराबिंदूपर्यंत आपली जाणीव फक्त चिदाकाश व्यापू शकते. म्हणून जीवाला या शरिरात तो आहे असा अनुभव येत असतो. परंतू ब्रह्मरंध्राचं वैशिष्ट्य असं आहे की या बिंदूपाशी आल्यावर ही शुद्ध जाणीव इथून चिदाकाशाबाहेर सुद्धा विश्वात पसरू शकते. म्हणजेच चिदाकाशातून निघून ती बाहेरील महदाकाश व्यापू शकते. याचा परिणाम असा होतो की विश्वातील जो जो भाग (त्यातील वस्तूंसहीत) ही जाणीव व्यापू लागते तो तो सर्व भाग त्यातील वस्तूंसहित शक्तीरुपाने आपणच आहोत असा अलौकिक अनुभव साधकाला येवू लागतो. हा अनुभव माऊलीने " किंबहुना चराचर । आपणचि जाहला" या शब्दांतून सांगितला आहे. पण अशा तऱ्हेने महदाकाश व्यापत असतांना ही जाणीव क्षीण, दुर्बल व विरल होत जाते व जसा एखादा फुगा मोठा होत होत फुटून जावा तशी ही जाणीव विरल होत होत विलय पावते. यानंतर ब्रह्मरंध्रातून नवीन जाणीव निर्माण होते. ती पुन्हा पसरून विश्वाचा काही भाग व्यापते व शेवटी विलय पावते. पाण्यात उत्पन्न झालेल्या लाटा एकामागून एक निर्माण होऊन त्या काठावर येऊन आदळतात व फुटतात. तसं या शुद्ध जाणीवेची निर्मिती, व्याप्ती, आणि विलय अशी सतत आवर्तनं होवू लागतात.

ही शुद्ध जाणीव पसरून विलय पावल्यानंतर पुन्हा ब्रह्मरंध्रातून जाणीवेचं नवीन स्फुरण व्हायच्या अगोदरच्या म्हणजे मधल्या कालावधीत या शुद्ध जाणीवेचाही लय झालेला असल्यामुळे या क्षणभराच्या कालावधीमध्ये वृत्तीचा लय झालेला ज्या ईश्वराला साक्षित्वाने समजतो तो ईश्वर किंवा ब्रह्म किंवा भगवंत या सूक्ष्म कालावधीमध्ये अनंत, अव्यक्त व अस्तित्वरुपाने असतोच असतो. या क्षणभरात ज्ञानवृत्तीरहित किंवा जाणीवरहित झालेलं साधकाचं चित्त या ईश्वराशी किंवा ब्राह्मी स्थितीशी एकरूप होवू शकतं. ही स्थिती अनंत व अव्यक्त अशी असते. ह्रा काल एका निमिषापासून पुढे कितीही असू शकतो. फक्त हा काल किती होता? हे साधकाला या स्थितीत समजत नाही. कारण जिच्या आधारावर बुद्धि मोजमाप करू शकते ती जाणीवच शांत झालेली असते, जसं आपण झोपल्यावर कितीवेळ आपण झोपेत आहोत हे आपल्याला कळत नाही तसंच इथे होतं. आपल्या योगशास्त्रात याला असंप्रज्ञात समाधि असं नांव आहे.

मी : महाराज, हा भगवंताचा अनुभव वृत्तीशिवाय येण्यासाठी कितीवेळ लागतो?

महाराज : ते काही निश्चितपणांने सांगता येणार नाही. ते साधकाच्या पूर्वजन्मीच्या अपुऱ्या वासना व आत्तापर्यंत केलेलं पाप-पुण्य याचा निचरा होण्यासाठी किती काळ

लागेल यावर अवलंबून आहे. तसंच साधनेच्या काळात नवीन वासना निर्माण होत नाहीत ना याकडे साधकाला डोळ्यात तेल घालून लक्ष द्यावं लागतं. नाहीतर नवीन निर्माण झालेल्या वासनेची वासलात लावण्यात आणखीन काळ जातो. मात्र एवढं निश्चित सांगता येईल की साधकाला जितकी तीव्र तळमळ असेल व जितका जास्त वेळ त्याला साधना करता येईल तितक्या लौकर त्याला ही अनुभूती येवू शकेल.

मी : महाराज, हा दिव्य अनुभव साधनेत कसा येतो हे तुम्ही सांगितलंत पण डोळे उघडे असतांना सुद्धा हा अनुभव येवू शकतो का?

महाराज : हो. येवू शकतो की? ही एकांतातली डोळे मिटून जाणीवेशिवाय अनुभवलेली स्थिती किंवा चित्ताची ईश्वराशी वृत्तीशिवाय झालेली एकरुपता ही अभ्यासानं आपल्या अंगी मुरली की मग हा अनुभव आपल्याला डोळे उघडे असतांनासुद्धा येवू शकतो.

मी : महाराज, तो अनुभव कसा येतो ?

महाराज : त्यासाठी प्रथम नेहमीची स्थिती काय असते ते पाहू या. एरवी आपले डोळे उघडे असले की आपल्याला दिसत असलेल्या दृश्यातल्या कोठल्यातरी एका वस्तूवर ते केंद्रित होतात. व त्या वस्तूचं आपल्याला ज्ञान होवू लागतं व दृश्यातल्या इतर वस्तू पार्श्वभूमीत गेल्यामुळे धूसर दिसू लागतात. ही वस्तू आपल्याला सुख देणारी असली की तिथे केंद्रित झालेलं आपलं चित्त तिथेच एकाग्र होतं व डोळे तिथेच खिळून राहतात. या वस्तूचा आपला संबंध असेतोपर्यंत आपल्याला बहिर्मुख चित्ताच्या अवस्थेत सुख होत रहातं. हीच कृती पुन्हा पुन्हा घडत रहाते. हे सुख आपल्या स्मृतीत जातं व फावल्यावेळांत आपल्याला हे सुख स्मृतीतून पुन्हा उपभोगता येतं.

आता आपल्याला आलेली जाणीवेशिवायची ईश्वरानुभूती आपले अंगात मुरली की मग डोळे उघडल्यावर जे दृश्य आपल्याला दिसतं त्यात व्यवहाराला त्याक्षणी उपयोगी पडणारी अशी वस्तू असेल तरच आपलं लक्ष डोळ्यातून त्या वस्तूवर केंद्रित होतं. व आपला त्या वस्तूशी ईश्वरी संकल्पानुसार व्यवहार घडतो. पण तशी वस्तू नसेल तर मात्र आपल्याला ते सबंध दृश्य ईश्वराचं रूप म्हणून दिसू लागतं व आता कोठेही दृष्टि केंद्रित झालेली नसल्यामुळे ते सबंध दृश्य धूसर व अस्पष्ट दिसू लागतं. व त्यावर कोणतीच प्रतिक्रिया आपल्या चित्तात उमटत नाही. मग आपलं चित्त ताबडतोब सवयीनं अंतर्मुख होवू लागतं. ते जर ब्रह्मरंध्रापर्यंत अंतर्मुख होवू शकलं तर एकांतात्तला अनुभव आपल्याला डोळे उघडे असतांनाही येवू लागतो व आपल्यासकट हे विश्व

भगवंतमय असल्याची "अंतश्चक्षुर्वै सत्यं" अशी प्रचीती आपल्याला उघड्या डोळ्यांनीसुद्ध येवू शकते व तिचा अभ्यास आपल्याला करता येतो. या अवस्थेतून आपण बाहेर आलो की पुन्हा समोरच्या दृश्यातील एखादी वस्तू आपल्याला उपयोगाची असल्या तिच्यावर आपलं लक्ष केंद्रित होतं नाहीतर ते पुन्हा अंतर्मुख होऊन ईश्वरानुभूती घेउ लागतं. अस हे वृत्तीचं व अनुभूतीचं रहाटगाडगं आपल्या उर्वरित जीवनात चालू रहात व हे सर्व पूर्वनियोजित ईश्वरी संकल्पानुसार घडत असतं याची जाणीव असल्यामुळे असा साधक आता कल्याणकारक अशा ईश्वरी शक्तीच्या हातचं बाहुलं बनून जातो.

मी : (आत्यंतिक आश्चर्याने) तुम्ही सांगितलेल्या डोक्यांतल्या या वृत्तीच्या हालचाल माझ्यातरी सध्या डोक्यावरूनच जात आहेत. पण महाराज आपल्या संतांना असे अनुभव आलेले आहेत का?

महाराज : अरे, असे अनुभव जर संतांनी लिहून ठेवलेले असले तरच ते आपल्याला समजणार. खरं तर या स्थितीचं वर्णन कोणत्याही शब्दात करता येत नाही. पण आपल्या तुकाराम महाराजांनी जे अभंग लिहून ठेवले आहेत त्यात त्यांनी त्यांच्या साधनेच्या प्रगतीचा आलेखच काढला आहे. त्यात या अवस्थेच्या अलीकडचं म्हणजे शुद्ध जाणीवेने महदाकाश व्यापण्याचं वर्णन केलं आहे.

" अणोरणीया थोकडा । तुका आकाशाएवढा ।।" हा सबंधच अभंग या स्थितीचं वर्णन करणारा आहे. इथे "तुका" या शब्दाचा अर्थ पराबिंदूपर्यंत पोहोचलेली तुकाराम महाराजांची विशुद्ध जाणीव. अणुरेणू म्हणजे सुक्ष्म असं ब्रह्मरंध्र आणि आकाश म्हणजे चिदाकाश व महदाकाश असा आहे. या विश्वातल्या अणूपासून आकाशापर्यंत जी ईश्वरी-शक्ती विश्व व्यापून राहिली आहे त्या शक्तीशी तुकाराम महाराज पूर्णपणे एकरूप झालेले आहेत असाही या अभंगाचा अर्थ आहे. असे इतर संतांचेही अभंग सापडू शकतील.

मी : महाराज, एक सलगीचा पण बालिश प्रश्न विचारू का ?

महाराज : (हसून) अरे, विचार ना, कितीही बालिश प्रश्न असला तरी विचार. नाहीतरी तू मला माझ्या मुलासारखा म्हणजे बालकासारखाच आहेस. बालकालाच बालिश प्रश्न विचारण्याचा अधिकार असतो. विचार, काहीही विचार.

मी : महाराज, तुम्हाला हा ईश्वराशी एकरूप झाल्याचा किंवा ईश्वरासंबंधीचा काहीही अनुभव आलेला आहे का ?

ाज : पण हे कळून तुला त्याचा काय उपयोग आहे ?

इतर संत-सत्पुरुष हे सर्व सध्या हयात नाहीत. त्यामुळे त्यांना आम्ही भेटू नाही. पण तुम्ही जिवंत असल्यामुळे तुम्हाला असा अनुभव आला आहे हे ल्यावर असा अनुभव आपल्या ओळखीतल्या माणसालाही येऊ शकतो हे समजून माझ्या साधनेवर जोर मारता येईल. ती जास्त एकाग्रतेने करता येईल.

राज : तुझ्या साधनेत जर मदत होणार असेल तर मला असा अनुभव आला असं तू मानायला माझी काहीच हरकत नाही.

(सद्‌गदित होऊन साष्टांग नमस्कार घालीत) महाराज, आपण हा फारच मोठा य सोपा करून सांगितलात. आपले मी किती उपकार मानू ?

राज : (हसून) अरे, ईश्वरी संकल्पच तसा होता म्हणून हे जमलं आणि उपकारच यचे असले तर त्या माऊलीचे मान. माझी अवस्था

" काय म्या पामरे । बोलावी उत्तरे । परि त्या विश्वंभरे । बोलविले ।। "
" साळुंकी मंजुळ । बोलतसे वाणी । शिकविता धनी । वेगळाची ।। "
" काय वानू आता । संतांचे उपकार । मज निरंतर । जागविती ।। "
" तुका म्हणे सारा । संतांचा हा माल । मी तो हमाल । भार वाही ।। "

ी आहे.

तर तुला ही स्थिती लवकरात लवकर प्राप्त होवो अशी ईश्वर-चरणी प्रार्थना.

-: समाप्त :-

।। श्रीराम ।।

* * *